# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ मार्च २०१९ ◆ वर्ष एकोणिसावे ◆ अंक तिसरा

**संपादक :**
सुनील मेहता
**कार्यकारी संपादक :**
शंकर सारडा
**संपादन साहाय्य :**
अंजली पटवर्धन
**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.
**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस
**मांडणी-अक्षरजुळणी**
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

*— अनुक्रमणिका —*

| | |
|---|---|
| संपादकीय | ४ |
| दिनविशेष | १२ |
| **पुस्तक परिचय** | |
| धीवराची आर्त साद | २० |
| फोर सीझन्स | ३२ |
| अशीच काही पानं... | ४० |
| सुर्वंता | ५० |
| डव्हाळं | ६२ |
| आकाश झेलताना | ७४ |
| त्रिशंकू | ८६ |
| आयडिया मॅन | १०४ |
| आनंदतरंग | ११६ |
| **अभिप्राय** | |
| सी.ई.ओ.च्या केबिनमधून... | १२८ |

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर,
पुणे-४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.

# संपादकीय



## रंग 'ती'च्या मनाचे आणि सामर्थ्याचे

ती सध्या काय करते? ती सैन्यात जाते, अवकाशात झेपावते, रात्रपाळीतही काम करते, विविध क्षेत्रांतील अधिकारपदे भूषविते...यादी खूप लांबू शकते; पण भारतापुरताच विचार करायचा झाला तरी कोट्यवधी लोकसंख्या असलेल्या या देशातील किती टक्के महिलांचा या यादीत समावेश असेल, हा मात्र चिंतनाचा विषय ठरावा. आकाशाला गवसणी घालणाऱ्या महिलांची संख्या फार कमी असते. आपापल्या क्षेत्रात कर्तृत्व गाजवणाऱ्या महिलांची संख्याही तुलनेत कमी भरावी. मग सर्वसामान्य नोकऱ्या करून अर्थार्जन करणाऱ्या स्त्रिया किंवा नोकरी न करता पूर्ण वेळ घर सांभाळणाऱ्या स्त्रिया महत्त्वाच्या नाहीत का? या प्रश्नांचा मागोवा घेतला तर असं जाणवतं, की स्त्री सुशिक्षित असो की अशिक्षित, सामान्य असो की असामान्य, कमी शिकलेली असो की उच्चशिक्षित, ती समाजाचा एक महत्त्वाचा घटक आहे आणि तिनेही स्वत:चं महत्त्व जाणलं पाहिजे. शिक्षण कमी असेल किंवा नोकरी करत नसेल तर न्यूनगंडाची भावना तिने मनात बाळगू नये; कारण 'घर' ही महत्त्वाची संस्था ती सांभाळत असते; याचबरोबर तिचं स्वत:चं असं एक विश्वही तिने निर्माण केलं पाहिजे. स्वत:चं विश्व निर्माण केलेल्या आणि स्वत:चं विश्व निर्माण करू न शकलेल्या अशा स्त्रियांचं दर्शन आमच्या या वेळच्या अंकातील पुस्तक परिचयासाठी निवडलेल्या काही स्त्रीकेंद्रित पुस्तकांतून  वाचकांना घडेल. ती पुस्तकं आहेत, 'धीवराची आर्त साद', 'फोर सीझन्स', 'अशीच काही पानं', 'सुर्वंता', 'डव्हाळं' आणि 'आकाश झेलताना.'

'धीवराची आर्त साद' या कादंबरीतील तीन स्त्रिया मायोला, सुक्कोरिना आणि डॉना, या तिघींनाही वेगवेगळ्या कारणांनी स्वत:च्या मनाशी झगडावं लागतंय. मायोलाच्या वाट्याला दु:ख आलंय तिच्या मोठ्या बहिणीमुळे. तिच्या मोठ्या बहिणीला डॉक्टर करण्याच्या महत्त्वाकांक्षेपायी आई-वडील शालेय वयातच तिला त्यांच्यापासून दूर पाठवतात, जे तिला अजिबात आवडलेलं नसतं. त्याची प्रतिक्रिया म्हणून की काय, ती स्वत:चं जीवन उधळून टाकते आणि शेवटी आत्महत्या करते. मानसशास्त्राच्या डॉक्टर असूनही आपण बहिणीला वाचवू शकलो नाही, हे शल्य मायोलाला डाचत राहतं. सुक्कोरिना तीन बहिणींच्या पाठीवर जन्मलेली असल्यामुळे तिच्या वाट्याला लहानपणापासून फारसं प्रेम येत नाही. तारुण्यसुलभ आकर्षणातून कुमारी माता होण्याचा प्रसंग गुदरणार असतो; पण फारसा गाजावाजा न होता ते प्रकरण मिटतं; पण लग्न झाल्यानंतर आणि एका मुलाची आई झाल्यानंतर लग्नाआधीचं पाप तिच्या मानगुटीवर बसतं आणि तिचं मानसिक संतुलन ढासळतं. डॉनाचे आई-वडील तिला उच्चभ्रू चौकटीत बसवू पाहतात. तिने शालेय शिक्षणाचा रूढमार्ग अनुसरला पाहिजे, असा हेका चालवतात. या दोन्ही गोष्टी डॉनाला त्यांच्यापासून दूर करतात आणि चित्रकार होऊ पाहणारी डॉना भरकटते. तिला आणि सुक्कोरिनाला मार्गावर आणते मायोला आणि स्वत:ही सकारात्मकतेकडे वाटचाल सुरू करते. स्वत:चं विश्व निर्माण करण्यासाठी या तिघींची भावनिक, मानसिक पातळीवरची धडपड खरंच प्रेरणादायक आहे. या व्यक्तिरेखांच्या निमित्ताने लेखिकेने स्त्रीमनाचा तळ ढवळून काढला आहे.

'फोर सीझन्स' हीसुद्धा स्त्रीमनाचं अंतर्बाह्य दर्शन घडविणारी कादंबरी. डॉक्टर वडील आणि उच्चशिक्षित आई घटस्फोट घेऊन वेगळे होतात आणि कदाचित तेव्हाच या कादंबरीची नायिका कामायनी हिच्या भावविश्वाला धक्का बसतो. रूढार्थाने चांगलं शिक्षण घेतलं, परदेशात गेली तरी मनाचं भरकटलेपण थांबत नाही. विविध पुरुषांचे विविध अनुभव घेता घेता तिचं जीवन दिशाहीन झालेलं असतं आणि एका

निर्णायक क्षणी एका प्रकल्पावर काम करण्यासाठी ती सुंदरबनात जाते. मग तिला ऋतुचक्र अनुभवायला मिळतं आणि सुरू होतो तिचा स्वत:कडचा प्रवास. इथे कामायनीलाही झगडावं लागलंय स्वत:चं विश्व निर्माण करण्यासाठी.

तर बाह्य परिस्थितीचे चटके सोसत 'स्व'कडे प्रवास करणाऱ्या सरस्वती राजवाडे भेटतात 'अशीच काही पानं' या चरित्रातून. लहानपणी गरिबीचे चटके सोसले सरस्वतीबाईंनी. आईने केलेला तिरस्कारही सोसला. लहानपणी चित्रपट, नाटक, गायन या क्षेत्रांमध्ये तात्पुरतं काम मिळालं; पण परत दारिद्र्यात खितपत पडल्या. लग्नानंतर वैभव मिळालं; पण नवरा दुप्पट-तिप्पट वयाचा होता. त्यामुळे वैवाहिक सुख मिळालं नाही. अठ्ठाविसाव्या वर्षी त्या विधवा झाल्या; पण नवऱ्याच्या मृत्यूच्या आधी त्या अनेक भाषा शिकल्या. एक मासिकही चालवत होत्या. लेखन करत होत्या. नवऱ्याच्या मृत्यूनंतर कर्नाटकातील उडुपीमध्ये त्यांनी शारदाम्बा नावाचं देवस्थान स्थापन केलं आणि त्या देवभक्तीत रमल्या. सरस्वतीबाईंचं हे विश्वही त्यांनीच निर्माण केलेलं. शांतरसाने ओथंबलेलं. एक विशिष्ट उंची गाठलेलं.

पण सगळ्याच स्त्रियांना ही विशिष्ट उंची गाठता येत नाही; कारण स्त्रिया भिन्न परिस्थितीत, भिन्न वातावरणात जगत असतात. 'सुर्वंता' या कादंबरीची नायिका सुर्वंता ऊसतोडणी कामगाराची देखणी बायको. ऊसतोडणी कामगारांचं शोषण, त्यांचं अस्थिर जीवन तिला अस्वस्थ करतं. त्यातून बाहेर पडायचा मार्ग ती शोधते; पण त्यासाठी तिला शील विकावं लागतं.


'डव्हाळं'मधील स्त्रीचित्रण ग्रामीण भागातील आहे. शीर्षककथेतील नायिकेला कलिंगडाचे डोहाळे लागतात; पण तेही पुरवण्यासाठी तिला किती यातायात करावी लागते, याचं चित्रण वाचताना वाटतं, साधं कलिंगड खाण्याची मुभाही या स्त्रीला असू नये? या कथासंग्रहातील काही कथांमधील स्त्रिया सासुरवासाने पिचल्या आहेत. सासर-माहेर दोन्हीकडून स्वातंत्र्यच नाकारलं गेलंय त्यांना. चिरडलं गेलंय त्यांना आणि पुरुषप्रधान

संस्कृतीपुढे गुडघे टेकलेत त्यांनी. रोजच्या रोज मरण अनुभवणाऱ्या या स्त्रियांचं हे विश्व अंतर्मुख करणारं आहे.

'आकाश झेलताना' या कादंबरीची नायिका शुभदा गरीब घरातली, अपंग, फारसं रूप नसलेली...पण तिचं एका श्रीमंत विधुराशी लग्न होतं आणि स्वत:च्या सद्‌गुणांमुळे ती ते उजळून टाकते, इतकंच नाही तर व्यवसाय सुरू करून त्यातही यशस्वी होते. स्त्रीचं रूप महत्त्वाचं नाही तर तिचं कर्तृत्व, संस्कार आणि समर्पण महत्त्वाचं आहे, असा संदेश या पुस्तकातून मिळतो. शुभदाने समर्पणातूनही स्वत:चं जग जपलंय.

उपरोल्लेखित पुस्तकांतील स्त्रियांचं हे जग बहुपदरी आहे. 'धीवराची आर्त साद', 'फोर सीझन्स' 'अशीच काही पानं,' 'सुर्वंता' या पुस्तकांमधून स्त्रीच्या कर्तृत्वाला केंद्रस्थानी न ठेवता तिचं अंतर्मन केंद्रस्थानी आहे. त्यामुळे या पुस्तकांना एक वेगळंच परिमाण लाभलंय. स्त्रीच्या तरलतेची एक अनन्य अनुभूती या पुस्तकांमधून प्रत्ययाला येते.

स्त्रीची तरलता, सोशिकता, कष्टाळूपणा, विनयशीलता, समर्पण या तिला मिळालेल्या देणग्या आहेत. त्या देणग्यांचा सकारात्मकतेने आणि तारतम्याने वापर केला तर ती स्वत:चं अस्तित्व जपू शकतेच; पण एक संस्कारसंपन्न समाजही निर्माण करू शकते. शुचिता आणि मांगल्याची जपणूक करू शकते. तेव्हा प्रत्येक स्त्रीला स्वत:चं विश्व निर्माण करण्याचं आणि त्याचबरोबर एक चांगला समाज निर्माण करण्याचं सामर्थ्य लाभो, ही सदिच्छा!



असमानतेचा गुंता उसवून स्त्री शोधतेय समानतेचा धागा, आता समजलंय तिला- तिचं जीवन तिचं आहे.
फक्त तिचंच.

– तसलिमा नासरिन

## फॉर्म ४ – वृत्तपत्राच्या मालकी हक्कासंबंधीचे निवेदन

| | | |
|---|---|---|
| १) नियतकालिकाचे नाव | : | मेहता मराठी ग्रंथजगत |
| २) प्रकाशन स्थळ | : | १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र) |
| ३) प्रकाशन काल | : | मासिक |
| ४) मुद्रकाचे नाव | : | सुनील अनिल मेहता |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र) |
| ५) प्रकाशकाचे नाव | : | सुनील अनिल मेहता |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र) |
| ६) संपादक | : | सुनील मेहता |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र) |
| ७) मुद्रण स्थळ | : | जय गणेश ऑफसेट, २०/१डी/ १ए, सोमवार पेठ, महाराजा लॉजमागे, पुणे ४११ ०११ (महाराष्ट्र) |
| ८) वृत्तपत्राची मालकी हक्क/ स्वामित्व इ. चे नाव | : | सुनील अनिल मेहता |
| कार्यालयाचा पत्ता | : | १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र) |

मी, सुनील अनिल मेहता, असे घोषित करतो की, वरील तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे विश्वासपात्र व सत्य आहे.

दि. ९.३.२०१९

सुनील अनिल मेहता
प्रकाशक

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

**आमच्या छापील अंकाच्या त्रैवार्षिक आणि पंचवार्षिक वर्गणीत आम्ही १५ ऑगस्ट २०१८ पासून बदल केला आहे, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.**

आमच्या छापील अंकाच्या वर्गणीतील बदल खालीलप्रमाणे

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये
पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये
पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

# वाचकांसाठी सुवर्णसंधी!

## WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

## बेळगाव / कोल्हापूर

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक,
मूव्ही, गेम्स इत्यादी बरेच काही
आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

**बेळगाव, कोल्हापूर येथील वर्डपॉवरचे पत्ते पुढीलप्रमाणे**

कामत टॉवर, पहिला मजला, आरपीडी कॉलेजसमोर,
टिळकवाडी, बेळगाव -५९०००६.
मोबाईल - ७८८८२७७१९०

स्टार बझार, जुना पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१.
मोबाईल - ९५१८९१२२६९

**अधिक माहितीसाठी संपर्क**

**wordpowerbookshop@gmail.com**

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

**सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर**

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ **(शनिवारी बंद)**
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

amazon


GET IT ON Google Play

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

**इथे मिळतील ई-बुक्स...**

**eBooks**



**www.amazon.in**

**play.google.com**

**Online पुस्तके खरेदी करा www.mehtapublishinghouse.com**

## १६ मार्च ते १५ एप्रिल २०१९ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**१७ मार्च - बाळ भागवत यांचा जन्मदिन**

बाळ भागवत अनुवादित १९ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ५९८५/- । सवलत किंमत २९९९/-**
१७ मार्च ते १८ मार्च

**१८ मार्च - श्रद्धा भोवड यांचा जन्मदिन**

श्रद्धा भोवड अनुवादित 'ब्रह्मकन्या'पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४९/-**
१८ मार्च ते १९ मार्च

**१९ मार्च - वर्षा वेलणकर यांचा जन्मदिन**

वर्षा वेलणकर अनुवादित 'द फेसबुक इफेक्ट', 'खैरखानाची वस्त्रोद्योजिका' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ५९५/- । सवलत किंमत ३९९/-**
१९ मार्च ते २० मार्च

**१९ मार्च - आयर्विंग वॅलेस यांचा जन्मदिन**

'सेकंड लेडी', 'द गेस्ट ऑफ ऑनर', 'द मिरॅकल','द सेव्हन्थ सिक्रेट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १२४५/- । सवलत किंमत ६९९/-**
१९ मार्च ते २० मार्च

**२० मार्च - विल्यम डॅलरिंपल यांचा जन्मदिन**

'रिटर्न ऑफ अ किंग' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ५९५/- । सवलत किंमत ४१९/-**
२० मार्च ते २१ मार्च

**२१ मार्च - जागतिक कविता दिन**

'किनारे मनाचे', 'निर्बाचित कबिता', 'तिची सावली', 'कविता दोघांची', 'मरी मरी जाय सरीर', 'उत्सव', 'त्रिवेणी', 'गोंदण', 'अनोळख', 'पूर्वसंध्या', 'तिनका तिनका तिहार', 'करार एका ताऱ्याशी', 'पीकपाणी', 'मायलेकरं',

‘मातीखालची माती’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १५८५/- । सवलत किंमत ७९९/-**

२१ मार्च ते २३ मार्च

**२२ मार्च - डॉ. सुभाष दांडेकर यांचा जन्मदिन**

‘चाळिशीनंतरची वाटचाल’, ‘वेदना आणि व्याधींसह चांगलं जीवन’, ‘व्याधिमुक्त’या पुस्तकांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७८०/- । सवलत किंमत ५०९/-**

२२ मार्च ते २४ मार्च

**२२ मार्च - प्रियांका कुलकर्णी यांचा जन्मदिन**

‘महात्मा गांधी आणि तीन माकडे’, ‘व्हिदर जस्टिस’या पुस्तकांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १९९/-**

२२ मार्च ते २४ मार्च

**२४ मार्च - ज्योती आफळे यांचा जन्मदिन**

ज्योती आफळे अनुवादित तीन पुस्तकांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६६०/- । सवलत किंमत ४६९/-**

२४ मार्च ते २५ मार्च

**२५ मार्च - व. पु. काळे यांचा जन्मदिन**

व. पु. काळे लिखित अठ्ठेचाळीस पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६७८०/- । सवलत किंमत ४०६९/-**

२५ मार्च ते २८ मार्च

**२५ मार्च - अजित ठाकूर यांचा जन्मदिन**

अजित ठाकूर अनुवादित चार पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १७९५/- । सवलत किंमत ९९९/-**

२५ मार्च ते २६ मार्च

**२६ मार्च - राहुल गोखले यांचा जन्मदिन**

‘विज्ञानातील सरस आणि सुरस’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १०९/-**

२६ मार्च ते २७ मार्च

**२६ मार्च - व्हिक्टर फ्रॅन्कल यांचा जन्मदिन**

'अर्थाच्या शोधात'या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

२६ मार्च ते २७ मार्च

**२६ मार्च - उमेश कदम यांचा जन्मदिन**

उमेश कदम लिखित चार पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७००/- । सवलत किंमत ४१९/-**

२६ मार्च ते २७ मार्च

**२६ मार्च - राजशेखर हिरेमठ यांचा जन्मदिन**

'मराठी व्याकरण परिचय' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

२६ मार्च ते २७ मार्च

**२७ मार्च - डॉ. वसु भारद्वाज यांचा जन्मदिन**

डॉ. वसु भारद्वाज यांच्या चार पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८२५/- । सवलत किंमत ५६९/-**

२७ मार्च ते २८ मार्च

**२७ मार्च - मेधा मराठे यांचा जन्मदिन**

'मातीचे मम अवघे जीवन' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १८९/-**

२७ मार्च ते २८ मार्च

**२८ मार्च - भारती पांडे यांचा जन्मदिन**

भारती पांडे अनुवादित तेरा पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**मूळ किंमत २६९५/- । सवलत किंमत १६२९/-**

२८ मार्च ते २९ मार्च

**२९ मार्च - विवेक शानभाग यांचा जन्मदिन**

'घाचर घोचर' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

२९ मार्च ते ३० मार्च

**२९ मार्च - नागनाथ कोत्तापल्ले यांचा जन्मदिन**

‘शेतकऱ्याचा असूड’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १४०/- । सवलत किंमत ८९/-**

२९ मार्च ते ३० मार्च

**२९ मार्च - चित्रा वाळिंबे यांचा जन्मदिन**

चित्रा वाळिंबे यांच्या पाच पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०३५/- । सवलत किंमत ६२९/-**

२९ मार्च ते ३० मार्च

**३० मार्च - फिलीप गूल्ड यांचा जन्मदिन**

‘आयुष्याचा अंतिम संस्कार’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १२९/-**

३० मार्च ते ३१ मार्च

**३० मार्च - मणी भौमिक यांचा जन्मदिन**

‘परमेश्वर : एक सांकेतिक नाव’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-**

३० मार्च ते ३१ मार्च

**१ एप्रिल - सुधा पाटील यांचा जन्मदिन**

‘बालपरिचर्या’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १६९/-**

१ एप्रिल ते २ एप्रिल

**१ एप्रिल - सुरेश नाईक यांचा जन्मदिन**

‘कविता दोघांची’, ‘या सुखांनो’ या पुस्तकांवर विशेष सवलत

**मूळ किंमत ३३०/- । सवलत किंमत १९९/-**

१ एप्रिल ते २ एप्रिल

**३ एप्रिल - किशोर पवार यांचा जन्मदिन**

किशोर पवार यांच्या अकरा पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १२५०/- । सवलत किंमत ७४९/-**

३ एप्रिल ते ४ एप्रिल

**३ एप्रिल - श्यामल चितळे यांचा जन्मदिन**

श्यामल चितळे अनुवादित तीन पुस्तकांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८३०/- । सवलत किंमत ५८९/-**

३ एप्रिल ते ४ एप्रिल

**४ एप्रिल - सौरभ दुग्गल यांचा जन्मदिन**

'आखाडा' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १४९/-**

४ एप्रिल ते ५ एप्रिल

**५ एप्रिल - व्यंकटेश माडगूळकर यांचा जन्मदिन**

व्यंकटेश माडगूळकर यांच्या एक्केचाळीस पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५२४०/- । सवलत किंमत ३१३९/-**

५ एप्रिल ते ८ एप्रिल

**७ एप्रिल - जागतिक आरोग्यदिन**

**संच१**- 'चला जाणून घेऊ या! तंदुरुस्ती', 'चला जाणून घेऊ या! योगविद्या', 'चला जाणून घेऊ या! मधुमेह','मधुमेह :एक आव्हान', 'हृदयविकार निवारण', 'हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी.तंत्र', 'चाळिशीनंतरची वाटचाल', 'उष्ण जलोपचार', 'सौंदर्य आणि तारुण्य टिकवण्यासाठी योगसाधना', 'कार्यमग्न, व्यस्त लोकांसाठी योगसाधना', 'एकच पेला शिवाम्बूचा' या पुस्तक संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १५२०/- । सवलत किंमत ९०९/-**

**संच२**- '२० मिनिटे तंदुरुस्तीसाठी', 'डॉक्टरांकडे जाण्यापूर्वी', 'पाणी : एक अद्‌भुत उपचार पद्धती', 'आरोग्यासाठी योग', 'फिट फॉर ५०+ फॉर मेन', 'फिट फॉर ५०+ फॉर विमेन', 'सुडौल राहा', 'चला जाणून घेऊ या! पोषक आहार','सर्व वयोगटांसाठी योगसाधना आणि ध्यानधारणा', 'पाठदुखी घालविण्यासाठी योगसाधना', 'ची रनिंग' या पुस्तक संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १७४५/- । सवलत किंमत १०४९/-**

७ एप्रिल ते ९ एप्रिल

**७ एप्रिल - अतुल कहाते यांचा जन्मदिन**

अतुल कहाते यांच्या सात पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १८९५/- । सवलत किंमत ११३९/-**

७ एप्रिल ते ८ एप्रिल

**८ एप्रिल - रणजित देसाई यांचा जन्मदिन**

रणजित देसाई यांच्या चाळीस पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत (या संचामध्ये 'स्वामी' आणि 'श्रीमानयोगी' ही पुस्तके येणार नाहीत)

**संचाची मूळ किंमत ५२६०/- । सवलत किंमत ३१६९/-**

८ एप्रिल ते ११ एप्रिल

**९ एप्रिल - अशोक जैन यांचा जन्मदिन**

'बिझिनेस महाराजे', 'बिझिनेस लेजंड्स' या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७४५/- । सवलत किंमत ५०९/-**

९ एप्रिल ते १० एप्रिल

**१० एप्रिल - वर्षा अडालजा यांचा जन्मदिन**

'अणसार' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २३९/-**

१० एप्रिल ते ११ एप्रिल

**११ एप्रिल - डॉ. सुनीलकुमार लवटे यांचा जन्मदिन**

'भारतीय साहित्यिक', 'खाली जमीन वर आकाश', 'समकालीन साहित्यिक' या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५८०/- । सवलत किंमत ३४९/-**

११ एप्रिल ते १२ एप्रिल

**११ एप्रिल - महात्मा फुले जयंती**

'महात्मा', 'शेतकऱ्यांचा असूड' या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५९०/- । सवलत किंमत ३५९/-**

११ एप्रिल ते १२ एप्रिल

**११ एप्रिल - सिंधु जोशी यांचा जन्मदिन**

सिंधु जोशी यांनी अनुवादित केलेल्या चार पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०९०/- । सवलत किंमत ६५९/-**

११ एप्रिल ते १२ एप्रिल

**११ एप्रिल - सुप्रिया वकील यांचा जन्मदिन**

सुप्रिया वकील यांनी अनुवादित केलेल्या एकतीस पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६४९५/- । सवलत किंमत ३७६९/-**
१२ एप्रिल ते १३ एप्रिल

**१४ एप्रिल - द. मा. मिरासदार यांचा जन्मदिन**

द. मा. मिरासदार यांच्या पंचवीस पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३२६०/- । सवलत किंमत १९४९/-**
१४ एप्रिल ते १७ एप्रिल

**१४ एप्रिल - आशा अपराद यांचा जन्मदिन**

'भोगले जे दुःख त्याला...' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १६९/-**
१४ एप्रिल ते १५ एप्रिल

**१४ एप्रिल - डॉ. रवींद्र ठाकूर यांचा जन्मदिन**

'महात्मा', 'व्हायरस' या पुस्तकसंचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ६४५/- । सवलत किंमत ३८९/-**
१४ एप्रिल ते १५ एप्रिल

**१५ एप्रिल - जेफ्री आर्चर यांचा जन्मदिन**

जेफ्री आर्चर यांच्या तेरा पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ४९२०/- । सवलत किंमत २४५९/-**
१५ एप्रिल ते १६ एप्रिल

**१५ एप्रिल - रवींद्र बागडे यांचा जन्मदिन**

'बोचकं', 'गटुळं' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत १९९/-**
१५ एप्रिल ते १६ एप्रिल

**१५ एप्रिल - लक्ष्मीनारायण बोल्ली यांचा जन्मदिन**

'कृष्णदेवराय' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २७०/- । सवलत किंमत १५९/-**
१५ एप्रिल ते १६ एप्रिल

◆

नवे कोरे

# टीनएजर्स


## अ नॅचरल हिस्ट्री

**डेव्हिड बेनब्रिज**

अनुवाद

**डॉ. अस्मी अच्युते**

**किंमत : ३५०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**




प्रत्येक गोष्ट शास्त्रीयदृष्ट्या समजून घेणारे पालक वयात येणं का समजून घेऊ शकत नाहीत? कारण 'वयात येणं' या घटनेमागे फक्त शारीरिक बदल नाहीत, सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक, शारीरिक, जीवशास्त्रीय असे सगळेच संदर्भ टीनएजला आहेत. फक्त शारीरिक बदल म्हणून वयात येण्याकडे पाहणं, हे संघर्षात तेल ओतण्यासारखं आहे. संदर्भांपैकी एकही संदर्भ वगळून आपल्याला चालणार नाही. उत्क्रांतीपासून सामाजिकतेपर्यंत सगळीकडेच टीनएजर्सची पाळंमुळं घट्ट रुजलेली आहेत. किशोर-वयातल्या अलीबाबाच्या गुहेमधला विचारांचा, भावनांचा खजिनाच आपल्यासमोर येतो. एरवी पालकां-साठी 'प्रवेश निषिद्ध' असणाऱ्या किशोरवयीन मुलांच्या अद्‌भुतरम्य जगाची सफर या पुस्तकाने घडवून आणली आहे. एखादं न सुटणारं अवघड कोडं सोडवताना जसा आनंद मिळतो, तसाच आनंद निसर्गाने घातलेलं कोडं सोडविण्यात आहे. 'टीनएजर्स'चं तर्कापलीकडचं गणित उकलताना जगण्याच्या प्रत्येक पायरीवर आपण अधिकाधिक समृद्ध होत जातो.

# पुस्तक परिचय




# धीवराची आर्त साद





बेलिंडा व्हिएगस गोव्यात मानसोपचारतज्ज्ञ म्हणून व्यवसाय करतात. त्यांचा जन्म केनियात नैरोबीला झाला. सहलींना जाणं, मासे पकडणं आणि अभयारण्यात हिंडणं अशा रम्य वातावरणात त्यांनी बालपण व्यतीत केलं आहे. भारतात परतल्यावर त्यांनी बेळगावला शालेय शिक्षण पूर्ण केलं आणि एम.बी.बी.एस. करण्यासाठी बंगळुरूच्या सेंट जॉन्स मेडिकल कॉलेजात प्रवेश घेतला. प्रिव्हेंटिव्ह आणि सोशल मेडिसिनसाठी त्यांना बंगळुरू युनिव्हर्सिटीकडून 'गुंडू राव गोल्ड मेडल' मिळालं आणि कम्युनिटी मेडिसिनसाठी 'मेजर डॉ. के. पद्मनाभ मेनन प्राइझ' मिळालं. त्यांनी बंगळुरूला 'एनआयएमएचएएनएस' (द नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्यूरो सायन्सेस) मधून मानसोपचारशास्त्रात एम.डी. केलं. तिथं असतानाच त्यांना रॉक क्लाइंबिंग आणि ट्रेकिंगमध्ये रस निर्माण झाला आणि त्यांनी उत्तरकाशी स्कूल ऑफ माउंटेनिअरिंगमध्ये एक कोर्सही केला. त्यांनी मानसोपचारशास्त्राची लेक्चरर म्हणून सेंट जॉन्स मेडिकल कॉलेजात पुन्हा प्रवेश केला आणि विद्यार्थी आणि स्टाफसाठी ट्रेकिंगचे कार्यक्रम आखणं चालूच ठेवलं. नेपाळला माउंट एव्हरेस्ट बेसकँपचा ट्रेक करीत असताना त्यांची व त्यांचे पती रिचर्ड यांची भेट झाली. लग्नानंतर त्या जर्मनीला गेल्या. तिथंच त्यांच्या मुलांचा जन्म झाला आणि त्यांनी लेखनाला सुरुवात केली. तरुणपणातच त्यांचं कुटुंब गोव्याला परत आलं आणि त्यांनी वार्कोला व्यवसायास सुरुवात केली. अल्पकाळासाठी त्यांनी ऑस्ट्रेलियातही वास्तव्य केलं.




## बेलिंडा व्हिएगस

अनुवाद

**श्यामल चितळे**

*हिरव्यागार गोव्याच्या पार्श्वभूमीवर घडणारी आशा आणि धैर्य याविषयीची कथा म्हणजे ‘धीवराची आर्त साद’. तीन वेगवेगळ्या स्त्रियांना उद्ध्वस्त करणाऱ्या आणि पुन्हा उभारी देणाऱ्या आयुष्यांची.*

*मायोला बंदिस्त जीवन जगलीय. तिचं आयुष्य कर्तव्याशी बांधलं गेलंय. तिची मोठी बहीण झरेला आकर्षक दिसते आणि वादळी स्वभावाची आहे. तिच्यामुळे मायोलाचं आयुष्य झाकोळून गेलंय, झरेला गूढपणे बुडून मृत्यू पावते आणि मायोला मोडून पडते. स्वत:च्या आयुष्यात निर्माण झालेल्या पोकळीला तोंड देण्यात तिचं वैद्यकशास्त्रातलं आणि मानसोपचाराचं शिक्षणही उपयोगी पडत नाही. आलेला राग आणि निराशा तिला अर्थपूर्ण शोध घ्यायला उद्युक्त करतात. त्यामुळेच ती डॉना आणि सुक्कोरिनाच्या संपर्कात येते.*

*डॉना तशी ‘बिच्चारी श्रीमंत मुलगी’ आहे. ती इंग्लंडमध्ये मोठी झालीय आणि प्रेम सोडून बाकी सगळं तिला मिळालंय. सुक्कोरिनाचा जन्म अंधश्रद्धा, अज्ञान माजलेल्या खेड्यात झालाय. तीन मुलींनंतर मुलगा होईल या आशेने वाट पाहताना झालेली ती चवथी मुलगी आहे. त्यामुळे तिची जडणघडण वेगळीच झालीये.*

*आयुष्यात वाट्याला येणाऱ्या क्रूर आणि विचित्र वळणांना तोंड देता देता थकून गेल्यामुळे सुक्कोरिनाचं मन थोडं चिरकायला लागलंय. डॉनाला प्रेम आणि आपलेपणा मिळावा अशी आशा आहे पण तिच्या अस्तित्वालाच ढवळून टाकणाऱ्या भीतीच्या भडक्यात ती दबली जातेय.*

*या दोघींचे रस्ते जेव्हा मायोलाच्या रस्त्याला छेद देतात, तेव्हा त्या धिटाईनं आत्मशोध घेण्याच्या प्रवासाला निघतात. भीतीचे एकमेकांत गुंतलेले धागे सोडवतात – स्वप्नं पूर्ण करण्याच्या दिशेनं वाटचाल करतात.*

('धीवराची आर्त साद' पुस्तकातून)

## सुक्कोरिना : **काम... आणि प्रेरणा**

*ती तिच्या बहिणींबरोबर शेतातनं जातेय. त्या उड्या मारत आणि हसत-खेळत पुढे धावतायत आणि ती सावकाश त्यांच्या मागनं जातेय. बाजूला एका छोट्या टेकडीवर एक धष्टपुष्ट बैल चरतोय. सगळं कसं शांत आहे.*

*नंतर रोझी वळून तिला थोडं मजेत, थोडं रागानं ढकलते. ती धडपडते आणि एकदम एकटीच राहते. ती वर बघते आणि तिला दिसतं की, तो बैल तिच्या दिशेनं उधळत येतोय. ती उठून पळायचा प्रयत्न करते; पण पाय हलत नाहीत. किंचाळण्यासाठी ती तोंड उघडून जागच्या जागी उभीच राहते. बैल मात्र वेगानं तिच्याकडे येत असतो.*

''आताच मी कैऱ्या पाहिल्या. चांगल्या मोठ्या आहेत,'' रोझी उत्साहानं धावत-पळत आली.

''माहितेय, मी त्या थोड्या दिवसांपूर्वीच पाहिल्या,'' अंतोनेत म्हणाली.

''चल तर! जाऊन पाडू या त्या.'' रोझीनं मिटक्या मारल्या आणि डोळ्यांची मजेशीर हालचाल केली. ''कधी एकदा खाते असं वाटतंय.''

''तुला चांगलं माहितेय, त्याला चोरी म्हणतात. भाटकर बाबला नाही आवडायचं ते.''

''त्याची कितीतरी झाडं फळांनी लगडलीयत. इतक्यांचं तो करणार तरी काय?''

''विकणारच.''

''माझी खात्री आहे, आपण दोन घेतल्या तर तो रागवायचा नाही,'' रोझीनं अनिश्चितपणेच बहिणींकडे पाहिलं. ''त्याला समजायचंसुद्धा नाही. मी तोडणाराय थोड्या,'' ती निर्धारानं म्हणाली, ''कोण येणाराय माझ्याबरोबर?''

मारियानं थोडं का-कू केलं आणि तितक्याच निर्धारानं म्हणाली, ''मी नाही, अंतोनेत आणि मी मडगावला जाणाराय.''

''सुक्कोरिना, तू चल माझ्याबरोबर.''

सुक्कोरिनानं थोडं संशयानंच बहिणीकडे बघितलं. कोवळ्या कैऱ्यांच्या आठवणीनं तोंडाला पाणी सुटलं, पण...

''कोणाला नाही कळायचं,'' रोझीनं जोर दिला, ''झाड तर दूर शेतात आहे. त्या बाजूला कधीतरी कुणी जातं. चल ना, जाऊ या आपण!''

मारियानं खांदे उडवले आणि अंतोनेतला घेऊन ती निघून गेली. ''काय वाटेल ते करा,'' जाता जाता ती म्हणाली.

कैऱ्यांचा मोह सोडता आला नाही आणि पटत नसूनही सुक्कोरिना तिच्याबरोबर निघाली. दोघी जणी हलक्या पायांनी आंब्याच्या झाडाकडे धावल्या. त्याला कोयरीच्या आकाराची फळं लगडली होती. रोझीनं पटकन थोडे दगड गोळा केले आणि नेम धरून सराईतपणे मारले. तीन मोठ्ठाल्या कैऱ्या खाली पडल्या. आपटल्यानं त्यांची थोडीशी साल निघाली होती आणि त्यातून आतला गर दिसत होता.

पटकन आपली लूट उचलून त्या दोघी बदमाश पोरी घराकडे धावल्या. कैरीच्या उभ्या फोडी कापून त्यांना तिखट-मीठ लावलं. लाळ सुटून तोंडं शिवशिवत होती. मग आपल्या लुटीचा आनंद घ्यायला त्यांनी सुरुवात केली. आतापर्यंत खाल्लेल्या सगळ्या कैऱ्यांपेक्षा त्या जास्त चविष्ट लागल्या. जेवणाची वेळ होईपर्यंत त्यांना पत्तासुद्धा नव्हता की त्यांची चोरी कोणीतरी पाहिलीय.

त्यांचा बाप खूप दूर असतानाच त्याचा चढलेला आवाज ऐकू आला. तो ऐकून सगळ्यांच्याच मनात एकदम धडकी भरली. त्याला दारू चढली होती हे तर स्पष्टच होतं. पण इतकं चिडण्यासारखं काय झालं? तो घराच्या जवळ पोहोचायला लागला तसे त्याचे शब्द स्पष्ट समजायला लागले.

''चोर! उचक्के! माझ्या हाडामासाची पोरं!''

'त्याच्या हाडामासाची पोरं' काही न समजून हा असा का पिसाळलाय म्हणून विचारात पडली. त्यांना या वेळेपर्यंत आपल्या सकाळच्या साहसाचा विसर पडला होता.

''त्याच्या मुली चोरी करतात असं दुसरे बोलताना ऐकून बापाला किती शरम येते.''

त्याच्या मुली निरागसपणे द्विधा मनःस्थितीत एकमेकींकडे पाहू लागल्या.

''कैऱ्या चोरतायत! कोणाला वाटेल आम्ही त्यांना घरी उपाशीच ठेवतो.''

रोझी आणि सुक्कोरिनाचे चेहरे पांढरे पडले. छातीतली धडपड वाढली. माय, मारिया आणि अंतोनेत भयानं; पण कणवेनं पाहू लागल्या.

''आज त्यांना चांगलाच धडा शिकवतो. आयुष्यभर विसरता येणार नाही असा- आपल्या कुटुंबाला आणखी लाज आणण्यापूर्वीच! इकडे या दोघी जणी!''

त्या अपराधी मुली थरथरत पुढे झाल्या. ''दोरखंड आणा!'' तो इतरांवर खेकसला. मारियानं घरात जाऊन दोरखंड आणला. त्यानं दोघींना खेचतच पेरूच्या झाडाजवळ नेलं. त्याच्या मुळाशीच मुंग्यांनी मोठं वारूळ केलं होतं. तिथंच तो त्यांना दोरानं झाडाला बांधू लागला.

रोझी किंचाळायला लागली. कानठळ्या बसवणारी कर्कश किंकाळी. किंकाळीमागून किंकाळी. मान कापण्यासाठी बांधत असलेल्या डुकरानं मारावी तशी किंकाळी. सुक्कोरिनानं ओठ दाताखाली दाबला आणि आवाज उमटू दिला नाही. मुंग्यांचा आकार छोटा असला तरी बालेकिल्लाच मोडल्यामुळे, हल्ला करणाऱ्यांवर त्या तुटून पडल्या. रोझी जास्तच मोठ्यानं किंकाळ्या मारू लागली. तिच्या आवाजातील उन्मादाची जागा भयानं आणि दुःखानं घेतली. कित्येक लाल मुंग्या चावे घेत असतानाही सुक्कोरिना हूं की चूं न करता उभी होती- तिच्या चेहऱ्यावरही काही भावना दिसत नव्हती.

''तुम्हाला गावभर भटकण्यापेक्षा आणि अडचणीत येण्यापेक्षा काही चांगले उद्योग नाहीत का?'' स्वतःच्या कुटुंबाची लाज घालवल्याचा बदला तो घेऊ पाहत होता. त्याचे डोळे रागानं आणि तिरस्कारानं लाल झाले होते. ''लवकरच सगळ्यांची लग्नं करायची वेळ येईल. तुम्हा चौघींसाठी हुंडा कुठून आणायचा मी? मला वाटतं तुम्ही कामाला जायला लागलात तर बरं होईल. हो, तुम्हाला लग्न करायचं असेल तर मुकाट्यानं काम करून पैसे साठवायला लागा. माझ्यावर अवलंबून राहू नका.''

''पण आम्हाला आता कुठं काम मिळणार?'' संतापामुळे मारिया धीट झाली होती. ''भातशेतीचं काम परत सुरू व्हायला अजून चार महिने तरी लागतील.''

''म्हणे एस्ताफानिया मुंबईहून आलीय आणि नवीन घर बांधायच्या

विचारात आहे. पुष्कळ महिने पुरेल असं काम मिळेल तिकडे.''

त्या दोघी मुली पाय जमिनीवर आणि झाडाच्या बुंध्यावर आपटत होत्या. वेड्यापिशा होऊन त्या पायावर चढणाऱ्या मुंग्यांना झटकायचा प्रयत्न करत होत्या. पण त्यामुळे मुंग्यांना जास्तच चेव येत होता. एक मुंगी पडली की, तिची जागा घ्यायला अनेक जणी पुढे यायच्या. जास्तच दुखायला लागलं होतं आणि त्यासाठी काही करता येत नव्हतं त्याचाही त्रास वाटायला लागला.

बापाच्या दारू चढलेल्या चेहऱ्याकडे पाहून सुक्कोरिनाच्या मनात राग आणि तिरस्कार आला. तिला रडताना बघण्याचं समाधान ती बापाला देणार नव्हती. तिनं स्वतःला वाटणाऱ्या रागावर सगळं लक्ष केंद्रित केलं आणि आपोआपच तिच्या डोळ्यांसमोर एक चित्र उभं राहिलं. तिच्या बापाला झाडाला बांधलं होतं आणि काळे कपडे घातलेले दोघे जण त्याला चाबकानं फोडून काढत होते. या कल्पनेमुळे तिला समाधान वाटतंय, यातच तिला पाप वाटलं. पण त्यामुळे गोष्टी स्वतःच्या ताब्यात आल्यासारखं वाटलं आणि प्रत्यक्ष घटनेचं भय कमी झालं.

रोझीच्या किंकाळ्या थांबून ती मुसमुसत हुंदके देत होती. तिचे डोळे वरच्या बाजूला फिरत होते. त्यामुळे तिच्या आईला भीती वाटली.

''मारून टाकणारेस की काय त्यांना?'' ती नवऱ्यावर ओरडली. तिच्या नेहमीच्या बुजरेपणावर, आता तिला वाटणाऱ्या रागानं मात केली.

पायनं दुःख भोगणाऱ्या मुलींकडे एकवार पाहिलं.

''सोडा त्यांना,'' तो गुरकावला, ''आणि लवकरच काम शोधायचं बघा.'' वळून तो निघाला. जाता जाता त्याचं पुटपुटणं ऐकू आलं, ''ती मुलगा असायला हवी होती. हूं की चूं न करता उभी होती.''

❊ ❊ ❊

''माहितीय? स्वतः मिळवलेल्या पैशांतून ती हे घर बांधतेय,'' बोलणाऱ्या बाईच्या आवाजात आदर आणि नवल होतं.

''शक्यच नाही,'' एक माणूस म्हणाला. तो खांद्यावर सिमेंटचं पोतं घेऊन भराभरा त्यांच्या जवळून गेला. लालभडक साड्या नेसलेल्या त्या बायका डोक्यावर इमारतीच्या विटा घेऊन चालल्या होत्या. बाजारातूनच त्या आल्या होत्या आणि एस्ताफानिया जिकडे घर बांधणार होती त्या जागेकडे

निघाल्या होत्या. तो माणूस पुढे म्हणाला, ''ती खूप मोठं घर बांधतेय. इतका पैसा काही बायकांना मिळवता येत नाही. तिचा नवरा श्रीमंत घरातला होता. त्यानंच पैसे दिले असणार.''

''त्याला काय कळतंय?'' ती बाई उपहासानं म्हणाली, ''हे खरंय की तिला श्रीमंत घरात दिली; पण तिच्या नवऱ्याच्या भावानं त्याला मालमत्तेच्या हिश्शाबाबत गंडवलं. त्याला फार धक्का बसला आणि त्यानं प्यायला सुरुवात केली. शेवटी भिकारी होऊनच मेला. ती मुंबईला गेली, काम शोधलं आणि तिनं मुलांना वाढवलं आणि आता स्वतःचं घर बांधतेय.''

''मुंबईला कसलं काम मिळालं तिला?'' सुक्कोरिनानं विचारलं. बापाची आज्ञा प्रमाण मानून ती कामावर यायला लागली होती. मजूर म्हणून रोजंदारी मिळवायला लागली होती.

''असं म्हणतात की ती श्रीमंत कुटुंबातल्या मुलांची देखरेख करते.''

''आणि आपल्याला इकडे मिळतात त्याच्यापेक्षा कितीतरी जास्त पैसे मिळवते,'' एक म्हातारी म्हणाली, ''मी तीस वर्षांहूनही जास्त दिवस रोज काम करतेय, पण आजारी पडले तर डॉक्टरकडे जायलाही माझ्याकडे पैसे नसतात.''

''हे असलं काम करण्यापेक्षा देखरेख करणं कितीतरी सोपं असेल,'' सुक्कोरिना म्हणाली, ''दिवस संपता संपता माझं अंग इतकं दुखायला लागतं की झोपसुद्धा लागत नाही.''

''सवय होईल गं,'' म्हातारी हसली, ''हे दुखणं लवकर थांबतं; पण नंतर येणारं दुखणं मात्र असह्य असतं. सांधे पकडतात, सुजतात आणि दुखायला लागतात. डॉक्टरांचं महागडं औषधही काही करू शकत नाही.''

''चकाट्या पिटू नका. कामाकडे लक्ष ठेवा,'' मुकादम खेकसला, ''कसले पैसे मिळतात तुम्हाला? चकाट्या पिटायचे की दगड वाहायचे?''

त्यानं असे कान उपटल्यावर बाया गप्प झाल्या. वाहून आणलेल्या चिपा डोक्यावरून उतरून नीट ढिगारा रचायला त्यांनी एकमेकींना मदत केली आणि पुढचा भारा आणण्यासाठी त्या निघाल्या. मुकादमाला ऐकू येणार नाही इतक्या अंतरावर गेल्यावर, थांबलेलं बोलणं त्यांनी पुन्हा सुरू केलं.

''मलासुद्धा आवडेल मुंबईला जायला आणि श्रीमंत मुलांची देखभाल करायला,'' सुक्कोरिना म्हणाली.

‘‘तुला लिहिता-वाचता येतं का?’’ एका बाईनं विचारलं.

‘‘नाही.’’

‘‘मग नाही जमायचं.’’

रस्त्याला पोहोचेपर्यंत त्या गप्पगप्पच होत्या. तिकडे ट्रकमधून दगड उतरवून ठेवले होते. डोक्यावरचं वजन बोचू नये म्हणून घेतलेल्या चुंबळी त्यांनी सारख्या केल्या. दगडांचा दुसरा भारा डोक्यावर घेतला आणि पायपीट करत परत निघाल्या. शाळेचा गणवेश घातलेल्या आणि खांद्यावर दप्तरं घेतलेल्या मुलांचा घोळका हसत-खेळत त्यांना ओलांडून गेला.

‘‘मला फार वाटतं, माझ्या आई-वडिलांनी पण मला शाळेत घालायला हवं होतं,’’ सुक्कोरिना खिन्नपणे म्हणाली, ‘‘मग मला असं उन्हातान्हातनं वजन घेऊन जावं लागलं नसतं. मी एखाद्या कचेरीत काम केलं असतं.’’

‘‘चूप बस!’’ एक चिडखोर म्हातारी म्हणाली. बोचरं बोलणारी बाई म्हणून ती सगळ्यांनाच माहीत होती. ‘‘आई-वडिलांबद्दल तक्रारीचा सूर काढू नकोस. त्यांनी योग्यच केलंय. तू मुलगी आहेस. तुला शाळा काय करायचीय? आहे त्यात सुख मानायला शीक.’’

‘‘मुलींनी का नाही शाळेत जायचं?’’ एका चुणचुणीत तरुण बाईनं विचारलं.

‘‘जर तू शाळेत गेली असतीस तर तुझ्या आई-वडिलांना तुझं लग्न करता आलं असतं असं वाटतं का तुला? तूच सांग, कुठल्या माणसाला शिकलेली बायको आवडेल, डोक्यावर बसायला?’’

‘‘बरोबर आहे तिचं!’’ काही मोठ्या बायकांनी संमतिदर्शक माना हलवल्या. पण तरुण बायका मात्र असहमती दाखवत पुटपुटल्या.

‘‘काळ बदललाय आता,’’ एक धीट बाई म्हणाली, ‘‘मी माझा मुलगा आणि मुलगी दोघांना शाळेत पाठवणार आहे.’’

‘‘आणि तुला काय वाटतं? म्हातारपणी ते दोघं तुझी काळजी घेतील?’’ म्हातारीनं टोमणा मारला, ‘‘मुळीच नाही घेणार! ते पणजीला नाही तर म्हापुशाला जातील आणि तू एकटीच पडशील. कारण ती दोघं तुला विसरून जातील.’’

त्या बांधकामाच्या जागी पोहोचल्या आणि गप्प झाल्या.

एस्ताफानिया आलेली होती आणि घर बांधणाऱ्या इंजिनिअरबरोबर वाद

घालत होती. ‘‘मला विहीर स्वयंपाकघराजवळ हवीय,’’ ती सांगत होती, ‘‘म्हणजे पावसाळ्यात पाणी आणण्यासाठी मला लांब जावं लागणार नाही.’’

‘‘घराच्या इतक्या जवळ विहीर बांधता येणार नाही.’’

‘‘का नाही? मी तुला तशी दोन तरी घरं दाखवू शकेन,’’ एस्ताफानिया आपल्या म्हणण्यावर ठाम होती, ‘‘तुला जमत नसेल तर तसं करू शकणारा माणूस मी शोधेन.’’

सुक्कोरिना लक्ष लावून त्यांच्याकडे पाहत होती. तिनं यापूर्वी एस्ताफानियासारखी कोणी बाई बघितलीच नव्हती. ती बुटकी आणि गोलमटोल होती. तिच्या चालण्या-बोलण्यात आत्मविश्वास ठासून भरला होता. गावातल्या पुरुषांचा तिच्याशी कसं वागावं याबाबत गोंधळ उडायचा; पण बायकांना मात्र तिच्याबद्दल आदर वाटायचा.

‘‘मला माहीत आहे की, चौकोनी खिडक्या आणि दारं बनवायला सोपं पडतं. पण मला अशा आकाराचीच हवीयत,’’ तिनं सुतारापुढे आपलं डिझाइन नाचवलं, ‘‘घर माझंय. मी त्याच्यासाठी पैसे खर्च करतेय आणि मला अशा प्रकारची दारं-खिडक्या हवीयत.’’

पण मजूर बायकांबरोबर ती नरमाईनं वागायची. त्यांच्या सकाळच्या सुट्टीसाठी ती आधीच मोठं पातेलंभर कांजी शिजवून ठेवायची. त्यांच्यातच ती फतकल मारून बसायची. डावानं ढवळून वाडग्यात कांजी वाढायची आणि छोट्या कैऱ्यांचं लोणचं, नाहीतर ताजा नारळ त्याबरोबर वाटायची. दुपारसाठी मोठं पातेलं भरून दुधाचा चहा बनवायची. तो सुक्कोरिनाला फारच आवडायचा. विशेष म्हणजे त्याच्याबरोबर खायला वेगवेगळ्या प्रकारची बिस्किटंही असायची.

हळूहळू बायकांना तिची पहिल्यासारखी भीती वाटेनाशी झाली आणि धिटाईनं त्या तिला तिच्या आयुष्याबद्दल प्रश्न विचारायला लागल्या.

‘‘माझी मुलं आता स्थिरस्थावर झालीयत,’’ एका प्रश्नाचं उत्तर देताना तिनं सांगितलं, ‘‘माझा मुलगा अमेरिकेत काम करतो. मला दोन मुली आहेत. एक मुंबईला काम करते आणि दुसरी लग्न होऊन आपल्या कुटुंबाबरोबर आफ्रिकेला राहते.’’

‘‘मग तू हे घर कोणासाठी बांधतीयस?’’ एकीनं आश्चर्यानं विचारलं.

‘‘अर्थातच, माझ्या स्वतःसाठीच!’’ एस्ताफानिया म्हणाली, ‘‘म्हणजे मला काम झेपेनासं झालं की आरामात राहता येईल.’’

‘‘पण तुझा मुलगा नाही का तुझी काळजी घ्यायचा?’’

एस्ताफानियाला हसू आलं, ‘‘मला नाही माझ्या मुला-मुलींवर अवलंबून राहायचं.’’ ती पुढे म्हणाली, ‘‘त्यांना स्वतःचं आयुष्य आहे आणि मला स्वतःला जे वाटेल ते करण्याचं स्वातंत्र्य हवंय. माझी सून सांगेल तसं वागायची जबरदस्ती नकोय.’’

त्या बायका गोंधळूनच तिच्याकडे पाहत बसल्या. त्यांना जर तिची बुद्धी आणि कर्तृत्व यांचा आदर वाटत नसता तर त्यांनी तिला वेडंच ठरवलं असतं. म्हातारपणी आपली काळजी घ्यावी म्हणून तर मुलांना जन्म द्यायचा; स्वतःच स्वतःची काळजी घेणं शक्य असतं, अशी कल्पनाच कोणाला सुचली नव्हती.

‘‘माझी सून मला फार वाईट वागणूक देते,’’ एक चिडचिडी म्हातारी हळूच म्हणाली, ‘‘पण मला सगळे अपमान गिळावे लागतात, कारण ते मला घरातून हाकलून देतील अशी भीती वाटते. मला जायला दुसरी जागाच नाहीये.’’

‘‘माझी सासू मला फार त्रास देते,’’ एक लाजरीबुजरी तरुण बाई म्हणाली, ‘‘मी केलेल्या सर्व गोष्टींना ती नावं ठेवते आणि फार हुकमत गाजवते. माझ्याच मुलांशी ती मला खेळूसुद्धा देत नाही.’’

‘‘तुम्हाला जर इतका त्रास वाटतो, तर कशाला सहन करता सगळं?’’

बायांनी एकमेकींकडे बघितलं. ‘‘कारण हे असंच चालायचं. आपलं नशीब बदलता येत नाही.’’

‘‘मी जर माझ्या नशिबापुढे मान तुकवली असती,’’ एस्ताफानिया भीतीनं खोटं खोटं शहारली, ‘‘तर माझी स्थिती आज कशी असती याची कल्पनाच करवत नाही. माझ्या बिचाऱ्या नवऱ्यानं तसं केलं आणि त्याचा सत्यानाश झाला. मला माझ्या मुलांना घडवायचं होतं. मी झगडले आणि नुसतंच माझं नशीब बदललं नाही तर मीसुद्धा ताकदवान बनले. तुम्हीसुद्धा तुमचं नशीब बदलू शकता.’’

‘‘माझं बदलायला काय करावं लागेल?’’ एस्ताफानियाच्या शब्दांनी सुक्कोरिनाला विचारायचा धीर आला.

''सगळ्यात आधी जिद्द- जिद्द हवी. कष्टांचं काम करायला मागे हटायचं नाही...'' एस्ताफानिया थबकली, ''आणि शिक्षण. तुमच्यापैकी किती जणी मुलींना शाळेत पाठवतात?''

कोणीच उत्तर दिलं नाही.

''आणि मुलांना?'' थोड्या जणींनी डोकी हलवली.

''तुम्ही जर तुमच्या मुलींना शिकवलंत,'' एस्ताफानिया पुढे म्हणाली, ''तर तुम्ही त्यांना आत्मविश्‍वास द्याल आणि अज्ञानातून बाहेर यायची संधी द्याल. तुमच्या मुली शिकल्या तर त्यांची मुलं पण शिकतील आणि तुम्ही ज्या असहायतेत अडकून पडला आहात त्यातून तुम्हाला बाहेर येता येईल. पाठवा मुलींना शाळेत!''

सगळ्या बाया गप्प राहिल्या. आधी ज्यांनी मुलांना शाळेत पाठवायला हिरिरीनं निषेध केला होता, त्यासुद्धा!

एस्ताफानियाचं सगळं बोलणं सुक्कोरिनानं कान देऊन ऐकलं. त्या वृद्ध बाईबद्दल तिला खूप जिज्ञासा वाटायची. तिच्या बहिणींसारखी टाळाटाळ न करता, ती नेमानं बांधकामाच्या ठिकाणी जायची. दगड, विटा, वाळू, खडी आणि सिमेंट वाहून न्यायची, कारण इतरांपेक्षा वेगळ्याच असणाऱ्या या बाईकडून जितकं जमेल तितकं तिला शिकायचं होतं.

घर भरभर वाढत गेलं आणि तिनं त्यात खूप रस घेतला.

''एस्ताफानियानं तिच्या घराच्या दारा-खिडक्यांच्या वरच्या बाजूला लावलेल्या लाल, निळ्या आणि हिरव्या काचा तुम्ही पाहिल्यात का?'' तिनं बहिणींना विचारलं, ''असं वाटतं की, आपण महालातच गेलोय आणि बाल्कनीतले खांब... त्यावर खरेच द्राक्षाचे घड आणि फुलं लागलीयत असं वाटतं.''

एस्ताफानिया उदार बाई होती. पुष्कळदा ती शेजारच्या मुलांना- त्यात सुक्कोरिनाही आली- ती राहत असलेल्या शेडमध्ये बोलवायची. मग मोठी मोठी पुठ्ठ्यांची खोकी उघडून मिठाई, कपडे आणि खेळणी मोकळ्या हातानं वाटायची. ''सगळ्यांना कधी ना कधी मरायचंय,'' ती म्हणाली, ''मग आपल्याला बरोबर नेता येणार नाहीत अशा गोष्टी साठवून तरी कशाला ठेवायच्या?''

काम करता करता बायका तिच्या शब्दांवर विचार करायच्या. तिच्या

विचित्र कल्पनांची चर्चा करायच्या. एकदाचं घर बांधून पूर्ण झालं आणि स्वतःच्या निर्मितीचा थोडा आनंद घेण्याऐवजी एस्ताफानियानं सरळ त्याला कुलूप घातलं आणि ती मुंबईला गेली.

ती गेल्यानंतरसुद्धा त्यात लाल कौलारू सफेद घराकडे सुक्कोरिना ओढली जायची. ते बांधायला तिनंही मदत केलीच होती की! ती लाल कोब्याच्या जमिनीवर पडवीत बसायची आणि एस्ताफानियाचाच विचार करायची. ती जगत असलेल्या आयुष्यात तिची घुसमट व्हायची आणि त्यापासून दूर पळून जावंसं तिला वाटायचं. एस्ताफानियानं सांगितलं होतं, तिचं नशीब बदलता येईल आणि तिला त्यावर विश्वास ठेवावा असं फार वाटायचं.

धीवर पक्षी कर्कश आवाज करत उडत गेला. स्वतःच्या सौंदर्याची झलक दाखवून गेला. माणसांच्या मनात त्याच्याबद्दल नकारात्मक विचार असले तरी त्याची त्याला काहीच पर्वा नव्हती. गैरसमज असलेल्या त्या पक्ष्याचं तिला फारच कौतुक वाटलं. ती राहत असणाऱ्या जगात आजूबाजूच्या माणसांना काय वाटतंय याचा परिणाम सर्वांवर व्हायचा. तिला वाटलं, आपणही आपल्या भोवतीची जखडून टाकणारी बंधनं तोडून टाकावीत, हात पंखासारखे पसरावेत आणि उंच उडून जावं.

पण ती काही पक्षी नव्हती. ती फक्त एक नगण्य उंदीर होती.

◆


**द नंबर वन लेडिज डिटेक्टिव्ह एजन्सी**

**अलेक्झांडर मॅक्काल स्मिथ । अनुवाद : नीला चांदोरकर**



**आफ्रिकेतील प्रेश्यस रामोत्स्वे मॅडम**

पदोपदी धोका असणाऱ्या रहस्यांचा आपल्या

मित्रमैत्रिणींबरोबर धूर्तपणे माग काढणारी

**'द नंबर वन लेडिज डिटेक्टिव्ह एजन्सी'**ची नायिका

**किंमत : २००/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

# पुस्तक परिचय



## फोर सीझन्स




शर्मिला फडके या लेखक आणि अनुवादक आहेत. त्यांनी वनस्पतीशास्त्र या विषयातील पदवी शिक्षण आणि पत्रकारिता व कला-इतिहासाचे पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे. आपल्या आवडीलाच व्यवसायाचे स्वरूप देत कला-इतिहास आणि संशोधनामध्ये कार्यरत. चित्रकला, प्रवास, साहित्य या विषयांवर सखोल लेखन प्रकाशित.

गेली जवळपास पंधरा वर्षे विविध दैनिके, मासिके, वार्षिके, दिवाळी अंक इत्यादी माध्यमांतून सातत्याने लिखाण. 'चिन्ह' या कला-वार्षिकाच्या कार्यकारी संपादक या नात्याने संपादन. मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे त्यांनी अनुवादित केलेले 'बोनोबो : एक शांतिदूत!' पुस्तक प्रकाशित.

'चित्रकार राजा रविवर्मा आणि त्यांचे महाराष्ट्रातीलवास्तव्य' या विषयावरच्या कला-प्रकल्पाच्या कामात सध्या कार्यरत.

# शर्मिला फडके




*एक आतलं पर्यावरण स्वतःचं;*
*एक बाहेरचं पर्यावरण नात्यांचं*
*आणि एक सर्वव्यापी निसर्गाचं.*
*प्रत्येकाचे प्रश्न वेगळे*
*उत्तरे वेगळी.*
*तिन्हींची एकमेकांमधीलगुंतागुंत अपरिहार्य.*
*काही प्रश्न आणि त्यांची उत्तरे..*
*खोलवर पुरून ठेवलेली. गोठवलेली.*
*काही तप्त माळरानावर सुकत गेली.*
*काही बर्फाच्या तुकड्याप्रमाणे वितळून गेली.*
*काही श्वास घेत राहिली*
*दलदलीतून धडपडत वर आलेल्या मुळांप्रमाणे.*
*तरीही*
*त्यांची एकमेकांसोबतची यात्रा अखंड.*
*अशाश्वततेचा शाप माथ्यावर मिरवत*
*आपापल्या सुंदरबनाच्या शोधात..*

('फोर सीझन्स' पुस्तकातून)

रजईच्या आणि शेकोटीच्या उबेत विचारांनी शिणलेल्या मला खुर्चीत बसल्या बसल्याच गाढझोप लागते. झोपेतही विचार थांबलेले नसतात. जाग येते तेव्हा आसमंत गोठलेल्या काळ्या बर्फासारखा भोवती साचलेला असतो. हालचाल करायचीही भीती वाटते. एखादा थर अंगावर कोसळायचा. मी काळ्या थंड अंधाराखाली गाडली जाईन.

मला कॅलाब्रियाच्या हिवाळ्यातल्या झाकोळांची आठवण येते. तिथला शेवटचा हिवाळा डिप्रेशनमध्ये गेला. पण त्या आधीचे काही सुंदर हिवाळी ऋतू मी अर्काइव्हमध्ये जपलेले आहेत. ते आठवायला हवेत.

त्या शेवटच्या हिवाळ्याचे काही गोठलेले तुकडे मी माझ्यासोबत इथवर आणलेले आहेत. अजून ते वितळलेले नाहीत. त्यांची लवकरात लवकर वाफ होऊन जावी या माळावर, असं तीव्रतेनं वाटत राहतं. म्हणजे मग त्याखाली दडपले गेलेले सोनेरी ऋतू आठवतील.

ते उष्ण, उबदार ऋतू पुन्हा येणारच नाहीत का परतून?

माळावरचा हिवाळा कॅलाब्रियाच्या हिवाळ्याइतका उदास, दुःखी नाही. काही उत्साही कवडसे वाट्याला येत होते. पण आता कटू आठवणींचं मोहोळ उठलं आहे, ते लवकर शांत होणारं नाही.

चौदा-पंधरा महिने दाबून आत ढकलायचा प्रयत्न केलेल्या आठवणी. त्यात अजून जुनं काहीबाही वर येत राहतं. सगळं एकमेकांशी जोडलेलं. आजवर कधी संगती लावायचा प्रयत्नच केला नव्हता.

ग्रीन प्रोजेक्ट्सवर बोलत असताना मला माहीत होतं की मुद्दे जास्त स्पष्ट करत गेलं तर आयजीडीसीनं या इको-टुरिझम प्रकल्पात, विशेषतः ग्रीन रिसॉर्टच्या उभारणीत पर्यावरणाच्या नावाखाली जी धूळफेक केलेली आहे, ती उघड होत जाईल. आधीपासूनच विरोध असणाऱ्या पलाशच्या कार्यकर्त्यांच्या हातात कोलीत मिळेल आयतं.

मग या भानगडीत आपण पडायचं नाही असं ठरवलेलं असतानाही कशाला ऐन वेळी सगळं सविस्तर मांडायला लागलो? पुन्हा तीच चूक..

'सेव्ह द आयलंड' प्रोजेक्ट प्रेझेन्टेशनच्या डिझॅस्टरची आठवण उन्मळून येणारच आहे आता. त्या वेळी मी माझ्या बोलण्याचा रोख अचानक बदलला असं एरिक, यूकी सगळ्यांना वाटत होतं. मी तसंच वाटू दिलं त्यांना. पण ते अचानक झालेलं नव्हतं हे मला माहीत आहे. सगळं डोक्यात साठत गेलं होतं. तरीही ग्रीन-अर्थच्या लोकासंमोर ते न बोलण्याचा प्रोफेशनलिझम कमावलेला होता तोवर त्याचं काय झालं? का मांडत गेलो आपण तरीही प्रोजेक्टच्या विरोधात जाणारे, पर्यावरणीय मुद्दे?

युरोपमध्ये मी ज्या वेळी गेले त्या वेळी ग्रीन ॲडव्हर्टायझिंग हे हॉट फिल्ड होतं. अजूनही आहे. मार्केटची, क्लायन्ट्सची, एजन्सीची लाडकी समजूत असते की काहीही ग्रीन पॅकिंगमध्ये लपेटलं, ग्रीन कॉपीनं सजवलं की म्हणाल त्या किमतीला ते खपतं. लोकांसमोर विश्वासार्हता वाढते, वर पर्यावरणप्रेमाचा शिक्का बसून अनेक ग्रीन क्रेडिट्सही खिशात पडतात. सामान्य जग या ग्रीन वॉशिंगला झपाट्यानं बळी पडतं.

ग्रीन कॉपी लिहिताना, क्लायन्ट्सच्या ग्रीन रिक्वायरमेन्टकरिता रिसर्च करताना जाहिरात क्षेत्र आणि पर्यावरण यांचा संबंध नेमका कशा संदर्भात, किती महत्त्वाचा होता हे कळलं. पर्यावरणाचं अपरिमित नुकसान होण्यात जी क्षेत्रं अप्रत्यक्षरीत्या जबाबदार त्यात जाहिरातींचं क्षेत्र अग्रगण्य.

ग्रीन कॉपी लिहीत असे तेव्हा प्रॉडक्ट्स बनताना पर्यावरणाचं कितीही नुकसान झालेलं असलं तरी छानशा हिरव्या शब्दांच्या आवरणात लपेटून लोकांच्या पुढ्यात आणायला हातभार लावत होते. लोकांच्या मनातली आपण हे प्रॉडक्ट वापरल्यानं पर्यावरण चळवळीला हातभार लावत आहोत ही भावना आणखी उदात्त बनवण्याकरिता, ग्रीन प्रॉडक्ट्सच्या वापरातून त्यांची सामाजिक प्रतिष्ठा उंचावायला मी माझे शब्द, माझी सर्जनशीलता खर्च करत होते, बुद्धी पणाला लावत होते. ग्रीन, बायो-डिग्रेडेबल, रिसायकल्ड, एन्व्हायर्न्मेंट फ्रेंडली, एनर्जी एफिशियन्ट असे शब्द कॉपीमध्ये केकवरच्या डेकोरेटिव्ह चेरीसारखे पेरत होते. पर्यावरणाला अजिबात हानी पोचत नाही हे खोटं, ठामपणे कसं बोलायचं मला माहीत होतं.

काही एनर्जी प्रोड्यूसिंग कंपन्या एरिकच्या क्लायन्ट होत्या. त्या तर बिगेस्ट कार्बन एमिटर्स. त्यांना युरोपातून काढता पाय घेऊन बाहेरच्या

जगात, विशेषतः तिसऱ्या जगात आपले पाय पसरायची गरज भासली तेव्हा त्यांची काळवंडलेली इमेज बदलून ते उलट किती एनव्हायर्न्मेन्ट सपोर्टर्स आहेत हे दाखवण्याकरिता मी माझं क्रिएटिव्ह कौशल्य पणाला लावलं. प्रॉडक्ट्सचं रिब्रॅन्डिंग ग्रीन प्रॉडक्ट म्हणून करण्यात तर माझा हातखंडा होता.

कामात क्रिएटिव्ह सॅटिसफॅक्शन होतं. पे वॉज फॅब्युलस, पोस्ट उत्तम होती. आय वॉज लीडिंग अ गुड लाइफ अ‍ॅन्ड आय वॉज हॅप्पी.

पण हळूहळू त्यातला फोलपणा जाणवायला लागलाच. पर्यावरणाच्या नावाखाली चाललेली धूळफेक नजरेत खुपायला लागली. मे बी त्यातल्या अनएथिकल गोष्टीच इतक्या वाढत गेल्या, की उबग आला. करिअरमधली मजा, थ्रिल संपलं. एक दिवस पुढ्यात ब्रीफ आल्यावर काय लपवायचं, काय हिरव्या मुलाम्यात दडवायचं यावर विचार करताना मला अनिर्बननं सांगितलेलं वाक्य आठवलं.

—Advertising is an environmental striptease for a world of abundance.

आणि मग त्या वेळी हातातलं काम बंद करून पूर्वी त्याच्या न आवडलेल्या, उपहासानं उच्चारलेल्या सगळ्याच वाक्यांचा नीट विचार करून पाहावासा वाटला.

सेल्फ एनलायटनिंगचा एक क्षण येतो कधीतरी आयुष्यात प्रत्येकाच्या, तसा तो त्या वेळी माझ्या आला.

पर्यावरणाचं आपण काही भलं करू शकत नाही, तर निदान त्याच्या ऱ्हासाला हातभार लावणाऱ्यांना साथ देणं बंद करावं, असं तीव्रतेनं वाटलं.

पण जॉब सोडून देणं सोपं नव्हतं. करिअर घडवण्याकरिता खूप शक्ती, कष्ट, बुद्धिमत्ता, पैसे पणाला लावलेले होते. परदेशात एकटं राहताना तर हे अजिबात सोपं नाही.

त्या वेळी मग पर्यावरणात काहीतरी सखोल शिकता येईल आणि पोटही भरता येईल म्हणून ग्रीन मॅनेजमेन्टचा पर्याय निवडला. कोर्स पूर्ण केला. वाटलं आता कॉन्शस सलामत ठेवून पर्यावरणाच्या भल्याचं काही करता येईल.

मग प्रोजेक्ट्स करताना लक्षात आलं- इथेही शिकलेल्या थिअरीज

प्रत्यक्षात आणताना एक्सप्लॉयटेशन टाळता येत नाहीच. टक्केवारी कमी, पण प्रतारणा आहेच. ग्रीन प्रोजेक्ट्समध्ये मल्टिनॅशनल कंपन्या झपाट्यानं इन्व्हेस्ट करत होत्या, ज्या पूर्वीही माझ्या क्लायन्ट होत्या. मग कुठे काय वेगळं आहे?

आणि या सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न- जो एरिकनं विचारला, तो म्हणजे मग प्रोफेशनल एथिक्सचं काय?

मला उत्तर देता आलं नाही. अजूनही ते मिळालेलं नाहीच.

एरिकनं त्या वेळी नाराज होऊन विचारलं, ''काय हवंय तरी काय नेमकं तुला?''

तेही कुठे माहीत आहे मला.

आपला कॉन्शस वेगळं सांगतो, आपण करतो वेगळं, हा ताण दडपण आणतो. कुठेतरी काहीतरी चुकतं आहे, असं सतत वाटत राहतं. सगळे शब्द जर आपले अर्थ हरवून बसणार असतील, तर ते वापरून उगीच मोठमोठ्या वल्गना का करायच्या?

विहानशी बोलण्यापेक्षा डायरीत उतरवून काढणं सोपं आहे. पहिल्यांदाच इतपत सुसंगत विचार करता आला याबद्दल मी माझीच पाठ थोपटते. अर्थात, याचं क्रेडिट विहानलाच जातं. त्यानं खोदून विचारलेल्या प्रश्नांमुळेच ही थॉट प्रोसेस निदान सुरू झाली. उत्तरं मिळतील हळूहळू. आता मला घाई नाही, अस्वस्थता वाटत नाही. सुरुवात तर झाली आहे.

हिल स्टेशनच्या डोंगरावरून येणारे वारे खूप थंडगार, बोचरे आहेत. धुकं उशिरापर्यंत वितळत नाही.

कॅलाब्रियाच्या हिवाळ्यातला तो एक बर्फाळ तुकडा माळरानावर रेस्ट हाउसच्या व्हरांड्यात माझ्या तळहातावर अलगद येऊन पडलेला. तो वितळत जाताना मी सावकाश निरखून पाहते.

❧

गच्चीवरून सकाळी

अंजनेश्वर डोंगराची रांग धूसर, पारदर्शी धुकाळ आवरणात वेढलेली.

एका बाजूला खोलवर दिसणारा माळतलावाचा निळा आरसा, भोवती इन्स्टिट्यूटने जोपासलेल्या वनस्पतींचं हिरवं रान. दुसरीकडे माळावरच्या जमिनीवर वळणावळणानं जाणाऱ्या आता कोरड्या ठाक पडलेल्या ओढ्यांच्या रेषा. या सर्वांना वेढून असणारा गवताचा पिवळा समुद्र.

आता मला माळरानाचा हा पिवळा रंग एकसुरी वाटत नाही. उलट किती वेगवेगळ्या शेड्स, टेक्स्चर्स आहेत माळरानाच्या या उघड्या कॅनव्हासवर, हे लक्षात येतं. बानीदा इथे असताना पेंटिंग करत असतील का? करत असतील तर त्यांनी त्यांच्या कलर चार्टवरच्या कोणत्या शेड्स इथे वापरल्या असतील? कॅडमियम यलो, कॅनरी यलो, यलो ऑकर, रॉ सिएना, सेपिया, बर्न्ट ॲम्बर, बर्न्ट सिएना.. या क्षणी फक्त गोल्डन ॲम्बर.

खूप कोवळा सोनेरी प्रकाश दिसतो आहे माळावर. पिवळा आणि सोनेरी. मनावर नैराश्याचं झाकोळ होतं तेव्हा माझी थेरपिस्ट म्हणायची- ''यू शुड बी ऑलवेज सराउन्डेड बाय गोल्डन कलर्स.''

काहीतरी जादू आहे या रंगामध्ये औदासिन्याला पळवून लावण्याची. कदाचित म्हणूनच व्हिन्सेन्टनं त्याच्या चित्रामध्ये हेच रंग जास्त वापरले. डिप्रेशन झटकायचा शेवटचा उपाय.

◆

**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**


**३री आवृत्ती**

# ओंकाराची रेख जना


**मंजुश्री गोखले**



स्त्री आणि त्यातही शूद्र असूनही युगप्रवर्तक
अभंगरचना करणाऱ्या
संत जनाबाई यांची जीवनयात्रा!

**किंमत : ३२०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

नवे कोरे




## साहित्यप्रतिभाः सामर्थ्य आणि मर्यादा

### वि. स. खांडेकर

संपादक

**डॉ. सुनीलकुमार लवटे**

**किंमत : १६०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

‘साहित्यप्रतिभा : सामर्थ्य आणि मर्यादा’ हा वि.स.खांडेकरांचा व्यक्तिकेंद्रित; परंतु साहित्याच्या अंगाने लिहिलेला समीक्षात्मक लेखसंग्रह होय. यात खांडेकरांनी आपल्या पूर्व व समकालीन नाटककार, कवी, कथाकार असलेल्या सुहृद साहित्यिकांच्या वाङ्मय व व्यक्तिविचारांची प्रज्ञा व प्रतिभा अशा दुहेरी अंगानी स्वागतशीलपणे; परंतु नीरक्षीर न्यायविवेकी समीक्षा केली आहे. समकालीनांविषयीची आस्था व्यक्त करणारे हे लेखन सुहृदांचे व्यक्तिगत व वाङ्मयीन योगदान अधोरेखित करते, ते गुण-दोषांसकट! म्हणून प्रज्ञावंत साहित्यिकांची प्रतिभा मूल्यांकित करण्याचा वस्तुपाठ समजून या टीका-लेखनाकडे पाहिले जाते. स्वागतशील, आस्वादक समीक्षालेखनाचा आदर्श ज्यांना अनुसरायचा असेल, त्यांना हे पुस्तक प्रतिदर्श ठरावे.

# पुस्तक परिचय



## ‘अशीच काही पानं..!’

आद्य स्त्रीवादी कन्नड लेखिका सरस्वतीबाई राजवाडे : जीवन आणि साहित्य



वैदेही ह्या आधुनिक कन्नड साहित्यक्षेत्रातील अग्रगण्य लेखिका आहेत. त्यांचा जन्म कर्नाटकातील कुंदापूर (जि. उडुपी) ह्या गावात झाला. लघुकथांनी लेखनप्रारंभ करून पुढे काव्य, कादंबरी, निबंध, बालनाट्य, बालकथा आणि अनुवाद अशा अनेक साहित्यप्रकारांत त्यांनी विपुल लेखन केलं. स्त्रीकेंद्रितता (स्त्रीवर होणारा अन्याय आणि तिचं सामर्थ्य), कथेची उत्कृष्ट मांडणी, चित्रणातील सूक्ष्मता आणि स्पष्टता इ. त्यांच्या कथालेखनाची वैशिष्ट्यं आहेत. त्यांच्या काही निवडक साहित्यकृतींचा मराठी व इतर भारतीय भाषांमध्ये अनुवाद केला गेला आहे.

कर्नाटक साहित्य अकादमी पुरस्कार, केंद्रीय साहित्य अकादमी पुरस्कार (२००९), कर्नाटक राज्य शासनाचा कन्नड साहित्यातील योगदानासाठी स्त्री साहित्यिकाला दिला जाणारा सर्वोच्च पुरस्कार `Dana Chinthamani Attimabbe Award`, कथा पुरस्कार, कर्नाटक राज्य शासनाचा ‘राजोत्सव’ पुरस्कार (२०१७) इ. पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आलं आहे. कर्नाटक मुक्त विद्यापीठाने त्यांना २०१५मध्ये डॉक्टरेट प्रदान केली आहे.




संपादन आणि शब्दांकन
**वैदेही**
अनुवाद
**उमा कुलकर्णी**

*सरस्वतीबाई राजवाडे म्हणजे*
*अद्‌भुत कादंबरीतल्या नायिका किंवा*
*आकाशातून या भूतलावर अवतरलेल्या जणू*
*शापग्रस्त अप्सराच!*
*आपल्या असामान्य रूपामुळे काही काळासाठी त्या रंगभूमीवर झळकल्या.*
*वाद्यवृंदाबरोबर गायिका म्हणून बालवयातच त्यांनी भारतभर प्रवास केला.*
*पंधराव्या वर्षी त्या अंबिकापती रायशास्त्री राजवाडे या उच्चपदस्थ अधिकाऱ्याशी विवाहबद्ध झाल्या.*
*त्यांनी श्रीमंत संसाराच्या सुखाबरोबरच एकान्तवासाचं दुःखही अनुभवलं.*
*या कालखंडात त्यांनी अनेक भाषा आत्मसात केल्या.*
*त्यांनी तमिळमध्ये पहिली कथा लिहिली.*
*त्यानंतर त्यांनी कन्नडमध्ये कथा लिहायला सुरुवात केली.*
*त्यांनी स्वतः स्त्रियांसाठी 'सुप्रभात' नावाचं मासिकही चालवलं.*
*सरस्वतीबाईंचं जीवनचरित्र म्हणजे जीवनभर प्रेमाचा शोध घेत, एकाकी जगत एकान्ताकडे वळलेल्या एका जिवाची कथा!*

(‘अशीच काही पानं’ पुस्तकातून)

त्या दिवशी मी त्यांना ‘लेखिका गिरीबाला’ म्हणून भेटले. त्याच वेळी शारदेच्या भक्तीत लीन होऊनही गत आयुष्याच्या सगळ्या आठवणींचा त्या जिवंत चैतन्यमय झराही होत्या. त्यांना एक प्रश्न विचारला की बस्स! त्या त्या काळाकडे धाव घेत, स्वत: त्या वयाच्या होऊन जात, एवढंच नव्हे, त्या काळातल्या त्यांना परिचित असलेल्या व्यक्तींनाही ओढून समोर उभं करायच्या! दोन दशकं कन्नड साहित्यात स्त्री-स्वर मिसळणाऱ्या, स्त्रियांच्या प्रगतीसाठी एका मासिकाची सुरुवात करणाऱ्या, मुलांसाठी आवर्जून लेखन करणाऱ्या, वृत्तपत्रात कॉलम लिहिणाऱ्या, हरीकथा लिहून त्याचं सादरीकरणही करणाऱ्या, नाटक लिहून ते सादर करणाऱ्या, त्यात अभिनय करणाऱ्या... एकूणच साहित्य निर्माण करून कलेच्या प्रांतातही तळपून उठणाऱ्या... अशा कितीतरी क्षेत्रांतल्या कार्याविषयी राजवाडेंना खोदून-खोदून विचारायला लागले तेव्हा ‘कोण जाणे! सगळं एकेक वेडच नाही का?...’ म्हणून त्या अचानक झटकून टाकायच्या. तो विषयच बदलून टाकायच्या.

काही वेळा मात्र त्यांच्या नकळत आठवणींचा कोष फाटला जायचा. मग त्या एकेक कथेचा साज उलगडून दाखवायच्या अन् म्हणायच्या, ‘अरेच्चा! किती छान आहे हे! असं कसं तेव्हा मला हे सुचलं असेल?’ त्या वेळी त्या स्वत:लाच अभिनयपूर्वक बघून चकित व्हायच्या, तर काही कथांची आठवण काढत आणि म्हणत, ‘हे कशाला लिहायला गेले होते, कोण जाणे! इतर करायला काही उद्योग नसणार! म्हणून बसले असेन लिहीत! काही अर्थ नाही!’

स्वत:च्या आयुष्याची कथा सांगताना त्यांचा आविर्भाव कुठंतरी, कधीतरी, कुणाच्यातरी संदर्भात घडून गेलेली घटना या आत्मसात करून सांगताहेत, असा असायचा. पूर्णपणे आत नाही आणि संपूर्णपणे बाहेरही नाही अशी काहीशी त्यांची अवस्था असायची तेव्हा! कुठल्याही दु:ख-उद्वेगाशिवाय त्यातून बाहेर आले, याचं आश्चर्यही त्या मोठ्या संभ्रमानं व्यक्त करत. हा संभ्रम आणि हा विस्मय त्यांच्या स्वभावाचा स्थायीभाव असल्याचं नंतर माझ्याही लक्षात आलं. चेहऱ्यावर एक स्मिताची ज्योत लावल्याशिवाय राजवाडेंना बोलायलाच येत नसावं!

अशा जन्मजात स्वतंत्र मनोवृत्तीच्या या लेखिकेनं आयुष्यभर स्वप्नं, स्वप्नं आणि फक्त स्वप्नंच पाहिली! कुठल्याही परिस्थितीत त्यांनी आपला स्वप्नलोक बंद केला नाही. कदाचित त्यामुळेच त्या जीवनाच्या विप्लव प्रवाहात वाहून न जाता स्थिर उभं राहून उद्याच्या जगात जगायचं बळ राखून होत्या. अखेरपर्यंत त्यांच्यामधली मुग्धता, लहान-सहान बाबतीतला खोडकरपणा, पटकन उभं राहून इकडं-तिकडं फिरत अनुभवायचा उत्साह, कल्पक शक्ती, स्वप्नाळूपणा, विशेष ग्रहणशक्ती, घडून गेलेल्या घटना पुन्हा नजरेसमोर उभं करायची प्रतिभा अजिबात लपून राहात नव्हती.

***

त्यांनी प्रकाशित केलेले 'सुप्रभात'चे अंक पाहिले, तर त्यात प्रकाशित झालेल्या लेखांमधून त्यांची स्त्रीविषयीची काळजी सहजच व्यक्त होते. काही प्रसिद्ध लेखिकांना प्रकाशात आणणारं हे नियतकालिक. श्रीमती आनंदी सदाशिवराव, दिवंगत श्रीमती एम. के. जयलक्ष्मी, श्रीमती लीलाबाई कामत वगैरे यात लिहायच्या. त्या वेळी त्या मासिकात प्रकाशित झालेल्या काही लेखांचे विषय पाहिले, तर आता ते लेख लिहिणाऱ्या लेखिका कुठं अदृश्य झाल्या असं वाटून जीव कळवळतो. त्यांचा अभिमानही वाटतो. 'या मासिकासाठी वर्गणी मागायला गेले असता बायका 'आमचं साहित्य म्हणजे जिरे-कोथिंबीर!' म्हणून सांगून हसत होत्या!' अशी आठवण राजवाडे सांगायच्या. त्या वेळी मासिक चालवण्यामधल्या अडचणी त्यांनी गोविंद पै यांच्यासमोर मांडल्या, तेव्हा सगळं ऐकून त्यांनी अखेर सांगितलं, 'सृजनशील व्यक्तींनी नियतकालिक चालवायच्या फंदात पडू नये! तू हे थांबव!' त्यांच्या बोलण्याला मान देऊन हे प्रकरण लगोलग थांबवणंही शक्य नव्हतं. कारण काही वर्गणी गोळा झाली होती; त्यामुळे बारा अंक प्रकाशित करून त्यांनी 'सुप्रभात' बंद केलं.

राजवाडे गोविंद पैंना 'गुरुदेव' या नावानंच हाक मारत. बहुतकरून सरस्वतीबाईंना नेमकेपणानं ओळखून त्यांचं सृजनशील साहित्यसृष्टीत स्वागत करून त्यांना लिहितं करायचं कार्य राष्ट्रकवी गोविंद पै यांनी केलं, असंच म्हणावं लागेल! स्थानिक असून त्यांच्याशी आपलेपणानं बोलणारे दुसरे लेखक म्हणजे त्यांचे समकालीन कथाकार 'कविराजहंस' या बिरुदानं

सन्मानित झालेले श्री. सांत्यारू वेंकटराज. त्या वेळच्या जिल्हा पातळीवरच्या संमेलनाच्या वेळी राजवाडेंचा मोठा सन्मान केल्याचं ऐकणाऱ्या एका मोठ्या साहित्यिकांनी 'ती बाई अजून आहे होय?' अशी पृच्छा केली होती म्हणे! हे ऐकून राजवाडेंना फार वाईट वाटलं होतं. हा प्रश्न अखेरपर्यंत त्यांच्या मनात सलत राहिला होता.

मीच त्यांची समजूत घातली, 'त्यांनी ते तुम्हाला छेडण्यासाठी किंवा तुमच्याविषयी अनादर दाखवावा म्हणून म्हटलं नसेल! त्यांना खरोखरच आश्चर्य वाटलं असेल!' पण त्यांचं समाधान झालं नाही. उलट त्या म्हणाल्या, 'तुम्ही म्हणता तितकं ते साधं नाही! आपल्या एका समकालीन लेखिकेकडे बघायची त्यांची ती दृष्टी होती, हे मला ठाऊक आहे! ही एक दुर्लक्ष करायची पद्धत! मी नाही का त्यांच्याविषयी 'अजून हा इसम आहे होय?!' असं म्हणू शकत?'

उगाच दाक्षिण्याचा भाग म्हणून किंवा समोर आहे म्हणून पाठीवर थाप मारली, चार बरे शब्द काढले की पुरेसं नाही. त्या काळी मोठे लेखक आणि समीक्षकही होते. त्यांनी आपल्या लेखनात आम्हाला काहीही स्थान दिलं नाही. आम्हाला त्यांनी खिजगणतीतच धरलं नाही! खरं म्हणजे तेव्हा आम्हाला त्याची फार गरज होती! प्रतिभावान माणसं कुणाच्याही शिफारशीची वाट न बघता लिहितात, असं एक सुलभ विधान करता येईलही; पण राजवाडेंच्या म्हणण्याचा मथितार्थ नाकारता येत नाही, हेही खरंच!

(माझ्या माहितीप्रमाणे) राजवाडेंनी एका अर्पण पत्रिकेत लिहिलंय, 'ज्यांच्या सहवासानं देशाभिमान-भाषाभिमान-सत्याची ओढयांचं दर्शन झालं, त्या 'देवा'च्या पायाशी ही अल्पकृती नम्रपणे समर्पित करत आहे!' ही अर्पण पत्रिका असलेल्या त्यांच्या 'आहुती आणि इतर कथा' (१९३८) या संकलनाला आणि त्यांच्या 'कदंब'(१९४७) या कादंबरीला टी.एस.वेंकटराज यांची प्रस्तावना आहे. हे दोन्ही संग्रह त्यांच्या 'श्रीमती सरस्वतीबाई राजवाडे' या नावानं प्रकाशित झाले आहेत. 'पुण्यफला' ही त्यांची कादंबरी प्रकाशित व्हायच्या वेळी त्या 'गिरीबाला' होत्या. पुढं १९६६साली प्रकाशित झालेल्या 'श्रीमत भावीसमीर वादीराज गुरुवर कृपातरंगगळु' नावाच्या दोन कीर्तनसंग्रहांना उडुपीच्या अष्टमठाच्या श्रीश्रीश्री

विश्वेशतीर्थ, श्रीश्रीश्री विद्यावारीतीर्थ, श्रीश्रीश्री विद्यावारंगगळतीर्थ, श्रीश्रीश्री विश्वोत्तमतीर्थ यांनी 'अनुग्रह-वचने' लिहिली आहेत.

राजवाडे यांच्या त्या वेळच्या सामाजिक लेखनाचा मुख्य विषय - स्त्री. त्यांचे सगळे निर्णय, तर्क, वाद-विवाद, दुःख-आनंद, समानतेचा वाद... सगळं काही उभं असायचं ते आध्यात्मिक आणि मानवतेच्या पायावरच. अध्यात्माकडे झुकलेलं, तरीही अंध न झालेलं, सत्यनिष्ठेचं मन होतं त्यांचं; त्यामुळेच मठाच्या स्वामींच्या संदर्भात त्या वस्तुनिष्ठ आणि निर्भयपणे लिहू शकत होत्या. जीवनातलं कटुसत्य पाहिल्यामुळे आणि अनुभवल्यामुळे अशा प्रकारच्या भयाचा मागमूसही त्यांच्या स्वभावात नव्हता.

त्यांचं जगणं समाजाच्या सामान्य रीतीत अडकत नव्हतं. त्यांच्या माघारी लोक आपसात संकुचित टीका-टिप्पणी करत असायचे; पण त्या आल्या की, त्यांच्यासमोर काही अपशब्द बोलायची कुणाची प्राज्ञा नसायची. सगळे नम्रपणे 'आक्का...' 'आक्का...' म्हणत राहायचे.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे धीट आणि अनुभवी असूनही आपल्यातल्या लेखिकेला स्वतंत्र व्हायला त्यांनी सोडलं नाही. साठाव्या दशकात आपल्या त्या आधीच्या उपक्रमांपासून त्यांनी निवृत्ती स्वीकारली. सगळी संपत्ती विकली आणि उडुपीच्या श्रीकृष्णाला सतत तीन सप्तोत्सव केले. आपल्या घराण्यात एक हजार तीनशे वर्षांपेक्षा जास्त जुनी असलेल्या शारदेच्या मूर्तीची उडुपीच्या चिटपाडी परिसरात प्राणप्रतिष्ठापना करून स्वतःच्या पैशानं देवालय बांधलं. लेखिका 'गिरीबाले'ला सावकाश मूठमाती देऊन कीर्तनकार म्हणून पुनर्जन्मच घेतला. तेव्हापासून त्यांचं जीवनच बदलून गेलं.

हे सारं जीवनात घडलेल्या वर-वरच्या घटनांमुळे बदललं, असं म्हटलं तरी त्या सगळ्या घटनांच्या सगळ्या तपशिलाला त्यांनी स्वतःच मूठमाती दिली होती. स्वतःच्या वैशिष्ट्यामुळे अग्रभागी राहू शकली असती अशी ही लेखिका अशा प्रकारे स्वतःतच विरघळून गेली!

त्यांनी मोठ्या आस्थेनं उभारलेल्या, एकही डाग नसलेल्या सुंदर मूर्ती असलेल्या त्या देवळाच्या कंपाउंडच्या शेजारीच आजही त्यांचं घर आहे. मला त्या भेटायच्या तेव्हा त्या याच देवळाच्या एका बाजूला असलेल्या एका छोट्याशा घरात राहात होत्या. देवळाची जबाबदारी त्यांनी एका कुटुंबावर सोपवली होती आणि त्या कुटुंबाला आपलं मानून त्या त्यांच्यासोबतच राहात

होत्या. देवळात येणाऱ्या-जाणाऱ्यांशी आत्मीयतेनं गप्पा मारत, ओळख नसलेल्यांशी मुद्दाम बोलून ओळख करून घेत, त्या राहात होत्या. स्वत:च्या रक्ताचं असं कुणीही नसताना, ते दु:ख पायदळी तुडवून त्या हसतमुखानं राहात होत्या. 'लहानपणी अत्यंत गरिबीत असताना मी देवीची प्रार्थना करायची, माझ्यावर दया कर; मला भरपूर पैसे दे! विद्या दे! कलेक्टर नवरा दे! किती मूर्ख मी! तेव्हा मी 'मूल दे' म्हणून मागितलंच नाही! माझं जाऊ दे गं! पण त्या देवीला तरी समजू नये काय; ही लहान मुलगी आहे, हिला काय मागायचं ते समजत नाही, म्हणून? बघ ना! नाही दिलं तिनं मला मूल!' असं म्हणून त्या हसायच्या.

***

राजवाडेंचा दिवस सुरू व्हायचा तोच त्यांनी रचलेल्या 'शारदा-सुप्रभात'च्या गायनानं. 'गिरीजाबाला' या नावानं त्यांनी रचलेली अनेक कीर्तने सदोदित त्यांच्या जिभेवर असायची. बोलता-बोलता आमच्याबरोबरच देव किंवा देवी बसली आहे असं वाटून त्या पटकन तालावर एखादं कीर्तन म्हणायला सुरुवात करत. गाता-गाता मध्येच थांबायच्या. म्हणायच्या, 'काय हा माझा आवाज! छे! किती सुरेख होता तेव्हा! आता कसा झालाय!' तसंच एकदा त्यांनी आपला अलीकडचा फोटो पाहिला आणि त्यांचं अंग शहारून आलं. म्हणाल्या, 'कोण? ही मी?... कशी होते! आणि कशी झाले!...' आणि हसल्या.

मग त्या फोटोवरची नजर न ढळू देता त्या म्हणाल्या, ''इह'चं मूळच देह! जेव्हा त्यावरचा मोह नाहीसा होतो तेव्हाच 'इह'चं सौंदर्य नष्ट होतं.''

त्या बेंगळूरला होत्या तेव्हा त्यांनी संगीताचे धडे घेतले होते. संध्याकाळी देवळात येणाऱ्या भक्तांना हार्मोनियम वाजवून त्या आपली कीर्तनं शिकवायच्या. आजही त्यांच्याकडून शिकलेली गाणी गाणारे उडुपीत अनेकजण आहेत.

घटकाभरही गप्प न राहणारा जीव होता तो! फुलं गोळा करायची, गुंफायची. मध्येच घंटेचा आवाज आला की लगेच कोण आलंय, तिकडं पाहायचं. देवळात कुणीही आलं, कुणीही गेलं असं होता कामा नये. आलेल्या प्रत्येकाची आपण चौकशी करायचीच. काही त्रास असेल तर त्याची चौकशी करायची. 'काही त्रास नाही, सहजच आलो होतो'


नवे कोरे

# प्रज्ञा आणि प्रतिभा

## वि. स. खांडेकर

संपादक

**डॉ. सुनीलकुमार लवटे**




**किंमत : २७०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

प्रज्ञा व प्रतिभा यांचे पंथ निराळे असले तरी व्यक्तीच्या आत्मिकशक्तीला आवाहन करणे आणि सामाजिक मन जागृत करणे, ही कामे दोघीही आपापल्या पद्धतीने उत्कृष्ट करू शकतात. प्रतिभा प्रज्ञेसारखी प्रशांत वृत्तीने जीवन कंठू शकत नाही हे खरे. स्वच्छंदपणा हा तिचा गुण आहे... पण हे सर्व कबूल करूनही आपल्या प्रतिभावंतांचा थिटेपणा, संकुचितपणा आणि दुबळेपणा शक्य तितका लवकर नाहीसा होणे गरजेचे आहे असेच मी म्हणेन. खाडीत होडी वल्हवत बसण्यापेक्षा खवळलेल्या समुद्रातून ती हाकारण्यात जातिवंत खलाश्याला अधिक आनंद होतो... खऱ्या कलावंताचा आत्माही असाच साहसी असतो.

**- वि.स.खांडेकर**

म्हणणाऱ्याला 'बरं, सगळं चांगलं होऊ दे' म्हणायचं. कुणी अनोळखी आलं की त्यांचा नमस्कार-प्रदक्षिणा होईपर्यंत त्या गप्प बसत; नंतर 'तुम्ही कोण? ओळखलं नाही!' असं म्हणत त्या ओळख करून घेत. त्यांना बोलणं अवघड वाटलं, तरी त्यांना बोलतं करत आणि समजूत काढत, 'आई आहे ना! तिच्या पायाशी आलात! आता सगळं चांगलं होईल!' आलेले निघून गेले की त्या पुन्हा आपल्या कामात मग्न होऊन जात. पूजा सुरू झाली की, त्या मग्न होऊन जात. पूजेच्या वेळी शंख फुंकायचा अधिकार त्या हयात असेपर्यंत त्यांचाच होता. गाल फुगवून शंखात जीव ओतायचा त्यांचा आविर्भाव मी एखाद्या फोटोत तरी का बंदिस्त करून ठेवला नाही, याची हळहळ आजही माझ्या मनात कायमची सलत राहिली आहे. व्यक्ती जिवंत असेपर्यंत मृत्यूचं स्मरणच होत नाही, हेच खरं!

पूजा नसलेल्या वेळी त्यांनी तीनदा घंटा वाजवली की, त्यांचा मानसपुत्र त्यांच्याकडे धावत यायचा. काय हवं-नको ते विचारायचा. त्याही 'का हाक मारली' त्याचं कारण सांगायच्या. सोबत असलेल्यांना 'कशी आहे आमची हाक!' म्हणत हसायच्या. आलेल्यांना प्रसादाचं कुंकू द्यायच्या. त्यांनी बोललेला नवस सफल झालाय का, याची चौकशी करायच्या. आणखी काय करता येईल, याविषयी सांगायच्या; काय केलं तर फळ मिळेल, हेही सांगायच्या. तेवढ्यात एखादी लांब वेणीवाली एक मुलगी यायची. तिचा दुसरे दिवशी लग्नाचा साखरपुडा. मग त्या देवीच्या कृपेनं कसा हा अचानक संबंध जुळून आला याविषयी सांगायला लागत. हे सांगत असताना तिथं आणखी कुणी यायचं. या लगेच त्यांच्या घरावर पडणारे दगड थांबले की नाही याची चौकशी करायला लागत. समोरच्याला एखादा प्रश्न विचारून बोलतं करायचं तंत्रही त्यांच्यापाशी होतं.

त्यांचं एक विचित्र होतं. कुणाचाही परिचय करून देताना राजवाडे त्यांच्या इतर तपशिलाबरोबरच त्यांची जातच नव्हे, असेल तर पोटजातीचाही आवर्जून उल्लेख करत. माझा परिचय करून देतानाही केवळ 'या ब्राह्मण' एवढंच न सांगता 'या कोट-ब्राह्मण' म्हणून सांगितल्याशिवाय त्यांचं समाधान व्हायचं नाही. आपण कोकणी, त्यातही राजापूर-कोकणी हे त्या आवर्जून सांगायच्या. आपल्या शिक्षकांपासून ते गड्यांपर्यंत प्रत्येकाचा उल्लेख त्या जातीनिशीच करत. हे करताना कुठंही कुठल्याही प्रकारचं

किल्मिष नसे. कदाचित ती त्या वेळच्या बोलण्याची अनिवार्य पद्धतच असावी. मी जेव्हा पंडित सेडीयापु यांचं चरित्र शब्दबद्ध करत होते, तेव्हाही मी हे पाहिलं होतं. वास्तविक पाहता हे दोघंही जाती-कुळाचा धिक्कार करत जगणारे होते हे त्यांच्या जीवनाच्या तपशिलातून दिसत होतं. या दोघांच्या जाण्याबरोबर ती बोलायची एक पद्धतच नाहीशी होऊन गेल्याचं मला जाणवलं.

***

ती काही आजची 'लिहिणारी' लेखिका नव्हती. कथा 'सांगणारी' कथाकार होती ती! ऐकणारे असतील, तर सांगणारं माणूस कधीच दमत नाही. सांगायचा कंटाळा नाही. त्याशिवाय ऐकत राहावं, आणखी ऐकत राहावं असं वाटणारी वैखरी! बोलायची सवय लागली तर लिहायची सवय वठून जाते काय? राजवाडेंच्या बाबतीत हेच घडलं. त्या बोलायच्या आनंदात कोणे एके काळच्या त्या 'गिरीबाला' नामक कथालेखिकेला पार विसरूनच गेल्या होत्या. त्या वेळी त्यांचे जे कथा-विषय होते, ते आता मौखिक सत्य होऊन संपूर्ण वेगळंच रूप ल्यायले होते. अविवाहित मुलींची कथा, घरावर दगड पडायची गोष्ट, मूल-बाळ नसणाऱ्यांची गोष्ट अशा अडचणीत असलेल्यांनी शारदाम्बेची केलेली विशेष पूजा; त्यामुळे त्यांना मिळालेलं यश अशा स्वरूपात त्या सुफळ संपूर्ण व्हायच्या. आता त्यांचं स्वरूप पूर्णपणे भिन्न झालं होतं. तेच कवितेच्याही बाबतीत झालं होतं. त्यांची जागा आता कीर्तनं आणि भक्तिगीतं यांनी घेतली होती.

◆

**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

**सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती**

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

**९४२०५९४६६५**

# पुस्तक परिचय



# सुर्वंता

ऊसतोडणी कामगारांच्या जीवनाचं वास्तव दर्शन




बा. ग. केसकर हे ग्रामीण साहित्यिक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचा जन्म माळशिरस तालुक्यातील कुरबावी (जिल्हा सोलापूर) येथे झाला. त्यांनी बी. कॉम. ही पदवी घेतली. केसकर यांच्या 'वायटुळ' आणि 'कुणाच्या खांद्यावर' या दोन कादंबऱ्या तसेच 'फलोट', 'गुऱ्हाळ' आणि 'डव्हाळं' हे तीन कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत.

यापैकी 'कुणाच्या खांद्यावर' या कादंबरीला ह. ना. आपटे पारितोषिक तर 'डव्हाळं' या कथासंग्रहाला रोहमारे पुरस्कार मिळाला आहे. तसेच 'कुणाच्या खांद्यावर' या कादंबरीवर आधारित रामदास फुटाणे दिग्दर्शित 'सुर्वंता' या मराठी चित्रपटाला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट ग्रामीण चित्रपट पुरस्कार मिळाला आहे.

केसकर यांची 'दही' ही कथा ज्ञानपीठ दिल्लीच्या भारतीय कहानियाँमध्ये समाविष्ट झाली आहे. केसकर यांच्या अनेक कथांचा इतर भाषांमध्येही अनुवाद झाला आहे.

**बा. ग. केसकर**




*नवीन लग्न झालेली देखणी सुर्वंता पहिल्यांदाच नवऱ्याबरोबर, मल्हारीबरोबर ऊसतोडणीच्या सीझनला जाते; पण तिथे गेल्यावर ऊसतोडणी कामगारांचं मुकादमाकडून होणारं शोषण पाहून ती अस्वस्थ होते. त्यात मुकादमाच्या वासनेची शिकार झाल्यानंतर तर तिची ही अस्वस्थता वाढते. आपली मुलंबाळंही या शोषणाच्या चक्रात अडकणार, हा विचार तिला हलवून टाकतो. त्यातच तेजराम नावाचा तरुण जमीनदार तिला जाळ्यात ओढू पाहत असतो. शोषणाच्या या चक्रातून बाहेर पडण्यासाठी ती तेजरामला वश होते. तेजराम तिला आणि तिच्या नवऱ्याला त्याच्या शेतावर कामाला ठेवतो; पण तेजरामशी असलेल्या चोरट्या संबंधांमुळे तिचं मन तिला खात असतं आणि मल्हारीला हे कळलं तर काय होईल, ही भीतीही असते. शेवटी जे घडू नये ते घडतं आणि सुर्वंताच्या स्वप्नांचा पार चेंदामेंदा होतो. सुर्वंताच्या माध्यमातून ऊसतोडणी कामगारांच्या जीवनाचं वास्तव चित्रण करणारी, मनाला चटका लावणारी कादंबरी.*

('सुर्वंता' पुस्तकातून)

गावाकडनं आली, एस. टी. स्टॅन्डवर उतरली तर कारखाना चालू झाला होता. आभाळात धूर बकाबका चालला होता. ट्रक, ट्रॅक्टरची वर्दळ चालू झाली होती. खकाणा, माणसांचा कोलाहल, ऊस फोडल्याचा आवाज सारे चिरपरिचित - आवाज कानावर आले अन् काहीसं खिन्न होऊन ती भराभरा कोपीतळाकडे जाऊ लागली. डोक्यावरनं बाजरीचं ओझं सावरीत! तळाला जाग आली होती. फडावरनं बाया आल्या होत्या. चुली पेटल्या होत्या. नळावर कलकलाट चालू झाला होता. गाड्या वजनकाट्यावर होत्या जणू. तिनं कोपीचं दार उघडलं. पाण्याची घागर घेतली, नळावरच्या झुंबडीत ती शिरली. बायांनी, सगळ्यांनी गावाकडनं केव्हा आलीस, कसं काय गावाकडं? तिच्या वाडीतल्या दोनचारजणी होत्या त्यांनी तर विचारून विचारून भंडावून सोडलं. आता सगळं काय सांगत बसणार. एक रात्र तर राहिलेली ती, जेवढं सुचलं तेवढं हूं हां हूं उत्तर देत तिनं सांगितलं. नळावरनं पाणी आणलं, पीठ बघून भाकरी केल्या. बेसन तव्यात टाकलं अन् भाकरी अन् बेसन घेऊत ती काट्याकडे गेली.

गाड्यातनं फिरून तिनं मल्हारीची गाडी हुडकून काढली. मलबा ऊस खात बसून होता. त्याला तसं ऊस खाताना पाहून तिचं आतडं कळवळलं. तिला वाटलं आपण उगाच घरच्या ओढीनं निघून गेलो, बिचारा दोन दिवस कसा जेवला असल? कुणी भाकरी टाकून दिल्या असतील का? आताच्या भाकरीची काय सोय केलीय् का नाही म्हणूनच ऊस खातोय अशा विचारानं ती कळवळली. ती पुढे झाली. तिला पाहताच त्याचा चेहरा उजळला. त्याचा शिणवटा दूर झाला. तोंडातली चुई बाजूला टाकत तो म्हणाला,

''आलीस व्हय? आता म्हणलाव आज काय पत्त्या दिसत न्हावऽ''

''तर वोऽ मला काय समजंना हिथं काय हाल असताव तेऽ'' ती भाकरीचं गठडं खाली ठेवत म्हणाली.

''कवाशीक आली? बरी हावत ना समदी? शालन, दादा, वैनी. आं?''

'हां, हां, समदी बरीऽ आगूदर भाकरी खावाऽ खात खात सांगतीव ती ऐका.''

त्यानं उसाची कांडी गाडीच्या उसात खवली. धोतराला हात पुसत त्यानं पितळी तशीच हातात घेतली. बेसनाला तुकडा लावत तो ऐकू लागला. तिनं

सगळं सांगितलं, पैसे दिले. सुमडी लावूक ठेवलीय, शालन बरी हाय. शाळेत जाया नको म्हणतावऽ वाडीत करमत न्हाय त्यास्नीऽ कामाची सवऽ अशा गप्पा झाल्याऽ

"तू खाल्लीस भाकर?"

'आतावोऽ केल्या की हिकडंच आली ना."

"मग खावाची न्हायऽ घे म्हन."

"या बयाऽ मी खाईन म्हणं कोपीवंऽ तुमी खावाऽ दोन दीस पोटाचं हाल झालंऽ काय केलं भाकरीचं?"

"काय करतूय्ऽ पाटलुची मंडळीच आनत हुतीव दोन भाकरी जादा टाकून. आजबी पाटलुचा पोरगा घेऊन ईलच बग."

"न्हाय आनायचाऽ मी आल्याली देखलाव जणू..."

तिनं पितळी घेतली, फडकं झटकलं अन् कोपीकडं निघताना हळूच म्हणाली "कितीक एळ लागंल म्हनावा कोपीव यायला?"

डोळे मिचकावीत तो म्हणाला, "व्हईल लौकरच काटाऽ का गं?"

"जावाऽ मला न्हाव ठावं, " ती मुरका मारीत म्हणाली तसं दोघंही हसली. तो अधीर झाला. थोडंसं पुढे सरकला. तसं ती मानेला झटका देऊन भराभरा चालू लागली.

...कोपीवर गाडी केव्हा सुटली, बैल बांधून गडीमाणसं कोपीत शिरली केव्हा हे तिला लौकर समजलं नाही. ती एस. टी. प्रवासानं दमून गेली होती, अंग आंबून गेलं होतं. तिला गाढझोप लागली होती; पण गाडी सुटल्याच्या थोड्याशा आवाजानं तिची झोप चाळवली होती. दुसऱ्या क्षणी तिच्याभोवती मल्हारीच्या हाताची बळकट मिठी पडली होती अन् ती त्याच्या कुशीत हरणासारखी शिरली होती.

कुठलं गाव होतं कुणास ठाऊक! तिला हिकडच्या गावांची नावं एक लक्षात राहत नसत. आणि त्यांना गावाशी काही कर्तव्य नसे. चीटबॉय, मेम्बर फड दाखवत तो तोडायचा, सवळायचा, कारखान्यावर न्यायचा. वजनचिठ्या चीटबॉय गाडी फडातनं निघतानाच देत असे. नाही आला तरी तळावर देत असेच. त्यामुळे गावांची नांव तिच्यासारखीच्या ध्यानात राहणं शक्य नसे. त्यातही ज्या बरीच वर्षं सीझनला येत होत्या त्यांना ऐकून ऐकून पाठ झाली होती. रस्ते माहीत झाले होते. तर त्या गावातनं गाड्या निघाल्या

होत्या. आज काय होतं...सकाळी सकाळी गारठ्यातनंसुद्धा पोरांची प्रभातफेरी निघाली होती. एवढीएवढी पोरं धुवट चड्ड्या-शर्ट घालून, हातात हात घालून ओळीनं 'एक दोन तीन चार...गांधीजींचा जैजैकार-' करीत चालली होती. गुरुजी, शिकवणाऱ्या बाया बाजूनं, पुढं-मागं चालल्या होत्या. हां, सव्वीस जानेवारी असंल. तिनं कौतुकानं पोरांच्याकडे पाहिलं. थंडीत काकडतही ती उत्साहाने ओसंडून गेली होती. मोठ्याने घोषणा देत होती. पटांगणावर जाणार होती. झेंडावंदन, कवायतीचे कार्यक्रम होणार होते. खाऊ मिळणार होता. खाऊ खात सुमार घराकडे पळणार होती. सुट्टी म्हणून खूश होणार होती. ती हे सगळं बघून मनी उदास झाली. आपल्या पोराबाळांच्या नशिबी कुठलं असलं! लहान हाय तवर जवळच बरोबर घेऊन फडात जायचं. सहा महिने इकडं, सहा महिने तिकडं गावी. कसली शाळा, कसलं शिक्षण? जरा मोठा झाला की वाढं वेचायला न्हायतर म्हशी, वगारी सांभाळायला गाडीबरोबरच हायचऽ एकदा का ह्या चरकाला जुपला की संपलंचऽ आयुष्यभर हेच. कसं आपल्या पोराबाळांचं व्हायचं? ती कधी शिकणारच नाहीत, कधीच शाळेत जाऊ शकणार नाहीत. त्यांच्या नशिबी कधी असली प्रभातफेरी, सुट्टीचा आनंद, खेळ, अभ्यास, परीक्षा, शिकून मोठ होणं, अधिकारी, नोकरदार होणं नाहीच का? आपलं मन नाही त्या गोष्टीवरनं भरकटतं, नाही नाही ते विचार करतं याचा तिला अगतिकपणे राग आला. बाकीच्या बायका गाडीत धोतर पांघरून गपचीप पडल्या होत्या. त्यांनीही कौतुकभरल्या नजरेनं ही फेरी पाहिली होती; पण तेव्हढंच तेऽ पुढे त्यांचा विचार फड कुठंशी असंल, केव्हाशी येतूय्, भाकरी आताच खावावी काऽ असलेच.' एकीच्याही मनात आपल्या पोराबाळांविषयी विचार येऊ नये...मनावर घट्ट झाकण टाकल्यासारखं...ती या विचारात गढून गेली. मनात हलकल्लोळ माजला. ती पुढं सरकून मल्हारीला म्हणाली,

''बघितलीव फेरी? केव्हढीशी पोरं कशी वरडत चाललीव?''

'तरऽ आज सवीस जानेवारी आसंल '' तो बैलांना कोरडा हाणत म्हणाला, ''आज साळंला सुट्टी...''

''मजा आसतीय ह्या पोरांचीऽ'' ती म्हणाली, ''साळा सिकाय मिळतीवऽ''

''हां...'' त्याचं लक्ष गाडीकडं, बैलांकडं होतं.

''ऐकताव? मी काय म्हनतीवऽ ह्या पोरांचं बरं असतावऽ आपल्या पोरांचं कसं हुणार?''

''अगुदर हुं दी तर...'' तो हसत म्हणाला.

''जावं द्या. तुम्हाला जवा तवा चेष्टा सुचतीवऽ पर आपला खरं इचार कराय् नगो?''

''कश्याचा?''

''आनि कश्याचाऽ आवो आपून एक जलमभर कष्ट करताव ती करताव. आपुनल्या पोराबाळांस्नी बी हेच कराय लावनार. आं?''

''आगं असं कसं? आपला पोरगा ऱ्हाईल ना वाडीव चुलत्यापाशीऽ शिकंल साळाऽ मायंदाळऽ त्याला आपून बीडाला ठिवूऽ तू का घोर करतीव?''

'कश्यानं ठिवताव? मुकादमाच्या कर्जाव? कश्याची साळा आपल्या वाडीतली वो? मास्तर तं रिकामा बसला हुताव बिडी फुकत! कोन हाव का त्या साळंतऽ समदी हिकून तं आल्यालीऽ''

''आता काय करतोसऽ आपला भाग दुष्काळीऽ आसं जर पानी असतंव तर आपुनबी कश्याला आलू असतावऽ इंचवागत बिऱ्हाड पाठीव घिवून?''

''गोठ खरी हावऽ परे मी म्हन्तीऽ न आपून हिकडंच कुठं वाटाबिटा करून राहिलाव तं...''

''आं?'' तो मुंगळा डसल्यासारखा हलला. मागं वळून बघत म्हणाला, ''काय?''

''नाय मी म्हन्तीऽ हिथ्थलाच एखाद्याचा वाटा केलावऽ चार पैसे बी मागं पडत्यालंऽ पोरांची शिक्षान भान हुतावऽ कुठं गेलं मसनवटीत तं बी आपल्या मागचंऽ कष्ट काय चुकत न्हावऽ'' ती भडभडून आल्यासारखी बोलली.

''एक डाव सीझनला आली त कंटाळलीस? अगं आमच्या म्हाताऱ्यानं, कारभाऱ्यानं कसं दिस काढलं बघ आताऽ आसं आपल्या धंद्याला कंटाळून कसं चालंल?''

''मी काय कष्ट कराय नगं म्हनतीव? मी म्हनतीऽ आसल्या वांझोट्या कामाचा काय उपेग हाव? वाळूत मुतलं, वळ ना फळ... त्या दिसची बाई म्हन्तीऽ वाटा केला तं सालाचं दाणगिण येतावऽ कापसाचे पैसे दिपवाळीला येतावऽ खुरपाना वेचणीचं काम असतावऽ तुम्हाला बी कोंचं बी काम

असताव-''

''हे बोलत हुताव दोघी त्या दिशी व्हय? तरीच म्या म्हटलाव इतक तं कश्यात गप्पा रंगल्या म्हून.'' तो हसत म्हणाला.

''नाय, मला बायकाच्या जातीला काय समजताव खरंऽ पर आपलं आपून इचार करावा म्हनतीऽ''

''अगं पर ह्या नितराशीनं बोलावच्या गोठीऽ कारभारी काय म्हनतावऽ झालंच तर मुकादमाची उचल भागवावी लागंल नं? एवढा पैका कुठून आनावा?''

फड जवळ आला. गाड्या फडांत शिरल्या, गडी ऊस तोडायला लागले. बाया धडपे अंगाभोवती गुंडाळू लागल्या. विळा घेऊन सवळायला लागल्या. तिचं बोलणं अर्धवटच राहिलं. ती मुकाट्यानं धडपा कमरेभोवती गुंडाळू लागली.

आपल्यासारखंच त्याच्याही मनात आपण थोडंसं कावार सोडून दिलं, याचं थोडंसं समाधान तिला वाटत होतं.


डोक्यावर जळणाचा भारा, हातात केळी, कमरेला विळा खवलेला, दिवसभराच्या कष्टानं अंग नुस्त रॉवरॉव करतेल, कारखान्यापासनं फड बराच लांब, तिथून चालत यायचं म्हणताना पायाचे गोळे दुखून आलेले. बाकीच्या संगतीच्या बाया बघत बघत पुढे गेलेल्या, तिचं ते तसं झाल्यापास्न तिची कंबर दुखू लागे. दिवसभर वाकवाकून पुन्हा चालायचं म्हणजे कमरेतनं बारीक कळा निघत आणि मग नकळत ती मागे राही. कारखाना आता नजरेच्या टप्प्यात आला होता. धूर ओकणारी चिमणी, मोठ्या इमारती, देवळाची टेकडी, सगळं दिसत होतं.

ती आपल्याच नादात चालली होती. तिचे विचार येऊनजाऊन पाण्यातल्या भोवऱ्यासारखे त्याच एका विचाराभोवती गरगरत राहत. ह्या भोवऱ्यातनं बाहेर पडायचं. जन्मभर असं कष्ट करून मरायचं नाहीऽ या चक्रातून बाहेर पडायचंऽ कुठंतरी स्थिर व्हायचं. उगं आपलं बेलदार, फासेपारध्यावानी पाल गाई, गाढवांवर, बैलांवर लादून ह्या गावाच्या त्या गावाला गेल्यासारखं जगण्यात काय अर्थ आहे, एका जागी रहावा, बक्कळ कष्ट करावेत, पोरंबाळं शाळेत जातील, आपण दर वर्षाला एखाददुसरं भांडं घ्यावंऽ कोपटातला का होईना संसार उजळ ठेवावा, भांडी लखख ठेवावीतऽ

नवे कोरे

# डिंभक

डॉ. संजय ढोले




**किंमत : १९५/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

नॅनो तंत्रज्ञानाद्वारे मृतांना जिवंत करण्याचा प्रयोग... मृत माणसाच्या मेंदूचं रोपण जिवंत कुत्रीच्या शरीरात करणे... भविष्यात नेऊ शकणारी खुर्ची आणि एका राजकीय नेत्याने तिचा केलेला गैरवापर... शिशाच्या अणूचे सोन्याच्या अणूमध्ये रूपांतर करण्यात यशस्वी झाल्याने मालामाल झालेला शास्त्रज्ञ... परग्रहावरील डिंभक... पिंजकांमुळे लाभलेल्या अदृश्य होण्याच्या शक्तीमुळे एका शास्त्रज्ञाने अतिरेक्यांचा केलेला खात्मा... क्लोननिर्मिती... गर्भाबरोबरच वाढणाऱ्या ट्यूमरला शास्त्रज्ञाने दिलेली मात... ग्राफीनच्या कणांवरचं संशोधन... विशिष्ट प्रयोगाद्वारे खुन्यांपर्यंत पोचणारा शास्त्रज्ञ... एक विचित्र कीटक... अशा विविध वैज्ञानिक संकल्पनांचा सदुपयोग, दुरुपयोग करणारे शास्त्रज्ञ... त्यातून घडणारं मानवी मनाचं दर्शन... वैज्ञानिक संकल्पना आणि मानवी मन यांच्या गुंफणीतून साकारलेल्या रंजक कथांचा वाचनीय संग्रह.

सणावाराला ग्वॉडध्वाड करावा, नवऱ्याला खाऊ घालावं आन आपून बी खाऊन घटीकभर इश्रांती घ्यावी; पण या असल्या दिवसरात्र नुस्तं कष्ट न् कष्ट उपसायच्या अन् लोकांच्या भरती करणाऱ्या धंद्यात राह्यला नको... मुकादमाच्या आठवणीनं ती शहारलीऽ पेटून उठली. पुन्हा तिच्या मनात आलं, आता आपलं तसं ते पोटचं पडलं म्हणून गप्प बसलाऽ न्हायतर पुन्हा मागं लागल्याशिवाय राहिला नसता. लांडग्याच्या तोंडाला एकदा शेरडीचं रगात लागलं की त्याला दम निघतोय? म्हणजे आज नाही उद्याऽ मांसासाठी सांभाळणारी कोंबडी जशी गुबगुबीत व्हायची मालक वाट बघतोय तसंऽ बरं तोंड दाबून बुक्क्याचा मार... त्यापेक्षा तो पाटील...पाटलाचा विचार येताच नकळत मन हळुवार बनलं, बावरं बनलंऽ असं का व्हावं?... त्याचं रुबाबदार चालणं, अंगावर आल्यासारखं बोलणंऽ त्याचा बंगला, भरगच्च शिवारऽ त्याच्यामुळे झाला तर आपला फायदाच होईलऽ धापाच एकराचा वाटा मिळाला तरी बासऽ झालं तर दुधाला एखादी शेळीऽ जळान काटूक तसंचऽ काय खर्च येतूयऽ भाजीपाला असतूयचऽ ती मावशी म्हणली तसं सुगीच्या दिवसात खळीदळी करायची, धान्याची बेगमी करून ठेवायचीऽ कापसाच्या वाट्याचे पैसेऽ निगुतीनं संसार करायचाऽ एखादा डागडूग झाला तर वाक्याऽ नथ ...ती आपल्यातच हरवून गेली... तिच्या मनापुढे तिच्या बहरलेल्या संसाराचं चित्र उभं होतं- एवढासा बाळकृष्ण अंगणात दुडुदुडू धावत होता- मागनं फटफटीचा हॉर्न अगदी पाठीशी वाजला म्हणून ती दचकून बाजूला सरली, ''अगं बयाऽ'' करत.

तिनं मागं वळून पाहिलं. नेमका तोचऽ एखाद्या अबलक घोड्यावर पक्की मांड टाकून बसलेल्या शिलेदारागतऽ ती घाबरली. सावरलीऽ नकळत हसू फुटलं.

''तुम्ही हावऽ''

''मंगऽ आमच्या फटफटीला कुठं चैन पडतंय्ऽ सारखी पळतीय् नव्हं का तुझ्या मागंच...'

''......!''

''का? बोलंनास तीऽ आयला कवा रिकामंबिकामं असताय् का न्हायऽ जवा तवा आपलं वाघ मागं लागल्यावानी पळताचय्चऽ''

''काय करीतावऽ कर्माला हाय त्यो भोग भोगलाच पायजेलऽ

तुमच्यासारख्या मोठ्यान्‌ला आमच्यासारख्याची कनव का कायऽ''

"आसं कसं बरंऽ कायतरी वाटतय्‌ म्हणून तर फटफटी मागे पळतीय नव्हं?''

तिला वाटलं फटफटी मागं पळतीय म्हणजे गरिबाची कणव म्हणून नव्हे तर आपलं हे देखणं शरीरऽ जवानी... तिनं मान झटकलीऽ कायतरी दिल्या घेतल्याशिवाय व्यवहार होत नाही. सौदाच... आपल्याला या चिखलातनं, गाळातनं बाहेर पडायचं तर कुणाचा तरी हात धरला पाहिजे. देणारा हात देतोय्‌ तर तो झिडकारला तर ह्या गाळातच मरायचं...

"काय? आयला काय वेड्यावानी माझ्या तोंडाकडं बघत राहिलीया... मी काय सांगतंय्‌... रातच्या आठच्या भोंग्याला कॅनालकडं यी... मी वाट बघतु...''

"आं–?...कायतरीच...''

"कायतरीच नव्हं... मी वाट बघतूय्‌...'' जरबेनं सांगितल्यागत करून त्यानं झटक्यात फटफटी चालू केली अन्‌ धुरळा उडवत तो निघून गेला.

ती आचारी का बिचारी झाली. काय करावं, जावं का न जावं?

आपल्या देखणेपणात तो हुरळलायऽ पण एकदा का फूल हुंगलं की दील फेकून. त्याला काय भुंग्यासारखं ह्या फुलावरनं त्या फुलावर... असं नाही व्हायला पायजे. त्यानं आपल्याला या चक्रातून, गाळातून बाहेर काढायला मदत कराय पायजे... वाटा द्यायला पाहिजे... त्याच्या बंगल्यासमोरच झोपडी.... हं...त्या नादात तरी तो जागा देईल...त्याला बरंच की...पण हे बरं आहे का... आपण मल्हारीची फसवणूक करतोय्‌... मुकादमानं ते केलं, बळजबरीनं का होईना; पण तिला कुसकरली त्यावेळीच झाली की फसवणूक! कुठे आपला धीर झाला त्याला सांगायचाऽ अन्‌ सांगितलं असतं तर त्यानं तरी आपल्याला घरात ठेवलं असतं का...म्हणजे आपली चूक नसतानासुद्धा आपल्यालाच शिक्षा भोगावी लागली असती. आता आपून करतोव ते त्याच्या भल्यासाठी, त्याच्या पोराबाळांसाठीच... त्याचा वंश चांगला वाढावा...त्यानं म्हातारपणी निवांत हरीहरी करत बसून खावंऽ पोरंबाळं मोठी शिकून नोकरीला लागावीत यासाठी आपल्या देहाचं काय वाटंल ते झालं तरी चालेल...

एकीकडे हे काही खरं नाही असं आपल्या शीलाचंऽ शरीराचं दान

करून संसार सजवण्यात काय अर्थऽ मुकादमानं केलं खरं; पण आपल्या मनात तर त्यावेळी नव्हतं ना काही. म्हणजे आपण मनापासनं काही त्या गोष्टीत भाग घेतला नव्हता. ती फसवणूक नव्हती. आता मात्र जाणूनबुजून फसवणूक... चोरटेपणा... विचारानं तिचं डोकं फुटायची वेळ आली. मुकादमाच्या वेळी मन स्थिर होतं-मनात त्याच्याविषयी अंगार फुलला होता. अन् मल्हारीविषयी अढळ माया, प्रेम होतं ... आता मात्र मनच ढळलं होतं, वढाळ गुरासारखं दावं तोडू पाहत होतं, हिसके मारत होतं, शेलकं खायला पुढे दिसत होतं अन् मन धाव घेत होतं... सगळं सांभाळून काय हरकत आहे? असं मन तिला म्हणत होतं... बाकीच्या बायका असं करीतच होत्या... पण तो नुसता बाजार. आपण ह्यातनं बाहेर पडू... चांगलं राहू... चार आठ आण्यासाठी निजायची तयारी नाही आपली तर... माझा संसार-माझी पोरं याची चांगली सुई लागली पाहिजे. आता ह्याच्याकडूनसुद्धा काय घेयाचं नाही...नोटा नकोत, गोठा देऽ पैसा नको, पसा देऽ त्यात आम्ही गरिबीनं राहूऽ मल्हारी अन् मी... तुझ्या एवढ्या पसाऱ्यात आमच्या संसाराचा पिसारा फुलू दे... असलं काहीबाही... त्याचं बलदंड शरीर काय न काय-तिचं मन सैरभैर होऊन गेलं... या कष्टानं इडाळलेलं मन या विचारात फुलून गेलं. नकळत त्याच्याकडे जायचं म्हणू लागलं.

ती भराभरा कोपीवर आली. घाईघाईनं सैपाक केला. भाकरी भाजल्या अन् जेवणाचं गठूळं घेऊन लौकर काट्यावर गेली. मल्हारी नंबरवाल्याकडनं नंबरासाठी भांडत होता. टोकन घेऊन तो गाडीकडे वळला तर ही गाडीपाशी उभी...

''आं? आज एरवाळीचऽ''

''हूंऽ आटपलाव मग...'' ती खाली पाहत म्हणाली. तिचा ऊर धडधडत होता. होता.

''आज लई तरास झालावंऽ बरं झाली बिगीबिगी आली तेऽ'' त्यानं गठूळं हातात घेत म्हटलं.

''हलताव मी...'' ती म्हणाली.

''का गंऽ जेवान हुस्तर थांबत न्हावऽ''

''मला बी भूक लागलीवऽ'' ती त्याची नजर टाळत म्हणाली.

''मंग खा म्हनावी ह्यातलीच...'' तो म्हणाला.

“नकूऽ तुमचं तं प्वाट भरीत् का न्हायऽ तुम्ही खावाऽ माझी हाव कोपीव.”

“बरंऽ आलूच यो काटा झालाव की...”

“तरी धाअकरा...हुणारचऽ” तिनं प्रथमच त्याच्याकडे पाहिलं. तो हसला.

“आता काय विलाज हावऽ गाडी तं रिकामी होवी नाऽ”

“तरऽ ह्याच्यातनं काय सुटका न्हाव आपली.”

तो भाकरी खात राहिला. ती निघाली.

रस्ता ओलांडून कोपीतळाकडं जायच्या ऐवजी सरळ रस्त्यानं फाटा ओलांडून फाट्याच्या कडेनं पट्टीनं चालत निघाली. अंधार गुडूप होता...कारखान्यावरचे दिवे अंधूक प्रकाश फेकत होते. कॅनालचं पाणी अंधारात दिसत होतं. तिला फार पुढे जावं लागलं नाही. फटफटी उभी होती. ती फटफटीला अडखळायची एवढ्यात त्यानं पुढे होऊन गपदिशी आपल्या मिठीत घेतली.

कोपीवर आली तर सगळं अंग ठणकत होतं, तरीही मन निवलं होतं. अनोखे सुख, अनोखी धुंदी. त्याचं सगळंच वेगळंऽ तिच्या मनातलं उरलंसुरलं मळभ गेलं होतं अन् ती सावरली होती. ह्याही व्यवहाराचा तिच्याशी तिनं अर्थ लावून घेतला होता. समाधान करून घेतलं होतं. त्यानं तिला जाताना एक नोट हातात दिली, होती. पन्नासाची तरी असावी, विसाची नक्कीचऽ पण ती तशीच माघारी त्याच्या हातात कोंबत ती म्हणाली होती, “पैशात मापू नकावंऽ मी मागंन तवा न्हाय म्हणू नगाऽ” तो आश्चर्यचकित झाला होता. त्याला हा अनुभव नवीन होता. आजपर्यंत इतक्या बायका...दोन रुपये दिले तरी खूश अन् ही...थोडंसं हसत तिचा हात दाबून धरत तो म्हणाला होता, “त्याच्या ऐलाऽ काय बी मागऽ न्हाय म्हणलू तर...”

“बासऽ बास पैन लावायची काय गरज न्हावंऽ”

तिला सगळं आठवत होतं अन् बरं वाटत होतं. आता या भुयारातनं बाहेर पडण्याचा रस्ता दिसला होता. उजेड दिसत होता. वाट घावली होती. ती कुशीवर वळून झोपी गेली.

◆

**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# पुस्तक परिचय



## डव्हाळं

ग्रामीण जीवनावर आधारित वैशिष्ट्यपूर्ण लक्षवेधक कथासंग्रह

**बा. ग. केसकर**

*'डव्हाळं' हा श्री. बा. ग. केसकर यांच्या सोळा कथांचा संग्रह.
या संग्रहात श्री. केसकर यांनी ग्रामीण जीवन आणि
त्या जीवनातील समस्या, गुंतागुंत व मूल्यसंघर्ष
यांचं प्रत्ययकारी विश्लेषण केलं आहे.*


*आजच्या ग्रामीण जीवनात सुनी जीवनमूल्ये,
अंधश्रद्धा आणि कालबाह्य परंपरा काही प्रमाणात कमी होत आहेत,
परंतु त्याऐवजी नवी जीवनदृष्टी आणि नव्या यंत्रयुगाच्या
प्रखर वास्तवाचं भान मात्र आवश्यक त्या प्रमाणात येत नाही.*

*त्यामुळे एकीकडे दारिद्र्यात राहूनही कष्ट करणाऱ्या
ग्रामीण स्त्रीविषयी सहानुभूती वाटते,
तर दुसरीकडे अन्याय, शोषण करणाऱ्या समाजातल्या
एका समूहाविषयी विलक्षण संताप निर्माण होतो.*

*नवी पिढी मात्र संवेदनशून्यपणे, वास्तवाकडे
मुर्दाडपणे (की अगतिकतेने?) पाहत जगत आहे.
ही अनाकलनीय शोकांतिका वाचकाला अंतर्मुख करते.*

('डव्हाळं' पुस्तकातून)

## अग्निदिव्य




तसं काहीही कारण नव्हतं तरी तिला आज उगीचच उदास वाटू लागलं होतं. अशुभ घडंल असं वाटणारं. दुपारची वेळ होती. गावात एक प्रकारची उदासीन शांतता भरून राहिली होती. दूर नांदुर्कीच्या झाडाखाली खेळणाऱ्या पोरांचा कालवा ऐकू येत होता. मधूनच कुठल्यातरी बाभळीच्या झाडावर साळुंक्या बोलत; गप्प होत. घरातलं सगळं आवरलं होतं. कधी नाही ती सासू म्हणणारीनं गड्यांच्या भाकरी घेऊन रानात गेली होती. घर रिकामं होतं. एवढा मोठा वाडा सुना होता. पुढं ओसरीला तिचा नवरा गप उताणा पडलेला. तेव्हढाच माणसाचा पायरव धाकाचा. चौकात बंब, पुढं बादली निमूटपणे ऊन सोशीत होती. एखादं खरकटं भांडंही त्यांच्या सोबतीनं होतं. कोंबड्या पण उन्हाच्या कुठंतरी दूर दाणं टिपायला गेलेल्या. कधी घरी न राहणारा नवरा जेवून सरळ ओसरीवर घुम्यासारखा उताणा पडून राहिला होता. मधूनच खांडावरची पाल चुकचुके. या अबोल शांततेनंच तिला उदास वाटू लागलं होतं. माहेरची आठवण येऊ लागली होती. एवढं मोठं घर खायला उठलं होतं.

तिनं धुण्याचा भारा उचलला अन् नदीवर जायला निघाली. तिनं चपला सरकवल्या तसं टक्क डोळ्यांनी खांडाकडं पाहणारा नवरा बोलला, ''लवकर ये; लई येळ लावू नगो.''

आवाजात जरब होती. विनाकारण.

''मी काय तिथं पोहत बसणार का शिवनापाणी खेळत बसणार आहे? हा धोंडा नसला रिकामा तर थोडा वेळ बसावं लागतंय; पण ह्या वेळेला कुठली गर्दी तरी नदीवर? साऱ्या रानावनांत पांगलेल्या. आपल्यासारख्या एक-दोघी तर असतात. ह्यानं असं का बजवावं?''– मनाशी विचार करीत, ल्हयाऽल्हया करणारं ऊन डोक्यावर घेत ती नदीकडे निघाली. मनाशी अशुभ विचाराचं सावट होतंच.

‘असा कसा नवरा? एवढा मोठा बारदाना. एकुलता एक. सासरा नाही. सासू म्हणणारनीनं सौंसार चांगला सांबाळला, वाढवला म्हणून आपल्या बापानं जास्त पैका खर्च करून हिथं दिलं; पण नवऱ्याचा घुमा स्वभाव अन् सासूचा खाष्ट! दोन्हीकडनं तिची मुस्कटदाबी होत होती. सासूला वाटे, हिनं माझ्यापेक्षा जास्त राबावं. मी नवऱ्याच्या माघारी संसार केला; वाढवला. हिचंच तिला कौतुक आणि सून गौरीसारखी नाजूक. हिला काय असलं जमतंय अन् कसं व्हायचं तुझ्या सौंसाराचं बाबा! माझ्या माघारी हे भजन. आता ही तरी काय आईच्या पोटातनंच शिकून आली होती? प्रसंग पडला की, माणूस देतंय तोंड.’’

मी नवीन आहे. अजून आपल्याला रानाचे नीट बांध माहिती नाहीत अन् मी काय लगेच दारी धरणार की खुरपणं करणार आहे? बघत बघत सगळं जमतंयऽ. आपण काय नाबर नाही की कोंच्या गोष्टीत अडाणी नाही; पण ते ह्यांनी जरा दमानं घ्यायला पाह्यजे. जबाबदारी टाकून बघाय पायजे. ती सारखी मागं लागती. घालूनपाडून बोलती. माहेराचा तर धा वेळा उद्धार! असं वाटतं, एक डाव मला बोला पर माझ्या बाचं नाव काढायचं कारण न्हाय; पण दरवेळी घुटका गिळायचा.

अशा विचारातच ती नदीवर पोहोचली. भराभर पिळे पिळले. घसाघसा धुतले. बादलीत पिळे ठेवून दगडानं हातपाय घासले. आरस्पानी शांत पाण्यात आपलं रूप न्याहाळलं. स्वतःच्या गोल गोऱ्या साजसुरती चेहऱ्यावर तीच खूश होती. सगळ्या त्रासाचा, विचाराचा विसर पडला अन् मन हल्लक झालं. कुठल्यातरी लयीत ती धुण्याची बादली डोक्यावर घेऊन वाड्यावर आली. उन्हाचा आता भर होता. दोन तरी वाजले असावेत. सगळीकडं कसं चिडीचिप होतं. ऊन रणरणत होतं. गावातली खिडारं, पडक्या भिंती अधिकच उदासवाण्या दिसत होत्या. तिला परत कसंतरी वाटू लागलं.

दारातून आत शिरून तिनं बादली खाली ठेवली. एकेक पिळा उलगडून, झाडून ती वलणीवर वाळत टाकू लागली.

‘‘इतका उशीर?’’– नवऱ्यानं तारवटलेल्या डोळ्यानं विचारलं. तिला वाटलं, दारूबिरू पिऊन आला की काय हा? विचार तरी काय ह्याच्या मनात? एवढा मोठा वाडा अन् हा असा एखाद्या टपून बसलेल्या वाघासारखा. नवरा असूनही तिचं काळीज हाललं.

''लगीच तं आली. काय गर्दी नव्हती!'' ती हळू आवाजात बोलली.

'गर्दी नव्हती? आन् मंग इतका वेळ कसा लागला? का बसली होती कुणाशी गोष्टी करत? व्हय तुझ्यायला!'

तिच्या संबंध शरीराला आकडा आला. असलं काही सासू किंवा नवरा बोलला की, तिचं शरीर ताठरून जाई. कणन्कण संतापानं थरारून उठे. माझं देखणेपण गावातल्यापेक्षा ह्यांनाच जास्त खुपतंय. हे एक त्रासाचं कारण होतं. सासू नेहमी ह्या देखणेपणावर करवादायची. आता सुंदर असणं तिचा गुन्हा होता का? बरं एवढं होतं तर मग एवढी देखणी पोरगी करायची कशाला? नेहमी, 'इतका का वेळ लागला? कुठं थांबली होतीस? कुणाशी बोलत हुतीस?'

पयल्यांदा तिला वाटायचं, सासू आहे, विचारणारच; पण पुढं तिला ह्यातली खोच कळायला लागली. प्रत्यक्ष सासूचीच या बाबतीत आपल्याबद्दलची दृष्टी साफ नाही हे तिला जाणवलं. हे उगीचच होतं. तिच्या देखणेपणानं ती दोघं मायलेकरं संशयी बनत होती. कदाचित म्हातारीला आपल्या पोराबद्दल आत्मविश्वास नसेल. तुझा पोरगा जर मला सुख द्यायला समर्थ आहे, तर मी दुसरीकडं काय म्हणून शेण खाईन! पण दोघांना विनाकारण संशयाची बाधा झाली होती अन् ती कशी नाहीशी करावी हे तिला समजत नसे.

आताही तिला त्याच्या बोलण्यातला विखार जाणवला. वाड्यातलं एकाकीपण जाणवलं अन् ती हळू आवाजात म्हणाली, 'जायायेयाला अन् तिथं धुवायला जेवढा येळ लागला तेव्हढाच! बाकी काय?'

''मलाच उलट इचारतेस?'' तो सोप्यात बसत म्हणाला.

''मी कशाला उलट बोलू? मी तेच म्हणतीया-''

''काय म्हणतीया?''

'......!'

''का टाळं लागलं का तोंडाला का वाचा बसली? कशी सांगचील म्हणा! अशी काय कोंची बाईल सांगल व्हय नवऱ्याला की, अमक्या बरुबर गप्पा मारीत व्हते, अमका भेटला हुता–'

''कायतरी काय बोलताय?'' मान वर करून त्याच्याकडं बघत ती म्हणाली.

त्याचा संतापानं फुललेला चेहरा पाहून ती घाबरली. संताप. विनाकारण. संशय का? पण– आपलं काहीही चुकलेलं नसताना.

''कायतरीच व्हय?''

''कायतरीच न्हायतर काय! उठा. चुळगुळणा करा. च्या करते. रानाकडं जावा. आतीबाय म्हणत्याल, बसली राजारानी गुलूगुलू बोलत.'' ती वातावरणातला ताण कमी करण्याच्या उद्देशानं बोलला; पण परिणाम निराळाच झाला.

'काय कोंगाडपण भरलंय तुझ्या अंगात आ? म्हंजी उशीर का झाला हे इचारलं ते सांगायचं राहिलं बाजूला. पर आता मातुर कमाल झाली. म्हंजी, मला आपलं मळ्याकडं पिटाळलं की याराला घेऊन बसायला बरं! कोण बघतंय ह्या टैमाला; आयला तुझ्या! कुठं असलं कौसालपण शिकली गं?'

जे बोलावं ते अंगाशी यायला लागलं होतं. कानात तापलेला रस ओतल्यागत तिला झालं.

''कायतरी बोलू नगासा. उगं, आपलं कायतरी भूत हुबा करायचं आन् माणसाला धारंवर धरायचं. तुम्ही असताना मला... '' तिला लाजेमुळं पुढं बोलवना. मूळचा गोरा चेहरा गुलाबी घामाघूम झाला.

''आयला, नाटाक मोठं छान वटावतीयास.'' सोफ्यावरनं उठून पुढं येत तो म्हणाला,

''त्या दिवशी त्या सर्जेरावबरुबर कोण बोलत हुतं नदीला? आं? का गं आता का वाचा बसली?''

खरं तर हा सर्जा कोण हेच तिला आठवत नव्हतं. आपण कुणाशी बोललो हेही तिला आठवेना. नदीवर? तिनं बराच ताण दिला. काही आठवेना.

''तशी कुठली कबूल होतीस तू?''

'आवो पन–!'

पुढं होऊन वाड्याचा दरवाजा बंद करून तो गरकन मागं वळला. त्याच्या चेहऱ्याकडं पाहूनच तिच्या अंगावरून भीतीची लहर सरसरून गेली. आता काय हा आपल्याला जिवंत ठेवत नाही. हातातला पिळा खाली पडला.

''पाया पडते. मारू नगा ऽ न्हाय वो कुनाशीसुद्धा बोलली न्हायी मी. का कुणाकडं वर डोळा करून पाह्यलं नाय!'' ती केविलवाणी नजर करत

त्याच्याकडं पाहत म्हणाली.

''रांड तिच्यायला-'' खुंटीवरचा आसूड हातात घेत तो म्हणाला.

''कायतरी बोलू नका वोऽ तुमच्या पायाची शिप्पतऽ तसलं काही सुदीक माझ्या मनात येनार न्हाय.''

''माझ्या पायाची शिपत घेतीयाऽ'' चाबकाचा फटकारा तिच्या अंगावर ओढत तो म्हणाला.

पायाशी लोळण घेत ती म्हणाली, ''मारू नका होऽ खरंच आंबाबाय शिप्पत तसलं काय नाय. तुम्ही काय म्हणताय तेबी आठवत न्हायऽ''

आसूड ओढत तो म्हणाला, ''कसं आटवल? नवऱ्याला शिंदळकी कोण सांगल?''

मारानं ती व्याकुळ झाली. ओरडायचीही भीती. ओरडलं तर जास्त मारेल. मला मारलेलं सोसवना तेव्हा ओरडले तर माझ्याच पदराचा बोळा तोंडात कोंबला. आता तर काय टळटळीत सुन्न दुपार आणि एकाकी वाडा. तरी रडू फुटलंच. हुंदके ... हमसूनहमसून हुंदके.

''रडतीया ऽ रडून शिंदळकी जिरवतीय व्हय तुझ्यायला!''

लक्कन तिला आठवलं. पाचसा दिवसांपूर्वी ती अशीच नदीवर धुवायला गेलेली. येताना हंडाही भरून आणावा म्हणून नेलेला. नदीला बायाबापड्या कुणीच नव्हत्या. हिचं धुणं धुऊन झालं. हंडा भरला; पण उचलेना. बराच वेळ हिकडंतिकडं बघितलं. लांब खाली गुरं पाण्यावर आलेली. तिथं एक-दोन उघडी पोरं पाण्यात पवतेली. चार-दोन बगळं पाण्यात ध्यान लावून उभे राहिलेले. कुणाला हाक मारायची? एवढ्यात डोक्यावर लुंगी टाकून एकजण आला अंघोळीला! लुंगी खाली टाकली. कापडं काढायच्या नादात. नाइलाजानं तिनं हंड्याला हात द्यायला बोलावलं. बिचाऱ्यानं फक्त हात दिला हंड्याला. मान वर करूनसुद्धा बघितलं न्हाय त्यानं का मीऽ. कुणीतरी काडी लावलेली दिसतीय; तळपट होईल मेल्यांचं. नांदनारनीचं असं चान्न करनं बरं नव्हं.

सगळं खरं पण मार कसा चुकवायचा! वाद्या तर वादाडे देतोयच देतोय.

''सांगते पर मारू नका–''

''हां! आता कशी वळणावर आलीस! बोलबोल लौकर.''

त्या दिवशी उचलू लागाय कोन नव्हतं म्हणून कोन होता त्यो बाबा...

त्याला म्हटलं खरं म्या- माझी चुकी झाली पर दुसरं कायपण बोलली न्हाई. देवाशिप्पत!''

''मग? मी म्हणत हुतू ते खरं हाय का नाय?'' पुन्हा आसूड उगारत तो म्हणाला.

''न्हाय वो! एवढंचऽ कुणीतरी कान भरलेलं दिसत्यात तुमचं. कायपन न्हाय. नुस्ता हंड्याला हात लावला एवढंच! तुमच्या पायाच्यानं!''

मागं सरत तो म्हणाला, ''माझ्या पायाबियाची शिपत घेऊ नगूस. आयची मी! सोता गू खायाचा अन् माझ्या पायाची शिपत घेतीया!''

''आता काय करू? कसं सांगू?'' ती रडवेली, मुसमुसत म्हणाली. चोळीच्या चिंध्या झाल्या होत्या. वादी कातडं घेऊन गेली होती. पाठ रक्ताळलेलीऽ. उनाचं घामाघूम होणारं शरीर घाम झिरपल्यानं जास्तच चरचरत होतं.


''त्येलातला पैसा काढतीस?''

''त्येलातला?'' डोळे विस्फारत ती म्हणाली.

'हां. तुला बट्टा न्हाय ना? मग काढकी तेलातला पैसा. बघू तुझं सतपण.' नवरा खरंच पाणी तापवायच्या चुलवणाकडं जात म्हणाला. इंजनासाठी आणलेलं क्रुडाईल खोलगट घमेल्यात ओतलं अन् चुलवणावर ठेवून त्यानं खाली जाळ लावला. ती हबकून गेली. वाडा गरागरा आपल्याभोवती फिरतोय असं तिला वाटलं. हे पहिल्यापास्नं असंच चालत आलंय. गड्यानं बाहेर कितीबी शेण खाल्लं तरी गडी कोराकरकरीत; बायकाच्या जातीला मातर हा भोग! एवढा चांगला म्हणणारा रामसुदीक ह्यातनं सुटला न्हाय. त्याच्यातलाही पुरुष ऐन टायमाला जागा झालाच की! एवढी सावलीसारखी मागं राहाणारी सीता - त्याला तिची खात्री नसूने? बरं, अगीनप्रसाद खाऊन ती बाहेर आली तरी बिचारीच्या कपाळी वनवास ठेवलेलाच. ऊठ बये! तुझ्या कपाळी हाच भोग आहे. अग्निदिव्य! एवढं करूनही पुढचे धिंडवडे थांबताहेत का नाही कुणास ठाऊक!

जाळ चांगला लागला होता. ती शून्यपणे बसली होती. क्रुडाईल उकळू लागलं होतं. खिशातली अधेली काढून तिच्यापुढं नाचवत तो म्हणाला, ''एऽ शीतासावेत्रे ऽ हे बघ. पैसा टाकतूय ऽ मोठी अधेली हाय, काढून दाखव न्हायतर...'' त्यानं वाक्य अर्धवट सोडलं अन् ती नखशिखांत

नवे कोरे




# आयुष्याचा अंतिम संस्कार

## फिलिप गूल्ड

अनुवाद

**डॉ. अजेय हर्डीकर**

**किंमत : १८०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**

फिलिप गूल्ड म्हणजे इंग्लंडचे माजी पंतप्रधान टोनी ब्लेअर यांचे निकटवर्तीय, आणि त्यांचे प्रमुख 'स्ट्रॅटेजिस्ट'. २००८ साली, वयाच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी त्यांना अन्ननलिकेचा कॅन्सर झाला असल्याचं निदान केलं गेलं. पुढच्या तीन वर्षांत कॅन्सर बरा होणं, मग त्याचं पुनरागमन आणि शेवटी मृत्यू; या नाट्यमय कालावधीत गूल्ड अंतर्मुख झाले. त्यांच्यातल्या स्ट्रॅटेजिस्टने निवडणूक डावपेच रचण्याच्या हिरिरीनेच या भयानक रोगाशी सामना करायचं ठरवलं. जसजशी त्यांची प्रकृती ढासळत गेली तसतसं आपल्या कॅन्सरविषयी आणि मनातल्या विचारांविषयी लोकांना सांगण्याची त्यांना अनिवार इच्छा झाली. 'आयुष्याचा अंतिम संस्कार...' म्हणजे या तळमळीचाच परिपाक आहे. वाचकाला हेलावून सोडणारी ही कथा कॅन्सर झालेल्यांना स्फूर्तिदायक ठरेल यात शंका नाही. शिवाय मानवी आयुष्य आणि नातेसंबंधांचे मर्मही यात दडले आहे. जे प्रत्येकाला विचार करायला लावेल.

घाबरली.

याचा घरी राहायचा असा एकूण डाव होता तर! माय-लेकरांनी दोघांनी ठरवलेला. म्हणून तर सासू लवकर गेली रानात निघून.

जाळ! लालभडक जाळ, उकळतं क्रुडाआईल. त्यात खदखदणारी अधेली. भडकत्या ज्वाला अन् हात जोडून डोळे मिटून उभी राहिलेली सीता तिच्या डोळयांसमोर उभी राहिली. कुठूनतरी धैर्य अंगात आलं. सुटका नव्हतीच. एका निश्चयानं ती उठली. चुलीजवळ जाताच धग जाणवली. जाळानं अंग पोळायला लागलं. उन्हाळ्याचे दिवस. अगोदरच रणरणतं ऊन. त्यात हा लालभडक जाळ. उकळणारं क्रुडाआईल एकवार वाटलं, हे घमेलं असंच उचलावं; त्याच्या तोंडावर फेकावं अन् आपल्याही डोक्यावर ओतून घ्यावं. बस्स झालं जीवन!

तो पुढं सरकला. आसूड हातातच. ''नकोऽ काढतेऽ'' ती अस्फुटसं किंचाळली. पुढं सरली. धाडस होईना.

साधं पाणी जरी जरा जास्त गरम असलं तर चटके बसतेत. पायात व्हाण नसली तर तापलेल्या फुफाट्यात तोंडावर हात जातोय. ऐन गारठ्यात थोडं शेकोटीजवळ बसलं तरी पाठ फिरवावी वाटतीय. भाकरी थापताना चुकून तव्याची कड लागली तर आग आग होतीय. अन्–

हे उकळतं क्रुडाआईलऽ त्यातला पैसा. चारित्र्य... कशाचं काय अन् काय...!

हात जवळ गेलेला जरा मागं आला. तो हसला. अक्राळविक्राळ. एखाद्या राक्षसासारखा. ती हरणीसारखी भेदरली.

''कर नाय त्याला डर कशालाऽ काढकी ऽ उगं बाता मारतीयास– ''

तिला एकवेळ वाटलं, अगुदर तुम्ही बिनबक्ष्याचं हाय म्हणून दाखवा काढून, मग मीबी काढते. कसलं काय, हे सगळं मनात; वाघापुढं बकरीचं काय चालणार? ती परत पुढं सरकली.

धग जाणवली. त्यानं दोन्ही हातांत आसूड धरलेला. तिला लहानपणी पाह्यलेली सर्कस आठवली. पाटलूण घातलेला तो बाबा असा दोन्ही हातांत चाबूक घेऊन असा बघायचा की सिंहही गुरगुरत का होईना, स्टुलावर चढायचा. त्या चाबकात म्हणं विलेक्ट्रिक शॉक असायचा. एवढा सिंहासारखा सिंह; पण तोसुद्धा घाबरून स्टुलावर चढायचा. आपण तर काय

गरीब गाय!

तिनं डोळे गच्च झाकले. मन घट्ट करीत चटकन हात घातला. अधेली हाताला लागली; पण हाताची अशी आग आग झालीय. भडका उडाला. टरारून फोड आले. पातळात लघ्वी व्हायची वेळ आली. डोळ्यांपुढं काजवे चमकले. निळेऽ पिवळेऽ जांभळे ठिपके! अधेली त्याच्याकडं फेकत, हाताकडं बघत ती मटदिशी खाली बसली. काही सुचेना.

सुन्न झालेला तो चाबूक तसाच फेकून देऊन डोक्यावर टोपी ठेवून दार उघडून रानात निघून गेला. एकही शब्द न बोलता; तिच्या टरारून आलेल्या फोडाकडं न बघता. तिला हाताला काय लावावं हे सुचेना. बाहेर जायची चोरी. कुणाला कसं सांगावं? मनगटापर्यंत हात भाजलेला. थोडा का थोडका! हाताचा तर भडका उडालेला. तिला वाडाभर थयथया नाचावं वाटलं. चुलीतली लाकडं घ्यावीत. हा वाडा पेटवून द्यावा अन् आपण पण त्यात जळून जावं.

संध्याकाळी सासू रानातनं आली; पण एका शब्दानं चौकशी नाही, म्हणजे सगळं हिच्या विचारानंच झालं होतं. काम करणं अशक्य होतं. हात नुसता आ म्हणू देत नव्हता. उलट चडफडत, करवादत सासू कामाला लागली. ती कानकोंडी होऊन गेली. रात्रभर डोळ्याला डोळा नव्हता. उलघाल झाली. आता हात बरा होईस्तवर सगळीच पंचाईत! लुगड्याची गाठ बांधण्यापासून ते भाकरी खाण्यापर्यंत. बरं, भाकरी करणारी सासूऽ प्रत्येक घासाला तिचा लागट शब्द. जिणं असह्य होणार!

माहेरी जाऊन सरळ आई-बापाला म्हणावं, ''तुम्हाला नकोशी झाली असंन तर सरळ हिरबावडीत ढकलून द्या; पण ह्या घराला पुन्हा जाणार नाही.''

संशयाचा भुंगा नेहमीच यांचं डोकं पोखरत राहाणार अन् आपले धिंडवडे आता कायमचे. एकदा तडकली काच ती तडकली.

सकाळी उठून तिनं लुगडं पिशवीत भरलं, दागिनं उतरवून सासूबाईजवळ देत म्हटलं,

''माह्येराला जाती. हात बरा होईस्तवर काय करू हिथं बसून?''

काही बोलली नाही. तिला कुठं उल्हास होता हिला भाकरी करून घालायला. सरळ माहेराला गेली. आईच्या कुशीत हमसून हमसून रडली.

वडील सोप्यात फेऱ्या मारत बसले.

दिवस गेले. वर्षं गेली. तिनं सासरी जाण्याचं नाव काढलं नाही. वडिलांनी तिला पाचारलं नाही. सासरचं कुणीही आलं नाही. सांगावा नाही, निरोप नाही की मुराळी नाही. तिनं ठरवलं, रानात काबाडकष्ट करायचं. होतील तेव्हढी कामं करायची. शरीर कष्टवायचं. आपल्या नशिबी संसारसुख नाही. आपण देखणा चेहरा घेऊन जन्माला आलो ती आपली चूक.

बऱ्याच दिवसांनी आईच्या आग्रहानं ती अन् आई शिंगणापूरच्या चैत्री वारीला गेल्या. यात्रा पाहून ती हडबडली. आतून कोमेजून गेली. सुखाचा संसार असता तर एखादं बछडं घेऊन गाडीबैलासहित नवऱ्याबरोबर ती महादेवाला आली असती. तिनं सुस्कारा टाकला. बेल-दवणा घेऊन गर्दीतनं वाट काढत दर्शन घेऊन त्या दोघी पायऱ्या उतरू लागल्या अन् तिनं पाहिलं, नवरा एकीला घेऊन दर्शनाला वर चढत होता. त्यानं दुसरं लग्न केल्याचं तिच्या कानावर आलं होतं. तिनं जोडीला पाहाताच काळजाचा ठोका चुकला. असल्या संशयखोर माणसानं आता तरी कसली बायको केलीय... हातभर पदर तोंडावर पुढं ओढणारी; पायाच्या अंगठ्याकडं बघणारी.

गर्दीतून तो पुढं आला तसं त्याच्याबरोबरची ती दिसली. पदर पार खांद्यावरून घसरायच्या बेतात. तिरपा भांग. शहरातल्यासारखं झंपर घातलेलं, त्यातनं बॉडीचा पट्टा दिसतेला. नजर भिरभिर.

बायकांना पुरुषाची नजर जशी कळते तशी बायकांचीही चालचलणूक कळते. एका दृष्टीत तिनं ह्या नव्या बायकोचं पाणी जाणलं अन् अनावर ऊर्मी दाटून आली. तिला आपल्याला नक्की काय वाटतंय ते समजेना.


खरोखरचीच छिनाल बायको आपल्या नवऱ्याच्या पदरात पडल्याचा आसुरी आनंद की विनाकारण संशय घेऊन आपल्या नवऱ्यानं आपल्या संसाराचा केलेला खेळखंडोबा अन् ही वेसवा पाहून उदास मनस्क चीड?

ती यांत्रिकपणे पायऱ्या उतरत होती आणि भोळा सांब हे सगळं तटस्थपणे न्याहाळत होता.

◆

**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

नवे कोरे




# अंतराळ स्पर्धा

**अतुल कहाते**

**किंमत : २५०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

अंतराळाकडे कुतूहलानं बघणाऱ्या माणसाला आपण अंतराळात प्रवास करावा असं वाटायला लागलं आणि एक नवं युग सुरू झालं. यासाठीचं विज्ञान आणि तंत्रज्ञान अर्थातच अद्‌भुत आहे. या सगळ्याची निर्मिती कोपर्निकस, गॅलिलिओ, न्यूटन, आईनस्टाईन यांच्यासारख्या महामानवांनी दाखवून दिलेल्या मार्गावर चालल्यामुळे साध्य झाली असली तरी तिचा कळस विसाव्या शतकाच्या मध्यावर गाठला गेला.

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका आणि सोव्हिएत युनियन यांच्यात सुरू झालेल्या शीतयुद्धाच्या पार्श्वभूमीवर या दोन्ही महासत्तांमध्ये एकमेकांवर हरप्रकारे कुरघोडी करण्यासाठीची रस्सीखेच सुरू झाली. याचाच एक भाग अंतराळावर हुकमत गाजवण्याचा होता. कहर म्हणजे हिटलरच्या नाझी राजवटीत यासाठीच्या तंत्रज्ञानाची पाळंमुळं रुजली, हे ऐकून आपण सर्दच होऊ. अंतराळामध्ये प्रथम जाण्यासंबंधीच्या या स्पर्धेची अत्यंत रोमहर्षक, चित्तथरारक, भारावून सोडणारी आणि वेगळ्याच विश्वात नेणारी कहाणी म्हणजे 'अंतराळ स्पर्धा'!

फॉन ब्राऊन आणि कोरेलियॉव्ह हे दोघे विलक्षण हुशार आणि अफाट जिद्दीचे तंत्रज्ञ या शर्यतीमधले मुख्य प्रवासी ठरले. त्यांच्या कर्तृत्वाला सलाम करणारी ही रंजक सफर खास मराठी वाचकांसाठी!



# आकाश झेलताना




इचलकरंजीतील द मॉडर्न हायस्कूलमध्ये सहायक शिक्षिका म्हणून, तर कोल्हापूर मधील महाराष्ट्र हायस्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेजमध्ये सहायक प्राध्यापिका म्हणून कार्यभार सांभाळला आहे.

कादंबऱ्या, कथासंग्रह, कवितासंग्रह, पाकशास्त्र, प्रवासवर्णन वगैरे वेगवेगळ्या साहित्यप्रकारांत त्यांनी लेखन केले आहे. त्यांची २५ पुस्तके प्रकाशित आहेत. 'शिशिरसांज', 'रानगंध' या नावाने त्यांचे कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. 'फुलपाखरांचा गाव' आणि 'आकृतीगंध' ही दोन चारोळ्यांची पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. 'स्वस्तिकाची फुले', 'हास्यमेव जयते', 'बुफे आणि फेफे' आणि 'ओंजळीतले मोती' या कथासंग्रहांचे त्यांनी लेखन केले आहे.

'अंधाराच्या सावल्या', 'अग्निलाघव' या रहस्यकथासंग्रहाबरोबरच 'रंगपश्चिमा' हे प्रवासवर्णनही प्रसिद्ध झाले आहे. 'फास्ट-ब्रेकफास्ट' नावाचे पाककृतींवर आधारित पुस्तकही त्यांनी लिहिले आहे.

'अमृतसंदेश माहात्म्य' या आध्यात्मिक पुस्तकाच्या लिखाणाव्यतिरिक्त त्यांनी 'सासूची माया' या मराठी चित्रपटासाठी कथा-पटकथा व संवादलेखनही केले आहे.

अरुण दाते यांचा 'शुक्रतारा' आणि 'शब्दसुरांच्या झुल्यावर' या कार्यक्रमांमध्ये त्यांनी निवेदन केले आहे. 'तुकयाची आवली' या कादंबरीला २००८मध्ये 'तुका म्हणे पुरस्कार' आणि 'भारताच्या राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील वाचनवेध पुरस्कार' 'जोहार मायबाप जोहार' या पुस्तकाला खामगाव येथील 'कै. वरणगावकर' स्मृतिपुरस्कार २०१२, संत गाडगेमहाराज अध्यासन पुरस्कार २०१४, तसेच 'ज्ञानसूर्याची सावली' या कादंबरीला अश्वमेध ग्रंथालय आयोजित 'अक्षरगौरव पुरस्कार' २०१४, महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेचे 'कीर्तन संजीवनी पुष्पलता रानडे' पारितोषिक २०१६ मिळाले आहे.




## मंजुश्री गोखले

*शुभदा म्हणजे खरोखर*

*आकाश झेलणारी गंगाच होती.*

*हे करत असताना आलेल्या अनंत संकटांना*

*तिनं आपल्या मजबूत खांद्यांवर पेललं होतं. ग्रीष्मातल्या प्रखर सूर्यासारखी अनेक दाहक संकटे तिच्यासमोर*

*एकापाठोपाठ एक उभी ठाकली होती;*

*पण त्या सर्व संकटांवर मात करून*

*तिनं आपल्या कर्तृत्वानं सुखाचं, कल्याणाचं, आनंदाचं वातावरण निर्माण केलं होतं.*

*संकटांचं आकाश झेलून तिनं साठे परिवाराला सुखाची, समाधानाची सावली दिली होती. तिच्यात असलेल्या प्रत्येक गुणाचा कस लावून, कर्तृत्वाच्या कसोटीवर खरी उतरणारी शुभदा आता सर्वांना दिसणार होती*

*सुखाचं, समृद्धीचं, समाधानाचं आकाश झेलताना! हेच तिच्या आयुष्याचं सार्थक होतं.*

*हीच इतिकर्तव्यता होती.*

(‘आकाश झेलताना’ पुस्तकातून)

तो संबंध दिवस शुभदानं आपल्या योजनेबद्दल साधक-बाधक विचार केला आणि ती एका निर्णयाप्रत आली. रात्रीची जेवणं झाल्यानंतर तिनं आपल्या खोलीत गजानन, मिली आणि विद्याधर यांना बोलावून घेतलं. नाना-नानींना मात्र मुद्दामच बोलावलं नाही. कारण इतकी सगळी गुंतागुंतीची योजना त्यांना पेलवली नसती. तिघेही आल्यानंतर शुभदानं त्या तिघांना आपली योजना सांगितली. सगळं सांगून झाल्यानंतर मिलीला आणि गजाननला सांगितलं, ‘‘गजाननभावजी, मिली व तुमचं दोघांचं एकमेकांवर प्रेम आहे. मुंबईच्या त्या अनोळखी शहरात तू भावजींचा जीव वाचवलास. एकत्र राहत असूनही तुम्ही सहा ते आठ महिने संस्कार विसरला नाहीत आणि आता तुला गजाननभावजींशिवाय कुणाचाही आधार नाही. या सगळ्या गोष्टींचा विचार करून आम्ही ही योजना आखली आहे. ही योजना तुम्हाला मान्य असेल तरच तुमचं लग्न होऊ शकतं आणि तरच तुम्हा दोघांना लग्नानंतरसुद्धा इथे राहता येईल. जर ही योजना तुम्हाला मान्य नसेल तर तुम्ही पुन्हा मुंबईला जाऊ शकता. आम्ही कुणीही तुम्हाला अडवणार नाही; पण त्याचबरोबर तुमच्याशी आमचे संबंध चांगले राहतील याची मी खात्री देऊ शकत नाही आणि जर या योजनेसाठी तुम्ही तयार असाल तर तुम्हाला ही योजना पार पाडण्यासाठी संपूर्ण सहकार्य करावं लागेल. हे सगळं तुम्हाला मान्य आहे का?’’ शुभदानं विचारलं. शुभदा जेव्हा योजना सांगत होती, तेव्हा गजाजन आणि मिली दोघेजण ही योजना लक्षपूर्वक ऐकत होतेच; पण विद्याधरसुद्धा शुभदाकडे कौतुकभरल्या नजरेनं बघत ती योजना ऐकत होता. त्याला शुभदाच्या योजनेचं, तिच्या आत्मविश्वासाचं, तिने लक्षात घेतलेल्या बारीक-सारीक धोक्यांचं, तिच्या विचार करण्याच्या पद्धतीचं कौतुक वाटत होतं. तिने सांगितलेली संपूर्ण योजना ऐकल्यानंतर तिची ही योजना शंभर टक्के यशस्वी होणार आणि ती निर्धोकपणे पार पडणार, याबद्दल त्याला पूर्ण विश्वास वाटला. त्याबद्दल तिला शाबासकी देण्यासाठी विद्याधर काही बोलणार तोच मिली म्हणाली, ‘‘शुभदाताई, मला छान संसार करायचा आहे. माझं गजाननवर अतिशय प्रेम आहे आणि त्याच्याशिवाय मला कुणाचाच आधार नाही. मला त्याच्याशी लग्न करायचं आहे. तुम्ही सांगितलं त्या पद्धतीने केल्यावर हे सगळं घडणार असेल तर या

योजनेला माझी संपूर्ण सहमती आहे आणि त्यासाठी तुम्हाला माझं संपूर्ण सहकार्य राहील. मला या घरी 'सून' म्हणून यायला मिळणार असेल तर त्यासाठी काहीही करायची, कोणतंही दिव्य करायची माझी तयारी आहे.'' मिलीनं आपल्या मनातले विचार स्पष्टपणे मांडले. तेही शुभदाला आवडलं; स्वच्छ मनाचं आणि स्वच्छ विचारांचंच ते एक प्रतीक होतं. आता गजानन काय म्हणतो या विचाराने शुभदाने गजाननकडे पाहिलं तर काहीही न बोलता तो उठला आणि त्याने शुभदाचे पाय धरले आणि म्हणाला, ''वहिनी, माझं अवघं आयुष्य आता मी तुझ्या पदरात टाकतो आहे. ते घडवायचं की बिघडवायचं हे तूच ठरव. तू सांगशील ते करायला मी तयार आहे. तू म्हणशील ते ऐकायला मी तयार आहे. तू माझं कल्याणच करशील यावर माझा शंभर टक्के विश्वास आहे. ही योजना पार पाडण्यासाठी तू सांगशील ते करायला मी तयार आहे.'' गजाननचं बोलणं संपलं. अजून तो शुभदाच्या पायांपाशी बसला होता. तोच मिलीही तिथे येऊन बसली आणि शुभदाला म्हणाली, ''ताई, माझी फार काही अपेक्षा नाही. या घरात मोलकरीण म्हणून ठेवून घेऊन तुमच्या पायाजवळ मला जागा दिलीत तरी मी आनंदाने राहीन; पण मला तुम्ही लाथाडू नका. मला एक चांगलं आयुष्य जगायचं आहे. ती संधी तुम्ही मला द्या. मी माझं सर्वस्व पणाला लावेन आणि या घराण्याच्या आणि तुम्हा सर्वांच्या प्रतिष्ठेला कधीही धक्का लावणार नाही!'' गजानन आणि मिलीच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहत होत्या. शुभदाही रडत होती आणि विद्याधरचे डोळेही भरून आले. शुभदानं दोघांनाही खांद्याला धरून उठवलं. आपल्याजवळ घेतलं. कितीतरी वेळ गजानन आणि मिली तिच्या मिठीत स्फुंदत होते. विद्याधर भरल्या डोळ्यांनी हे दृश्य पाहत होता.

दुसऱ्याच दिवशी शुभदा पहाटेच्या गाडीने मिलीला घेऊन साताऱ्याला गेली. जातानासुद्धा तिने मिलीच्या चेहऱ्यात आणि पेहरावात बदल केला होता. एरवी मोकळ्या असणाऱ्या तिच्या केसांचा अंबाडा घातला होता. साडी नेसून, दोन्ही खांद्यांवरून पदर घेऊन, कपाळावर मोठं कुंकू लावून, शुभदाबरोबर पहाटेच्या अंधूक प्रकाशात मिली गाडीत बसली, तेव्हा ही मुंबईच्या एका बारमध्ये नाचणारी मुलगी आहे यावर सांगूनही कुणाचा विश्वास बसला नसता. गाडी सुटल्यानंतर बऱ्यापैकी उजाडल्यावर शुभदाने प्रभावतीला फोन केला. तसा तिने आपण येणार असल्याचा फोन तिला


रात्रीच केला होता. आता तिनं आपण पहाटेच्या गाडीने निघाल्याचं कळवलं. सकाळी अकराच्या दरम्यान  दोघी साताऱ्यात प्रभावतीच्या घरी पोहोचल्या. पुष्पा आणि प्रभावती दोघीही त्यांची वाटच बघत होत्या. धाकटी बहीण येणार म्हणून पुष्पाला तर वहिनी येणार म्हणून प्रभावतीला अतिशय आनंद झाला होता. त्यातच सहा-आठ महिने बेपत्ता असलेल्या गजाननचा मुंबईतला पराक्रमही प्रभावतीच्या घरातल्या सगळ्यांनी टीव्हीवर पाहिला होता; पेपरात वाचला होता. आपला हरवलेला भाऊ सापडला आणि त्याने असं मोठं काम केलं याचा प्रभाला अतिशय आनंद झाला होता; त्यामुळे साहजिकच माहेरचं कुणीतरी कधी येऊन भेटेल आणि आपण त्यांच्याशी हे सगळं कधी बोलू असं प्रभाला झालं होतं आणि आता शुभदावहिनी येते म्हटल्यावर, तिने काय-काय बेत आखले होते. शुभदा आली. तिच्यासोबत आणखी एक तरुण मुलगी बघून पुष्पाला आणि प्रभाला आश्‍चर्य वाटलं; पण असेल तिच्या सोबतीसाठी कुणीतरी आलेली, असा प्रभानं विचार केला. चहा-पाणी झालं, जेवणं झाली. पुष्पाचा नवरा संजय आणि प्रभाचा नवरा विजय दोघेही सकाळीच डबा घेऊन ऑफिसमध्ये जात असत; त्यामुळे ते दोघे एकदम संध्याकाळीच येणार होते. याचा फायदा घेऊन शुभदानं त्या दोघींजवळ आपली योजना सांगितली. सगळ्यांत पहिल्यांदा मिलीने गजाननचा जीव कसा वाचवला, ते सांगितलं. मुंबईसारख्या त्या अनोळखी शहरात संपूर्ण अनोळखी असलेल्या गजाननला तिनं कसा आधार दिला, ते सांगितलं; त्यामुळे साहजिकच दोघींच्या मनात मिलीबद्दल एक सॉफ्ट कॉर्नर तयार झाला. मिली दिसायला सुंदर तर होतीच; पण त्याचबरोबर तिचं मनही तितकंच सुंदर आहे हा विश्‍वास शुभदानं आपल्या बोलण्यातून त्या दोघींना दिला. त्यानंतर मिलीबद्दलची सगळी माहिती तिने त्या दोघींना सांगितली. अगदी तिच्या भूतकाळापासून ते तिच्या हॉटेलमध्ये काम करण्यापर्यंत तसेच तिची आणि गजाननची भेट, तिनं गजाननची घेतलेली काळजी, त्या दोघांचं सहवासातून उमललेलं प्रेम आणि त्या प्रेमातही त्यांनी बाळगलेला संयम, मिलीचं अनाथ असणं या सगळ्या-सगळ्या गोष्टी शुभदानं पुष्पा आणि प्रभावतीला सांगितल्या. हे सगळं सांगून झाल्यानंतर आपल्यापुढची समस्याही तिनं सांगितली 'गावात असलेलं साठे घराण्याचं नाव, पत-प्रतिष्ठा हे सगळं तर कायम राहिलं पाहिजे आणि याला कुठंही धक्का न

लावता, मिली गजाननची बायको आणि नाना साठ्यांची सून म्हणून सन्मानानं घरात आली पाहिजे. हे दोन्हीही घडण्यासाठी मी तुम्हा सगळ्यांची मदत मागायला इथे आले आहे.' हेही शुभदानं त्या दोघींना सांगितलं. शुभदा आणि मिली घरी आल्यापासून त्या दोघीजणी मिलीचं शालीन वागणं, तिचा विनम्र स्वभाव, तिचं अदबीनं बोलणं याचा अनुभव घेत होत्याच. तिचं सुंदर दिसणंही या दोघींना आवडलं होतं; पण शुभदानं सांगितलेली समस्या ऐकल्यावर आणि ती आपली मदत मागायला आली आहे हे कळल्यावर, ही समस्या सोडवण्यात आपण तिला काय मदत करू शकतो, असा दोघींनाही प्रश्न पडला. प्रभावतीनं तो विचारलादेखील. म्हणाली, ''वहिनी, तू सांगितलेलं सगळं आमच्या लक्षात आलं! मिली कुणालाही आवडेल अशीच आहे. तिचं निर्मळ वागणं, तिच्यावरचे संस्कार हे सांगतातच आणि तिच्या मनाप्रमाणे तिचं शरीरही तितकंच निर्मळ असेल याबद्दलही काही शंका नाही; पण तरीही तू म्हणतेस, ती गोष्ट घडणार कशी? कारण हॉटेलमध्ये नाचणाऱ्या मुलींना वाचवण्याचा गजाननं केलेला पराक्रम जगजाहीर झाला आहे आणि ज्याअर्थी ती मुलगी त्याच्यासोबत आली आहे त्याअर्थी तीसुद्धा त्या हॉटेलमध्ये तेच काम करत असणार हे सांगायला कुणा ज्योतिष्याची गरज नाही आणि जर लोकांना हे माहीत झालं तर आपल्या घराण्याची कीर्ती, पत-प्रतिष्ठा कशी सांभाळली जाणार? शिवाय सर्वांत महत्त्वाचं म्हणजे ते सांभाळण्यासाठी तू आमची मदत हवी आहे असं म्हणतेस; पण आम्ही तुला या बाबतीत काय, आणि कशी मदत करणार? मिली आपल्या घराण्यात सून म्हणून शोभावी अशीच आहे; पण तिचा भूतकाळ कसा पुसला जाणार? आपण कितीही उदात्त विचारानं, चांगल्या उद्देशानं हे करीत असलो तरी लोकांची तोंड कोण धरणार? आणि त्या बाबतीत आम्ही तुला मदत करायची ठरवली तरी त्यालाही काही मर्यादा आहेत. मी स्पष्ट बोलते त्याचा राग मानू नकोस! पण त्या मर्यादांच्या पलीकडे जाऊन आम्ही काही करू शकणार नाही!'' प्रभानं आपलं म्हणणं स्पष्टपणे शुभदासमोर मांडलं. शुभदाला हे पटलं; पण आपली योजना कार्यान्वित करण्यासाठी या दोघींना फार काही करावं लागणार नाही, हेही ती जाणून होती; त्यामुळे तिनं प्रभावतीच्या बोलण्याचा राग तर मानला नाहीच; पण उलट मिलीविषयीचे तिचे विचार समजल्यावर शुभदाला आनंदच झाला. कारण प्रभाचं मत

मिलीविषयी चांगलं होणं हा तिच्या योजनेचा पहिला टप्पा होता आणि त्यात तिला यश आलं होतं. म्हणूनच प्रभाच्या बोलण्याचा कसलाही राग न मानता शुभदा म्हणाली, ''प्रभावन्स, पुष्पाताई, तुमच्या मर्यादांच्या पलीकडे जाऊन तुम्ही काही करावं अशी माझी अपेक्षाही नाही आणि तुम्हाला ते करावंही लागणार नाही. शिवाय, आपण जे काही करणार आहोत त्याची माहिती पुष्पाताई - तुझे मिस्टर संजयभावजी आणि आमचे जावई विजय यांना सांगून त्यांचं संपूर्ण सहकार्य असेल, तरच करायचं आहे अन्यथा नाही आणि तुम्हा दोघींचा माझ्यावर विश्वास असेल तर संध्याकाळी ते दोघेजण आल्यानंतरच मी माझी योजना सर्वांसमक्ष सांगेन!'' शुभदाचं हे बोलणं ऐकून त्या दोघींच्याही मनावरचं ओझं उतरलं. आपल्या घरातल्या माणसांना कळू न देता काही करावं लागलं असतं तर ते एक प्रकारचं टेन्शन होतं; पण आता शुभदानंच 'सर्वांच्या समक्ष योजना सांगेन आणि सर्वांची संमती असेल तरच ती अमलात आणली जाईल' असं सांगितल्यावर पुष्पा आणि प्रभावती दोघीही रिलॅक्स झाल्या. मग त्या तिघींच्या गप्पा खूप रंगल्या. प्रभाला एक छोटं बाळ होतं. बाळंतपणाला ती माहेरी येऊन गेल्यानंतर बाळ लहान असल्यानं तिचं कोकणात येणं काहीसं कमी झालं होतं. तिचं बाळंतपणही शुभदानं अतिशय मायेनं केलं होतं. तिघीजणी आत गप्पा मारत बसल्या होत्या आणि बाहेर मिलीचं त्या बाळाशी अगदी सूत जमलं होतं. कुणाकडेही न जाणारं ते सात-आठ महिन्यांचं बाळ, मिलीबरोबर अगदी जुनी ओळख असावी, असं खेळत होतं. बाळाच्या हसण्याचा आणि मिलीचा त्याच्याशी बोबडे बोलण्याचा आवाज आतपर्यंत ऐकायला येत होता आणि जसजसा वेळ जाईल, तसतसं पुष्पाचं आणि प्रभाचं मिलीबद्दल अधिकाधिक चांगलं मत बनत होतं.

संध्याकाळचे सात वाजले. संजय घरी आले. पाठोपाठ प्रभावतीचा नवरा विजयही आला. शुभदावहिनींना भेटून दोघांनाही अतिशय आनंद झाला. दोघांनीही मिलीला पाहिलं आणि 'ही कोण' म्हणून विचारलंही; पण त्या वेळी शेजारची मुलगी आहे; सोबतीसाठी घेऊन आले, असं सांगून शुभानं वेळ मारून नेली. हसतखेळत जेवणं झाली. एकीकडे सख्खी बहीण आणि एकीकडे पुतण्याच्या बायकोची भावजय अशी दोन्हीही नाती सांभाळत पुष्पानं स्वयंपाकाचा खास मेनू केला होता आणि विशेष म्हणजे,

नवे कोरे




# शिस्तीचा बळी

**हर्मन मेलव्हिल**

अनुवाद

**भानू शिरधनकर**

**किंमत : १००/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

शाही आरमारी दलात 'इन्डॉमिटेबल' युद्धनौकेवरील खलाशी म्हणून निवड झालेल्या बिली बडची ही कहाणी.

आरमारातील सर्वच जहाजांवरील खलाश्यांच्या उठावामुळे अस्थिर आणि शंकाकुशंकांचे वातावरण नांदत असल्यामुळे अधिकारी वर्गाकडून सावधगिरी घेतली जात होती.

जहाजावरील छोटा अधिकारी म्हणजे जॉन क्लॅगार्ट याच्याकडे 'निशाण' खात्याची व्यवस्था होती. तो एक गुंड होता. आपल्या जहाजावर बिली बड हा एक घातक फितुरी प्रकृतीचा खलाशी वावरत असून, त्याचा सर्व खलाश्यांमध्ये हळूहळू बेदिली माजविण्याचा प्रयत्न असावा, असा संशय क्लॅगार्टने कॅप्टन वेर यांच्याकडे व्यक्त केला. बिली बड खरंतर सर्वांचा लाडका आणि जिंदादिल माणूस होता. पण जॉन क्लॅगार्टच्या आरोपामुळे तो संतापून उठला. आणि 'इन्डॉमिटेबल' युद्धनौकेवर एकच खळबळ माजली. बिलीवरचा आरोप आणि त्याच्या भयावह परिणामांची ही रोमहर्षक कहाणी !

हा स्वयंपाक करताना तिला मिलीची खूपच मदत झाली होती. जेवणं आटोपली. प्रभाची परवानगी घेऊन, बाळाला घेऊन त्याला झोपवण्यासाठी मिली अंगणातल्या झोपाळ्यावर जाऊन बसली. पुष्पाला तिच्या या चाणाक्षपणाचं कौतुक वाटलं. जेवण झाल्यानंतर सगळे हॉलमध्ये आले तेव्हा प्रभावतीनंच विषय काढला. म्हणाली, ''काका, वहिनी काही काम घेऊन आपल्याला भेटायला आली आहे!'' प्रभावतीने विषय काढण्याचीच शुभदा वाट बघत होती. एकदा विषयाला सुरुवात झाल्यावर तिने पुन्हा एकदा सगळी इत्थंभूत हकिगत संजयभावजी आणि विजय यांना सांगितली. ती सांगत असताना तिने कसलाही आडपडदा, कसलीही लपवाछपवी केली नाही. सगळी हकिगत सांगून झाल्यानंतर आपल्या इथे येण्याचा उद्देशही सांगितला. शुभदानं सांगितलेलं प्रत्येक वाक्य खरं होतं आणि ते तिच्या हृदयापासून आलेलं होतं. याबद्दल कुणाला किंचितही शंका नव्हती. शुभदाचं सगळं बोलणं ऐकल्यानंतर पुष्पाचे मिस्टर संजय म्हणाले, ''शुभदा, तुझा उद्देश अत्यंत स्वच्छ आहे. तुझा हेतूही अतिशय चांगला आहे आणि यात कुणाचंच अकल्याण नाही; त्यामुळे तू म्हणशील ती मदत करायला घरातले आम्ही सगळे तयार आहोत असा कुटुंबप्रमुख या नात्याने मी तुला शब्द देतो. आता तू तुझी योजना सांग!''

पुष्पाच्या नवऱ्याच्या या बोलण्याने शुभदाला हुरूप आला आणि तिने आपली योजना सांगितली. योजना अशी होती– 'मिलीला दोन-तीन दिवस इथे ठेवून घेऊन, तिला ब्युटी पार्लरमध्ये नेऊन प्रभानं तिचा संपूर्ण मेकओव्हर करून आणायचा. यानंतर तिचं मिली हे नाव बदलून ही मुलगी प्रभाचा नवरा विजय याच्या आईच्या म्हणजेच प्रभाच्या सासूच्या लांबच्या नात्यातली आहे आणि गजाननसाठी तिचं स्थळ पाहण्यासाठी पुष्पा आणि तिच्याघरची माणसं तिला घेऊन गुहागरला येतील आणि घरच्यांना ती पसंत पडून दुसऱ्या दिवशीच तिचं गजाननशी लग्न लावलं जाईल आणि त्या लग्नात गावातली काही प्रतिष्ठित माणसं बोलावली जातील. मिलीचे आई-वडील लहानपणीच वारल्यामुळे पुष्पा आणि तिचा नवरा मिलीचं कन्यादान करतील आणि साठ्यांच्या घरात मिलीचा 'सून' म्हणून वाजतगाजत प्रवेश होईल. तत्पूर्वी आदल्या दिवशी हे सगळे मिलीला तिकडे घेऊन आल्यानंतर गावातील चार प्रतिष्ठित माणसं बोलावून गजाननच्या लग्नाची बोलणी

करायची म्हणजे दुसऱ्या दिवशी गजानन आणि मिलीचं लग्न लावणं सयुक्तिक ठरेल.' अशी सगळी योजना शुभदाने आखली आणि या योजनेमध्ये मिलीचे नातेवाईक ही भूमिका संजय आणि पुष्पाला वठवायची होती. शुभदाची ही योजना ऐकून संजय, विजय दोघांनीही यासंबंधात काही शंका विचारल्या. अगदी मिली कुणाची कोण हे सांगण्यातसुद्धा सगळ्यांची एकवाक्यता असली पाहिजे, इथपासून ते मिलीचं नवीन नाव काय ठेवायचं इथपर्यंत, सगळ्या गोष्टींची चर्चा झाली आणि शेवटी शुभदानं सांगितलेली ही योजना सगळ्यांना पसंत पडून अत्यंत काटेकोरपणे अमलात आणायची असं सर्वांनुमते ठरलं आणि शुभदानं आनंदानं डोळे मिटले. प्रभाकडची माणसं चांगली होतीच. पुरोगामी विचारांची होती आणि महत्त्वाचं म्हणजे ते शुभदाच्या बहिणीचं - पुष्पाचं घर होतं; त्यामुळे आपण आपला विचार इथे सांगितला तर आपल्या योजनेला इथं नक्की पाठिंबा मिळेल, याबाबत शुभदालाही विश्वास होता. तिचा तो विश्वास सार्थ ठरला होता. प्रभाच्या घरच्यांनी तिच्या योजनेला संपूर्ण पाठिंबा देऊन, त्यात आणखी काही सुधारणा सुचवून; त्यातल्या त्रुटी दूर करून शुभदाची ही योजना पूर्णपणे निर्धोक बनवली. सगळं बोलणं झाल्यानंतर प्रभानं मिलीला आत बोलावलं. आपल्या भवितव्याबद्दलचा निर्णय घेण्यासाठी हे सगळे इथे जमले होते; त्यामुळे आता आपल्याला काय ऐकायला मिळेल या विचाराने मिलीच्या छातीत धडधडायला लागलं. प्रभाचं बाळ कधीच झोपलं होतं. त्याला पाळण्यात ठेवून आपल्या भवितव्याचा विचार करत मिली बाहेर बसली होती. आतून बोलावणं आलं म्हटल्यावर धडधडत्या हृदयानं ती उठली आणि आत गेली. आत जाताक्षणी सगळ्यांच्या नजरा तिच्यावर रोखल्या गेल्या. मिली संकोचून दाराजवळ उभी राहिली. तिच्या चेहऱ्यावर भीती स्पष्ट दिसत होती. तिला तशी घाबरलेली बघून पुष्पानं तिला प्रेमानं हाक माारली. ''ये बाळ, इकडे ये! बस इथं अशी!'' पुष्पाच्या आवाजातली माया मिलीला जाणवली. ती पुढे होऊन तिच्या शेजारी जाऊन बसली. प्रभानं तिला विचारलं, ''मिली, तुझं खरं नाव मिलीच आहे का? की तुझं खरं नाव काही वेगळं आहे?'' क्षणभर मिलीनं नजर उचलून सगळ्यांकडे पाहिलं. सगळेजण तिच्या उत्तराची वाट बघत होते. खाली मान घालून मिलीनं बोलायला सुरुवात केली. ''नाही! माझं मिली हे खरं नाव नाही. ते टोपणनाव

आहे. माझं खरं नाव ‘ऊर्मिला.’ माझी आई मला ‘मिला’ या नावाने हाक मारायची. मुंबईत गेल्यावर मिलाचं मिली झालं आणि मग तेच नाव प्रचलित झालं.’’ मिलीचं हे बोलणं ऐकून शुभदा म्हणाली, ‘‘तर मग काम आणखी सोपं झालं! तुला ऊर्मिला या नावाची सवय आहेच तेव्हा आपण तुझं ऊर्मिला हेच नाव कायम ठेवू. इथून पुढे आम्ही तुला मिलीऐवजी ‘ऊर्मिला’ असंच म्हणू आणि आता तुला ते ऐकण्याची सवय लावून घेतली पाहिजे. आता सर्वानुमते तुझ्या आणि गजाननभावजींबद्दल निर्णय झाला असून तुला साठ्यांची सून करून घेण्याचं आम्ही नक्की केलं आहे.’’ शुभदाचं हे वाक्य ऐकल्यावर मिलीच्या डोळ्यांत पाणी आलं आणि शेजारी बसलेल्या पुष्पाच्या खांद्यावर मान ठेवून ती हुंदके देऊन रडू लागली. तिच्या प्रत्येक हुंदक्यातून तिच्या मनातली घालमेल, भीती, संकोच, भवितव्याबद्दल चिंता, अनाथ असल्याचं दु:ख, गजाननवरचं प्रेम, पुढे काय होईल ही शंका हे सगळं स्पष्टपणे जाणवत होतं. तिचं ते रडणं बघून तिथं बसलेल्या सगळ्यांचे डोळे भरून आले. पुष्पा कितीतरी वेळ तिच्या पाठीवरून मायेनं हात फिरवत राहिली. मिलीच्या रडण्याचा आवेग ओसरला, तसं डोळे पुसून ती पुन्हा नीट सावरून बसली. तिला शांत झालेलं बघून शुभदा पुढे म्हणाली, ‘‘ऊर्मिला, हे सगळं कसं जमवून आणायचं हे आम्ही ठरविलं आहे; पण हे निर्धोकपणे पार पाडायचं असेल तर आमची प्रत्येक सूचना तू नीट ऐकली पाहिजेस आणि पाळली पाहिजेस. कारण मुंबईचं वातावरण वेगळं आणि गुहागरचं वेगळं आहे. तसं एकूण तुझं वागणं चागलं आहेच; पण तुझ्या काही सवयी तुला बदलाव्या लागतील उदा.- गजाननभावजींना एकेरी नावाने हाक मारणं किंवा जिन्स, पॅन्ट, टी-शर्ट, स्कर्ट्स असले कपडे घालणं हे सगळं बदलून तुला साध्यासुध्या गृहिणीच्या भूमिकेत जगावं लागणार आहे. आपल्या घरातल्या लोकांना मिळतो, तसा मान-सन्मान, पत-प्रतिष्ठा तुलाही मिळेल; पण त्याला गालबोट लागेल असं कसलंही वर्तन तुझ्याकडून घडता कामा नये! नाही तर या सगळ्यावर पाणी पडेल. आता आमचं जे ठरलंय, ते सगळं प्रभावन्स तुला सांगतीलच. आता दोन दिवस तू इथंच राहायचंस. मी उद्या पहाटेच्या गाडीनं गुहागरला परत जाते आणि तिथे जाऊन सगळी तयारी करते आणि इथं काय काय ठरलं आहे, त्याची सर्वांना कल्पना देते. तू इथं निश्चिंतपणे राहा. हे माझ्या म्हणजे आता पर्यायाने तुझ्याही नणंदेचं घर

आहे. दोन दिवसांनी हे सगळेजण तुला घेऊन गुहागरला येतील. आता तू तुझ्या भविष्याची आणि आयुष्याची चिंता करू नकोस. आपल्याला कुणी नाही असंही वाटून घेऊ नकोस. आता तू आमची आहेस आणि आम्ही सगळे तुझे!'' शुभदाचं बोलणं ऐकून मिलीला पुन्हा भरून आलं. शुभदाच्या गळ्यात पडून ती पुन्हा रडली. तिच्या पाठीवर थोपटून शुभदानं तिची समजूत घातली आणि म्हणाली,''ऊर्मिला, आजपासून नव्हे, आता या क्षणापासून तुला मीही मिली म्हणणार नाही. तुला 'उर्मिला' या नावाची सवय करून घ्यावी लागेल. कारण तुझं मिली हे नाव कायमचं पुसलं गेलं असं समज आणि साठ्यांची सून शोभण्यासाठी स्वत:ला तयार कर!'' असं म्हणून शुभदाने तिचे डोळे पुसले आणि त्यानंतर सगळे निजायला गेले. शुभदाला लगेचच झोप लागली. कारण समोर उभा असलेला एक मोठा प्रश्न, एक मोठी समस्या अत्यंत यशस्वीपणे सुटली होती. तिनं आखलेली योजना खरोखरच विलक्षण यशस्वी झाली होती. आता ती पार पाडण्यासाठी केवळ दोन दिवसांचा अवधी होता; पण मिलीला मात्र कितीतरी वेळ झोप आली नाही. गेल्या सहा-आठ महिन्यांत घडलेल्या चित्र-विचित्र घटना आणि त्यामुळे तिच्या आयुष्याला मिळालेली विलक्षण कलाटणी – यांचाच ती विचार करत होती. या पुढच्या आयुष्यात सुखाचे किरण दिसत होते. आता फक्त त्याचाच विचार करायचा होता आणि खरोखरच, त्या सुखाच्या कवडशांचा विचार करता-करता मिलीला झोप लागली; पण कितीतरी वेळाने!

◆


**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

समीपा

अनुवाद : **सुषमा लेले**

गुजराती कथांमधील स्त्रीजाणिवांचे प्रारूप मराठी भाषेत उभे करून, मराठी स्त्री गुजराती स्त्रीच्या किती समीप आहे, हे जाणवून देणारा कथासंग्रह



**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




# त्रिशंकू

## राम आणि कृष्ण यांच्या अप्रचलित कथा



सुधा मूर्ती यांचा जन्म १९५०मध्ये कर्नाटक राज्यातल्या शिग्गावि येथे झाला. त्यांनी कॉम्प्युटर सायन्स या विषयातील एम.टेक. ही पदवी प्राप्त केली आहे. पुणे येथे 'टेल्को' कंपनीत निवडल्या गेलेल्या त्या पहिल्या स्त्री अभियंता होत्या. त्या विख्यात सामाजिक कार्यकर्त्या आणि कुशल लेखिका आहेत. सुधा मूर्ती या 'इन्फोसिस फाउंडेशन'च्या अध्यक्षा आहेत. या फाउंडेशनतर्फे करण्यात येणाऱ्या समाजोपयोगी कार्यासाठी त्या विख्यात आहेत. कर्नाटकातल्या सर्व सरकारी शाळांना संगणक आणि ग्रंथालय सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या चळवळीच्या त्या प्रणेत्या आहेत.

१९ नोव्हेंबर, २००४मध्ये त्यांना समाजकार्याच्या क्षेत्रातील त्यांच्या असामान्य योगदानाबद्दल 'राजलक्ष्मी पुरस्कार' मिळाला. २००६मध्ये त्यांना भारत सरकारतर्फे 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सुधा मूर्ती यांना सामाजिक कार्य आणि साहित्यसेवेसाठी सहा डॉक्टरेट्स मिळाल्या आहेत. यापैकी दोन डॉक्टरेट्स महाराष्ट्रातील एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यातर्फे देण्यात आल्या. कर्नाटकातील गुलबर्गा विद्यापीठाकडून साहित्य क्षेत्रातील कार्यासाठी एक आणि कर्नाटक विद्यापीठाकडून एक अशा दोन डॉक्टरेट्स त्यांना बहाल करण्यात आल्या. तमिळनाडूतील सत्यभामा विद्यापीठाने आणि आंध्रप्रदेशातील श्री पद्मावती विश्वविद्यालयानेही त्यांना डॉक्टरेट्स देऊन सन्मानित केले. २०१८मध्ये त्यांना प्रेस क्लब ऑफ बंगळूरतर्फे 'पर्सन ऑफ द इअर' हा मानाचा पुरस्कार मिळाला आहे.




**सुधा मूर्ती**

अनुवाद

**लीना सोहोनी**

*या कथासंग्रहातील कहाण्या*
*श्री भगवान विष्णूंच्या दोन अवतारांच्या आहेत.*
*प्रभू रामचंद्र आणि श्रीकृष्ण हे ते अवतार!*
*खरं तर या दोन्ही अवतारांच्या*
*अक्षरशः अगणित कथा उपलब्ध आहेत.*
*पण त्यातल्या कित्येक कथा आजच्या तरुण पिढीच्या*
*कधी कानावरही पडलेल्या नाहीत.*
*कित्येक कथा विस्मृतीच्या पडद्याआड गेल्या आहेत.*
*ख्यातनाम कथालेखिका सुधा मूर्ती वाचकांना*
*अशाच सुरस आणि चमत्कृतीपूर्ण प्रवासाला घेऊन जातात.*
*या प्रवासात मनुष्यप्राण्यांबरोबर*
*देवदेवता आणि राक्षसही वाटचाल करताना दिसतात.*
*प्राणी माणसांसारखे बोलतात आणि*
*देवदेवता सर्वसामान्य माणसांना मोठमोठे वरही देतात.*

('त्रिशंकू' या पुस्तकातून...)

## वचनाचं वचन

राजा हरिश्चंद्र हा त्याच्या न्यायप्रियतेसाठी प्रसिद्ध होता. त्याची पत्नी तारामती ही अत्यंत श्रद्धाळू आणि सदाचरणी होती. त्यांना रोहिताश्व नावाचा एक पुत्र होता. राजा हरिश्चंद्र हा अत्यंत धार्मिक प्रवृत्तीचा होता. तो नेहमीच धर्मानं वागत असे. त्याला धर्माच्या मार्गापासून कोणीही परावृत्त करू शकत नसे.

एकदा सर्व देवदेवता आणि ऋषी-मुनी यांच्यात एका विषयावर जोरदार चर्चा रंगली होती. या पृथ्वीतलावर सर्वांत जास्त धर्माचं पालन करणारा राजा कोण, याविषयी ती चर्चा होती. तेव्हा सूर्यवंशाचे कुलगुरू असलेले वसिष्ठ मुनी म्हणाले, ''धर्माचं पालन करण्याच्या बाबतीत राजा हरिश्चंद्राचा हात धरू शकेल असा कोणीही राजा या पृथ्वीतलावर नाही.''

त्यांचे हे उद्गार अनेक देवदेवतांना त्याचप्रमाणे विश्वामित्र ऋषींना खटकले. एखादा मर्त्य मानव देवादिकांपेक्षा श्रेष्ठ कसा काय असू शकतो, असं त्या सर्वांचं म्हणणं होतं. त्यांच्यात असे वादविवाद चालू असतानाच नारदमुनी तिथे आले. त्यांचंही मत विश्वामित्र मुनींप्रमाणेच होतं. त्यामुळे विश्वामित्र मुनींना अधिकच स्फुरण चढलं. ते वसिष्ठ मुनींना म्हणाले, ''मुनिवर, तुमचं म्हणणं चुकीचं आहे, हे मी तुम्हाला सिद्ध करून दाखवेन.''

''ठीक आहे. तुम्ही तसा प्रयत्न जरूर करा.'' वसिष्ठ मुनी म्हणाले. ''तुम्हाला राजा हरिश्चंद्राची जी काही परीक्षा घ्यायची असेल, जितके वेळा घ्यायची असेल, ती तुम्ही घेऊ शकता. तो तुमच्या परीक्षेत उत्तीर्ण होणार, यात मला काहीच शंका नाही. माझं बोलणं जर खोटं ठरलं, तर मी माझं राजगुरू पद सोडून उर्वरित जीवन एक सामान्य माणूस म्हणून व्यतीत करेन, असा मी तुम्हाला शब्द देतो.''

ते ऐकून नारदमुनी विश्वामित्रांकडे वळून म्हणाले, ''वसिष्ठ मुनींच्या म्हणण्याप्रमाणे खरोखर घडलं आणि हा राजा हरिश्चंद्र खरोखरच या पृथ्वीतलावरील धर्मानं चालणारा सर्वोत्तम राजा ठरला, तर मग त्याचे परिणाम तुम्हालाही भोगावे लागतीलच.''

''ठीक आहे, जर खरंच तसं झालं, तर मी माझं निम्मं योगसामर्थ्य राजा हरिश्चंद्राला बहाल करीन. आजवरच्या माझ्या साधनेमुळे मला जी काही दैवी

शक्ती प्राप्त झालेली आहे, तीसुद्धा त्यालाच मिळेल. त्याची कीर्ती दिगंतामध्ये पसरेल. त्याला दीर्घायुष्य लाभेल आणि त्याच्या मृत्यूनंतरही प्रदीर्घ काळापर्यंत त्याचं नाव लोकांच्या स्मरणात राहील.'' विश्वामित्र जरासे रागावून म्हणाले.

नारदमुनींनी मान डोलावली. राजा हरिश्चंद्राची सत्त्वपरीक्षा घेण्यात यावी याबद्दल दोघाही मुनींचं एकमत झालं. मग विश्वामित्रांनी त्या दृष्टीनं योजना आखण्यास सुरुवात केली.

त्यानंतर थोड्याच दिवसांत राजा हरिश्चंद्राकडे काही गावकरी गाऱ्हाणं घेऊन गेले. ''महाराज, गावात एक रानडुक्कर शिरलं आहे. ते आमच्या शेतात घुसून पिकांची नासाडी करत आहे, आमच्या घरादाराची तोडफोड करत आहे. त्यानं आम्हाला आणि आमच्या बायका-मुलांना जेरीला आणलं आहे. त्याचा काहीतरी बंदोबस्त करा.''

मग राजा हरिश्चंद्रानं आपले काही सैनिक गोळा केले आणि सर्व जण त्या रानडुकराच्या शोधात निघाले. ते रानडुक्कर विश्वामित्रांनी आपल्या योगसामर्थ्यानं निर्माण केलं होतं; परंतु राजा हरिश्चंद्राला या गोष्टीची काहीच कल्पना नव्हती. तो त्या रानडुकराच्या पाऊलखुणांचा मागोवा घेत त्याच्या शोधात निघाला. तो आपल्या घोड्यावरून दौडत दौडत एकटाच खोलवर रानात शिरला. त्याचे सैनिक बरेच मागे पडले. त्यांना राजा कुठेच दिसेना.

तो नंतर कितीतरी वेळ आपल्या घोड्यावरून रानावनात फिरत होता; पण त्या रानडुकराचा काही थांगपत्ता लागत नव्हता. जणू काही ते अचानक हवेत अदृश्य होऊन गेलं होतं.

अखेर कंटाळून, दमूनभागून तो चालत पुढे निघाला. त्याला समोर एक सुंदर आश्रम दिसला. हा आश्रमसुद्धा विश्वामित्रांनीच आपल्या सामर्थ्यानं निर्माण केलेला होता. राजा आश्रमाच्या जवळ पोहोचताच आतून दोन सुंदर तरुणी फुलांचे हार आणि शीतपेय घेऊन त्याच्या स्वागतासाठी पुढे आल्या. हरिश्चंद्र त्या स्वागतामुळे सुखावला. तो जरा वेळ विश्रांती घेत तिथेच थांबला. त्यानंतर उठून तो परत जायला निघाला. जाण्यापूर्वी त्यानं त्या दोघींचे मनापासून आभार मानले आणि परत गेल्यावर आपण आपल्या खजिन्यातून त्यांच्यासाठी मौल्यवान भेटवस्तू पाठवणार असल्याचं त्यांना सांगितलं.

परंतु त्या सुंदर स्त्रिया म्हणाल्या, ''महाराज, आम्हाला तुमच्याकडून

कोणतीही भेटवस्तू नको; परंतु तुम्ही आमच्याशी विवाह करावा, अशी आमची इच्छा आहे.''

त्या असा काही प्रस्ताव पुढे ठेवतील, अशी हरिश्चंद्रानं कल्पनासुद्धा केली नव्हती. तो म्हणाला, ''हे तरुणींनो, मी तुमच्याशी विवाह करू शकत नाही. मला एक पत्नी आणि एक पुत्र आहे. असं असताना मी परत विवाह करणं हा तर अधर्म होईल.''

त्याच वेळी विश्वामित्र तिथे आले. ते म्हणाले, ''हे राजा, हा माझा आश्रम आहे. तू माझी परवानगी न घेताच माझ्या आश्रमात प्रवेश केलास आणि आता तू माझ्या या दोन कन्यांच्या इच्छेचा अव्हेर करून त्यांचा अपमान करत आहेस. तुझी ही चूक दुरुस्त करण्याचा एकमेव मार्ग, म्हणजे तू त्यांच्या प्रस्तावाचा स्वीकार करून त्यांच्याशी विवाह कर.''

परंतु राजानं अत्यंत नम्रपणे त्यांना नकार दिला.

विश्वामित्र आपला हट्ट सोडायला तयार नव्हते. अखेर राजा हरिश्चंद्र त्यांना म्हणाला, ''मुनिवर, मी तुमच्या कन्यांशी विवाह करण्यापेक्षा माझ्या राजगादीचा त्याग करणं जास्त पसंत करेन. मी कोणत्याही परिस्थितीत धर्माच्या विरोधात जाऊन काहीही करणार नाही.''

राजाच्या तोंडचे हे शब्द ऐकताच विश्वामित्र ऋषी लगेच म्हणाले, ''तसं असेल, तर आत्ताच्या आत्ता तुझं राज्य माझ्याकडे सुपूर्त कर. आत्ताच्या आता पाणी घेऊन ये आणि इथल्या इथे तुझ्या राज्यावर पाणी सोड.''

त्यानंतर क्षणभरासाठीही न घुटमळता राजा हरिश्चंद्रानं आपलं संपूर्ण राज्य विश्वामित्राच्या हवाली केलं.

एकदा हरिश्चंद्राकडून राज्याचं दान प्राप्त केल्यावर विश्वामित्र म्हणाले, ''कोणतंही दान हे दक्षिणेशिवाय पूर्ण होत नाही. दानावर दक्षिणा तर द्यावीच लागते.''

''मुनिवर, सांगा तुम्हाला काय दक्षिणा देऊ?'' राजा हरिश्चंद्र म्हणाला.

''माझी अशी इच्छा आहे, की तू एका अत्यंत उंच माणसाला हत्तीच्या पाठीवर उभा करून त्याला एक नाणं जमिनीवर टाकायला सांग. त्या हत्तीच्या पायापासून ते त्या नाण्यापर्यंत रुंदीचा आणि त्या हत्तीच्या पाठीवर उभ्या असलेल्या माणसाच्या मस्तकाच्या उंचीचा सुवर्णाचा ढीग मला हवा आहे.''

''हो. नक्कीच. मी राजधानीत पोहोचलो, की राजवाड्यात गेल्यावर तातडीने तुम्हाला तेवढं सोनं पाठवण्याची व्यवस्था करतो.'' हरिश्चंद्र म्हणाला.

''पण अरे, तुझं राज्य तर आता माझं झालं आहे ना? मग राज्याचा खजिनाही माझाच नाही का? मग त्या खजिन्यातून तर तू काहीच काढून घेऊ शकत नाहीस.'' विश्वामित्र म्हणाले.

''मी माझ्या खासगी धनसंपत्तीचा वापर करून तुमचं ऋण फेडेन.'' हरिश्चंद्र म्हणाला.

''जेव्हा कुणी आपलं संपूर्ण राज्यच दुसऱ्याला दान म्हणून देतो, तेव्हा त्याची काही खासगी मालमत्ता शिल्लक उरतच नाही,'' विश्वामित्र परखडपणे म्हणाले.

''मुनिवर, मी तुमच्या बोलण्यावर नीट विचार करेन. पण कृपया मला आत्ता तरी जाऊ द्या. मला माझ्या कुटुंबीयांना घडल्या प्रकाराची माहिती द्यावी लागेल. मी तुमचे पैसे नक्की फेडेन.'' हरिश्चंद्र गयावया करत म्हणाला.

''हरिश्चंद्रा, मग मीही तुझ्यासोबत येतो, म्हणजे तू तुझं राज्य माझ्या हाती सुपूर्त करू शकशील.'' विश्वामित्र म्हणाले.

हरिश्चंद्रानं मान हलवून होकार दिला.

अयोध्येला पोहोचल्यावर हरिश्चंद्रानं तत्काळ आपली पत्नी आणि मुलगा यांना भेटून घडलेल्या प्रकाराची साद्यंत हकिगत त्यांच्या कानावर घातली. आता त्याची पत्नी राणी नव्हती, त्याचा पुत्र राजपुत्र नव्हता आणि लवकरच सर्व वैभवाचा, राजप्रासादाचा त्याग करून त्यांना तिथून निघावं लागणार होतं, याची त्यानं त्यांना कल्पना दिली.

हे सर्व ऐकल्यावर राणी तारामती संतप्त होईल किंवा अशा प्रकारे राजगादीचा त्याग करून हरिश्चंद्रानं निघून जाऊ नये यासाठी त्याचं मन वळवण्याचा प्रयत्न करेल, अशी विश्वामित्राची अपेक्षा होती; पण त्यांपैकी काहीच घडलं नाही.

तारामतीनं आपल्या पतीच्या निर्णयाबद्दल जरासुद्धा शंका घेतली नाही. उलट तिनं आपल्या आणि आपल्या पुत्राच्या अंगावरची उंची आभूषणं उतरवून ठेवली. ती म्हणाली, ''नाथ, मी तुमच्या या निर्णयाशी सहमत आहे. तुम्ही जे वचन दिलंत, त्याचं पालन करणं आपल्या सर्वांचं कर्तव्य आहे. मग

काहीही झालं तरी चालेल.''


त्यानंतर राजा हरिश्चंद्र विश्वामित्रांकडे वळून म्हणाला, ''मुनिवर, मी असं ऐकलंय, की काशी ही वैभवसंपन्न नगरी आहे. त्यामुळे मी आता माझ्या पत्नीसह आणि पुत्रासह तिकडे प्रयाण करतो आणि पैसे कमावतो. एकदा पुरेसे पैसे जमले, की मी तुमचे पैसे नक्की फेडेन.''

''परंतु हरिश्चंद्रा, काशी इथून खूप दूर आहे. तुला परत यायला अनेक वर्षं उजाडतील किंवा कदाचित तू परतच येणार नाहीस. परंतु तू तर मला सोनं देण्याचं वचन देऊन बसला आहेस. तेव्हा आता मी माझा शिष्य नक्षत्रक याला तुझ्यासोबत पाठवतो. या महिना अखेरीपर्यंत तू याच्याजवळ सर्व पैसे दे. आता या क्षणापासून इथे मी राज्य करेन.''

त्यानंतर हरिश्चंद्र, तारामती, रोहिताश्व आणि नक्षत्रक यांचा काशीच्या दिशेनं प्रवास सुरू झाला. आपल्या आवडत्या राजाची अशी दारुण अवस्था झालेली पाहून रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून त्या सर्वांना निरोप देत असलेले प्रजाजन हुंदके देऊन रडू लागले. त्या सर्वांना विश्वामित्र मुनींचा अतिशय राग आला होता; परंतु विश्वामित्रांनी मात्र त्यांच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलं. नक्षत्रक हासुद्धा त्याच्या गुरुजींप्रमाणेच दुष्ट होता. तो या कुटुंबाला शक्य तेवढा त्रास देत असे. सतत अन्नपाण्याची मागणी करायचा, प्रवासात वारंवार विश्रांतीसाठी थांबण्याचा हट्ट धरून बसायचा. तारामतीनं आजवरच्या आयुष्यात कधीच अशा प्रकारे पायी प्रवास केलेला नव्हता. त्यामुळे काही दिवसांतच अतिश्रमांमुळे तिला थकवा जाणवू लागला. पुरेशा अन्नपाण्याअभावी अशा प्रकारचा प्रवास करणं लहान वयाच्या रोहिताश्वालासुद्धा कठीण जात होतं, पण तरीही आईने किंवा मुलाने तोंडावाटे तक्रारीचा शब्दसुद्धा काढला नाही. आपण विश्वामित्रांना दिलेल्या वचनामुळे आपल्या कुटुंबीयांवर ही दुर्धर परिस्थिती ओढवली आहे, याचं हरिश्चंद्राला अतीव दुःख होत असे; पण तरीही विश्वामित्रांना दिलेल्या वचनाची पूर्तता करण्याचा त्याचा ठाम निर्धार होता.

रानावनातून हे सर्व जण मार्गक्रमण करत असताना आपल्या अंगच्या सामर्थ्याचा वापर करून विश्वामित्र वन्य श्वापदं, चोर-दरोडेखोर, वादळवारा, महापूर इत्यादी मायावी गोष्टी त्यांच्या अंगावर सोडत असत. अखेर हा प्रवासाचा बेत रद्द करून माघारी फिरण्यासाठी आपल्या पतीचं मन

नवे कोरे




# स्वप्नसृष्टी

**वि. स. खांडेकर**

संपादक

**डॉ. सुनीलकुमार लवटे**

**किंमत : २७०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

'स्वप्नसृष्टी' हा वि. स. खांडेकरांच्या सन १९२५ ते १९७६ या पाच दशकांतील निवडक भाषणांचा संग्रह असून, त्यात प्रसंग, विषय, औचित्य, शैली यांचं वैविध्य आहे. खांडेकरांची भाषणे प्रकट चिंतन असायची नि आत्मीय हितगुजही! ज्या कुणाला स्वातंत्र्यपूर्व भारताचं वास्तव अन् स्वातंत्र्योत्तर काळात समाजमनात आलेलं स्थित्यंतर आणि परिवर्तन समजून घ्यायचं आहे, त्यांना हा भाषणसंग्रह आरसा ठरेल. माणसाचं सारं जीवन म्हणजे स्वप्नांचा पाठलाग केल्यानंतर हाती येणारं वास्तव! भौतिक समृद्धीला जर भावनेची किनार अन् समाजहितदर्शी वृत्तीचा स्पर्श नि पूर्वअट असेल, तरच मनुष्यजीवन माणुसकीचं जिणं होतं; अन्यथा ते एक मे-फ्लाय संस्कृती बनतं, लक्तर विकृतीकडे वाटचाल करत राहतं, हे समजावणारी ही भाषणं माणुसकीचा भर चौकात लिलाव करणाऱ्या नि तमाशा मांडणाऱ्या वर्तमानकाळानं अंतर्मुख होऊन वाचायला हवीत!

वळवण्याचा तारामतीनं प्रयत्न करावा, यासाठी विश्वामित्रांनी हा अघोरी खेळ मांडला होता; परंतु तारामती मात्र त्यामुळे क्षणभरही विचलित झाली नाही. ती एखाद्या सावलीसारखी आपल्या पतीला साथ देत त्याच्यामागोमाग चालत राहिली. चालता चालता ती काशीविश्वेश्वराचं अव्याहत नामस्मरण करतच होती. अखेर विश्वामित्रांनी रचलेल्या सर्व मायावी संकटांचाही अंत झाला.

अशा प्रकारे समोरून येत असलेल्या संकटांना धीरानं तोंड देत ही सगळी माणसं काशी नगरात पोहोचली.

तो महिना अखेरीचा दिवस होता. लगेच नक्षत्रकानं पैशाची मागणी सुरू केली. ''ताबडतोब पैसे चुकते कर, अन्यथा शरणागती पत्कर.'' नक्षत्रक हरिश्चंद्राला म्हणाला.

त्याची मागणी पूर्ण करण्याचा कोणताच मार्ग हरिश्चंद्राला दिसेना. काय केलं म्हणजे आपल्याला हे पैसे उभे करता येतील, याविषयी विचार करकरून तो थकून गेला. आता आपण स्वतःला विकलं, तरच काहीतरी पैसे मिळवण्याची आशा आहे, आपलं ऋण फेडण्यासाठी आता हा एकच उपाय शिल्लक आहे, असं त्याने मनाशी ठरवलं. त्याला आजवरच्या आयुष्यात इतका कठीण निर्णय घेण्याचा प्रसंग कधीही आलेला नव्हता. त्यानं त्यावर खूप वेळ विचार केला. अखेर नगराच्या मध्यवर्ती ठिकाणी उभा राहून त्याने एक घोषणा केली, ''मी, माझी पत्नी आणि मुलगा इथे आमची स्वतःची विक्री करण्यासाठी उभे आहोत. जो कुणी खरेदी करण्यासाठी तयार असेल, त्याच्यासाठी माझी एकच अट आहे. त्यानं एका उंच माणसाला एका हत्तीच्या पाठीवर उभं करावं. त्या माणसास एक नाणं जमिनीवर दूर फेकण्यास सांगावं. हत्तीच्या पायापासून ते नाणे जिथे जाऊन पडेल तिथपर्यंतचा पाया असलेली आणि त्या माणसाच्या मस्तकापर्यंत उंच असलेली सोन्याची रास इथे आणून उभी करावी. जर ही किंमत मोजण्यास कुणी तयार असेल, तर त्यानं येऊन आम्हाला दास बनवून घेऊन जावं.''

त्यावर एक वयोवृद्ध माणूस तिथे येऊन म्हणाला, ''माझी पत्नी आजारी असून अंथरुणाला खिळलेली आहे. त्यामुळे घरकाम आणि स्वयंपाक करण्यासाठी मला एका नोकराणीची गरज आहे. तुम्ही सांगितलेल्या किंमतीपैकी काही भाग मी चुकता करण्यास तयार आहे.''

त्याचे ते शब्द ऐकून तारामती हुंदके देऊन रडू लागली.

''मला अशी रडकी नोकराणी मुळीच नको आहे. मला प्रामाणिकपणे घरकाम करणारी स्त्री हवी आहे.'' तो वयस्कर माणूस म्हणाला. त्याला तारामतीच्या कामाबद्दल खात्री वाटत नव्हती. तारामती घाईघाईनं अश्रू पुसत म्हणाली, ''नाही नाही. असं नका करू. मी तुमच्यासोबत येते. मी आनंदानं, मन लावून घरकाम करीन; पण कृपा करून माझ्या मुलाला माझ्याबरोबर राहण्याची परवानगी द्या.''

त्यावर तो वयस्कर माणूस म्हणाला, ''म्हणजे आता तुमच्याबरोबर तुमच्या या मुलालाही अन्नपाणी पुरवण्याची जबाबदारी माझ्यावर येणार.''

''पण महाराज, माझी आणि माझ्या मुलाची ताटातूट झाली, तर ती गोष्ट मला सहन होणार नाही हो.'' तारामती व्याकूळ होऊन म्हणाली. ''पण तुम्ही एका गोष्टीची खात्री बाळगा. माझा मुलगा नुसता बसून खाणार नाही. तोही घरकामात मदत करेल.''

त्या माणसाचं आणि तारामतीचं संभाषण ऐकून हरिश्चंद्र दुःखविव्हल झाला. वयस्कर माणसाला तो सौदा पटला. तो तारामतीला आणि रोहिताश्वाला घेऊन तिथून निघणार, इतक्यात जवळ उभा असलेला नक्षत्रक त्याला म्हणाला, ''यांच्या किमतीचं सोनं आत्ता तरी तुम्ही तुमच्यापाशीच ठेवा. लवकरच माझे गुरुजी विश्वामित्र तुमच्या घरी येऊन ते घेऊन जातील.''

तारामतीनं मागे वळून एकवार प्रेमानं आपल्या पतीला निरखून पाहिलं. त्यानंतर एक अक्षरही न बोलता ती आपल्या मुलाचा हात धरून तिथून निघाली.

आता हरिश्चंद्र तिथे एकटाच उरला. त्यानं परत एकदा घोषणा केली, ''मला जेवढ्या पैशांची गरज आहे, तेवढे पैसे एकरकमी जो द्यायला तयार असेल, तर मी त्याचा आजन्म दास होऊन राहीन.''

त्याचे शब्द ऐकताच भोवती जमलेल्या घोळक्यातून एक धष्टपुष्ट माणूस हरिश्चंद्राच्या जवळ येऊन उभा राहिला. तो म्हणाला, ''माझं नाव वीराबाबू. मणिकर्णिका घाटाचा मी मालक असून, तिथली व्यवस्थाही मीच पाहतो. मणिकर्णिका घाटापाशी या शहराची दहनभूमी आहे. मला तिथे कामात कुणीतरी मदतनीस हवाच आहे. त्यामुळे मी जन्मभरासाठी तुला माझा दास म्हणून ठेवून घ्यायला तयार आहे.''

वीराबाबूनं तत्काळ पैशांची व्यवस्था केली. तो जेव्हा हरिश्चंद्राचा हात

धरून त्याला आपल्यासोबत घेऊन जाऊ लागला, तेव्हा मात्र नक्षत्रकाला मनोमन दुःख झालं. एका राजावर स्मशानघाटाची साफसफाई करण्याची वेळ यावी, या दुर्दैवाचं त्याला खूपच वाईट वाटलं; परंतु विश्वामित्रांनी त्याच्यावर सोपवलेली कामगिरी पार पाडण्याची त्याला जबाबदारी होती. नक्षत्रक वीराबाबूला म्हणाला, ''याच्या किमतीएवढं सोनं तुम्ही आत्ता स्वतःपाशीच ठेवा. माझे गुरुजी विश्वामित्र एका दिवसानंतर तुमच्या घरी येऊन ते घेऊन जातील.'' एवढं बोलून नक्षत्रक तिथून निघाला.

''मी मणिकर्णिका घाटाचा मालक आहे, हे तर मी तुला सांगितलंच आहे. अशी एक आख्यायिका आहे, की भगवान शंकरांची पहिली पत्नी सती ही आपल्या पित्याच्या यज्ञकुंडात उडी मारून जेव्हा मरण पावली, तेव्हा संतप्त झालेल्या शिवानं या ठिकाणी तांडवनृत्य केलं. सतीच्या कानातील कुंडल याच जागी पडलं होतं. त्यामुळे या ठिकाणाचं मणिकर्णिका असं नाव पडलं. आपण जर काशीला येऊन देह ठेवला आणि आपल्या रक्षेचं जर गंगेच्या प्रवाहात विसर्जन करण्यात आलं, तर आपल्याला मुक्ती मिळते, असा लोकांचा समज आहे. आता मी तुला तुझी कामं समजावून सांगतो. तुला मुख्यतः या दहनभूमीची रोजच्या रोज स्वच्छता करावी लागेल. जेव्हा कुणीही मृत व्यक्तीला दहनसंस्कारासाठी इथे घेऊन येतं, तेव्हा त्या उपचारांसाठी मी काही सुवर्णमुद्रा शुल्क म्हणून आकारतो. मी त्या स्वतःसाठी ठेवून घेतो. त्यांतली एक सुवर्णमुद्रा आणि एक लंगोटी मी तुला देईन. एक गोष्ट कायम लक्षात ठेव. कोणत्याही मृतावर अग्निसंस्कार निःशुल्क करायचा नाही. तू अहोरात्र या ठिकाणी उपलब्ध असला पाहिजेस. कारण मृत्यूचा घाला कधी पडेल हे काही सांगता येत नाही. त्याचप्रमाणे दहनभूमीवर कोणताही प्राणी येता कामा नये, वन्य श्वापदांचा संचार होता कामा नये, या भूमीचं पावित्र्य भंग पावता कामा नये. हे पाहणं हीसुद्धा तुझीच जबाबदारी आहे. या सूचना तुला कायम लक्षात ठेवाव्या लागतील.''

हरिश्चंद्रानं होकारार्थी मान हलवली. आपल्याला आता नेहमीच मणिकर्णिका घाटावरती वास्तव्य करून राहावं लागणार, हे त्याच्या लक्षात आलं.

काही काळानंतर वीराबाबूचं निधन झालं. हरिश्चंद्र त्या घाटावर आता एकटाच उरला.

एक दिवस गंगा नदीच्या तीरी तो उभा होता. तो गंगेच्या प्रवाहाकडे टक लावून बघत होता. शरयू नदीच्या तटी उभ्या असलेल्या आपल्या जुन्या राजधानीबद्दलच्या विचारांनी त्याचं मन भरून गेलं. नियतीने हा काय खेळ मांडला होता? क्षणार्धात राजाचा रंक झाला होता. त्याच वेळी त्याच्या मनात आपल्या पत्नीचा आणि मुलाचा विचार आला. आत्ता ते कुठे असतील, काय करत असतील, या विचारांनी तो फार अस्वस्थ झाला. त्यांच्या आयुष्यात उद्भवलेल्या संकटांना, त्यांच्यावर ओढवलेल्या सर्व दारुण परिस्थितीला केवळ आपणच जबाबदार आहोत, याचं त्याला फारच दुःख झालं. त्याचं हृदय जरी अशा प्रकारच्या दुःखानं भरून गेलं असलं, तरी त्याचं मन मात्र एका बाबतीत शांत होतं. त्यानं आपलं वचन पाळलं होतं. अशा रीतीनं हरिश्चंद्राचं नवीन आयुष्य सुरू झालं.

इकडे तारामती त्या वयस्कर माणसाच्या घरी कामाला लागलीच होती. दिवस उजाडल्यावर ती कामाला सुरुवात करायची. रात्रीपर्यंत न थकता तिचं काम अव्याहत चालू असायचं. तरीसुद्धा ते वृद्ध पतिपत्नी तिच्या कामात काही ना काही चूक काढून तिला उणंदुणं ऐकवत असत. रोहिताश्वसुद्धा दिवसभर कामाला जुंपलेला असे. खरं तर तो जन्मानं राजपुत्र होता. आजवरच्या आयुष्यात त्यानं युद्धविद्येचं शिक्षण घेऊन त्यात नैपुण्य मिळवलेलं होतं. त्याच्या पुढेमागे दासदासी तिष्ठत असत, पण आता मात्र त्याला अंगमेहनतीची कामं करावी लागत. तो लाकडं फोडण्याचं आणि साफसफाईचं काम करत असे. एवढे कष्ट करूनसुद्धा त्याला पोटभर अन्न देण्यात येत नसे. या अतिश्रमांनी आणि अर्धपोटी राहून आपल्या मुलाचं शरीर अशक्त राहील, त्याची पुरेशी वाढहोणार नाही, अशी भीती तारामतीला वाटत असे. पण तरीही आई आणि मुलगा आल्या प्रसंगाला धीराने तोंड देत होते.

एक दिवस त्या वृद्ध माणसाच्या घरी श्राद्ध होतं. त्यामुळे त्यानं रोहिताश्वला अरण्यात लाकडं गोळा करण्यासाठी पाठवलं. रोहिताश्व कुऱ्हाड घेऊन जवळच्या रानात गेला. त्याच वेळी विश्वामित्रांनी एक मायावी सर्प निर्माण करून तो रोहिताश्ववर सोडला. सर्पानं रोहिताश्वला दंश करताच तो तत्क्षणी मरण पावला.

जवळपासच्या काही लोकांनी हे दृश्य पाहताच त्यांनी पळत वृद्धाच्या

घरी येऊन ही दुःखद बातमी तारामतीच्या कानी घातली. तारामती शोकविव्हल अवस्थेत त्या वृद्धाच्या हाता-पाया पडून रुदन करत म्हणाली, ''महाराज, मला माझ्या बाळाकडे जाऊ द्या.''

त्यावर तो वृद्ध उत्तरला, ''आज घरात श्राद्ध आहे. केवढं तरी काम पडलं आहे. या असल्या गोष्टीत लक्ष घालायला मला अजिबात सवड नाही. तुला जिथे कुठे जायचं ते जा; पण श्राद्धाला प्रारंभ होण्यापूर्वी घरी परत ये.''

तारामती रडत रडत जीव मुठीत धरून रानात गेली. आपल्या मुलाचा निश्चेष्ट देह पाहताच तिनं काशीविश्वेश्वराची आळवणी सुरू केली. ''हे परमेश्वरा, तू आमची इतकी कठोर परीक्षा घेतलीस, ती पुरेशी नव्हती का? आता तर तू माझ्या बाळाला माझ्यापासून हिरावून घेतलंस. तू इतका कठोर कसा काय होऊ शकलास? तू माझ्या बाळाला असं कसं हे जग सोडून जाऊ दिलंस?''

तारामती आसवं गाळत कितीतरी वेळ तिथेच बसून होती. अखेर तिच्या डोळ्यांतले अश्रूसुद्धा संपले. तिचे डोळे कोरडे झाले. इतक्यात आपल्याला लवकर घरी परत जावं लागणार, याची तिला आठवण झाली. आपल्या मुलाचं प्राणहीन कलेवर उचलून घेऊन ती मणिकर्णिका घाटावर आली.

तिथे सर्वत्र शांतता होती. दूरवर एक माणूस घाटाच्या साफसफाईचं काम करत होता. तो वगळता तिथे आणखी कुणीच नव्हतं. तो पाठमोरा होता. तारामती त्याला हाक मारून म्हणाली, ''महाराज, माझ्या पुत्राच्या शरीराला अग्नी द्यायचा आहे. तुम्ही मला इथे त्याचं दहन करण्याची परवानगी द्याल का?''

तो माणूस मागे वळूनही न बघता म्हणाला, ''त्यासाठी लागणारे पैसे तुमच्याकडे आहेत का?''

''नाही, महाराज. मी एका श्रीमंताघरी नोकराणीचं काम करणारी गरीब बाई आहे. माझ्याजवळ पैसे नाहीत.''

''तसं असेल तर मग इथे दहन होणार नाही.'' तो म्हणाला.

त्यावर तारामती आक्रोश करू लागली. ती म्हणाली, ''हे रोहिताश्वा, बघ नशिबाने तुझी ही काय थट्टा मांडली आहे. एक राजपुत्र म्हणून जन्माला येऊन आता तू रंक म्हणून मृत्यू पावलास आणि तुझ्यावर अंतिम संस्कार करण्यासाठी माझ्याकडे फुटकी कवडीसुद्धा नाही. मी आता काय करू, हे

नवे कोरे

# गाढवाची गीता आणि गाजराची पुंगी




## वि.स.खांडेकर

संपादक

**डॉ. सुनीलकुमार लवटे**

**किंमत : २५०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

'गाढवाची गीता आणि गाजराची पुंगी' हा वि.स.खांडेकरांनी विनोदी शैलीत केलेल्या लेखनाचा संग्रह. विनोदी लेखांमधून खांडेकर समाजबदल टिपतात, आपली निरीक्षणं नोंदवतात. 'वर्तमानावर केलेलं भाष्य' असं या लेखनाचं स्वरूप आहे! विसंगत झालेल्या श्रद्धा नि कल्पनांना धक्का देण्याच्या हेतूने झालेले हे लेखन होय. विनोद हा 'फॉर्म' नसून 'वृत्ती' आहे, ज्यांना समजून घ्यायचं आहे त्यांच्याकरिता सदर पुस्तक वस्तुपाठ ठरावे असे आहे. यात नाट्यछटेची कलात्मकता नि एकांकिकेची संवादशैली याचं सुंदर मिश्रण आहे. एका साहित्यिक चिंतकाचं 'स्वगत' 'प्रकट' होणं काय असतं ते हे लेखन समजावतं.

मला समजतच नाहीये.''

तारामतीच्या तोंडचे ते शब्द ऐकताच ती दुसरी तिसरी कुणीही नसून आपली पत्नी आहे, हे हरिश्चंद्राला कळलं. तो आता ताठ उभा राहत तिच्याकडे पाठ करूनच म्हणाला, ''तुझ्या गळ्यात मंगळसूत्र तर आहे ना? मग जा, ते विकून पैसे आण.''

तारामती आश्चर्यचकित होऊन म्हणाली, ''माझ्या गळ्यातलं मंगळसूत्र तुम्हाला कसं काय दिसलं? कारण माझं हे मंगळसूत्र मंतरलेलं, एका अद्वितीय शक्तीनं भारलेलं असून, हे जगात फक्त दोघांनाच दिसू शकतं. एक तर काशीच्या विश्वेश्वराला किंवा माझ्या पतीला. तुम्ही नक्की कोण आहात?''

त्यावर हरिश्चंद्र मागे वळला. तो साक्षात आपला पतीच आहे, हे तारामतीनं पाहिलं. हरिश्चंद्रानंही आपल्या पत्नीकडे पाहिलं आणि त्याचा बांध फुटून तो रडू लागला. त्यानंतर स्वतःला सावरून तो म्हणाला, ''हे बघ, आपला पुत्र तर गेलाच, पण त्याच्या क्रियाकर्मासाठी लागणारे पैसे तुला आणावे लागतील. मी माझं स्वतःचं शुल्क घेतलं नाही, तरी माझ्या मालकाच्या वाटणीचं शुल्क मला आकारावंच लागेल. त्यामुळे तारामती तू जा आणि तुझ्या मालकाकडून पैसे घेऊन ये.''

''अहो, पण तो म्हातारा माणूस आम्हाला पोटभर अन्नसुद्धा देत नाही. तुम्हाला काय वाटतं, तो मला पैसे देईल?'' तारामती म्हणाली. ''नाथ, तुम्ही थोडी तरी दया करा. रोहिताश्व जसा माझा पुत्र आहे, तसाच तो तुमचासुद्धा पुत्र आहे. आपण मृतदेहाला जास्त वेळ असं ठेवू शकत नाही. तेव्हा थोडी दया करा आणि आपल्या मुलावर अंतिम संस्कार करा.''

परंतु हरिश्चंद्राने दुःखानं मान हलवून नाही म्हटलं.

आपण आपल्या पतीचा निर्णय कदापि बदलू शकणार नाही, हे तारामतीला कळून चुकलं. मग आता सर्व काही देवाच्या इच्छेवर सोडून ती म्हणाली, ''ठीक आहे. मला काय करता येतं ते बघते.'' मग ती आपल्या मुलाचा मृतदेह तिथेच सोडून निघून गेली.

ती आपल्या मालकाकडे परत येत असताना तिला रस्त्यात एका मुलाचा मृतदेह पडलेला दिसला. तो मृत मुलगासुद्धा साधारणपणे तिच्या रोहिताश्वाच्याच वयाचा होता. तारामतीचं मन दुःखानं इतकं बधिर झालेलं

होतं, की हा आपल्याच मुलाचा मृतदेह आहे असं समजून ती त्या मृतदेहाचं डोकं मांडीवर घेऊन बसली. ती म्हणाली, ''अरे रोहिताश्वा, बाळा तू पुन्हा जिवंत झालास का?''

तो मृतदेह काशी नगरीच्या राजपुत्राचा होता. हीसुद्धा त्या क्रूरकर्मा विश्वामित्राचीच करणी होती. त्यांनी दरोडेखोरांच्या करवी काशीच्या राजपुत्राचं अपरहरण करून त्याला मारून टाकलं होतं. तेव्हापासून राजाचे शिपाई राजपुत्राच्या मृतदेहाचा शोध घेत सगळीकडे हिंडत होते. इतक्यात त्यांना राजपुत्राच्या मृतदेहाचं डोकं आपल्या मांडीवर घेऊन बसलेली तारामती दिसली. या स्त्रीनंच आपल्या राजपुत्राचा वध केला असं समजून त्यांनी तारामतीला मुसक्या बांधून ओढत फरपटत राजाकडे नेलं. ''महाराज, ही पाहा दुष्ट स्त्री. हिनेच आपल्या राजपुत्राचे प्राण घेतले आहेत.''

राजा अत्यंत शोकाकुल अवस्थेत होता; पण राणीनं जेव्हा आपल्या पुत्राचं कलेवर पाहिलं, तेव्हा ती दुःखानं मोडून पडली.

तारामतीच्या मनावरही दुःखाच्या आघातानं विपरीत परिणाम झालेला होता. ती काहीबाही असंबद्ध बरळत होती. ती म्हणाली, ''माझ्या मुलाचा सर्पदंशानं मृत्यू झालेला आहे, पण त्याच्या दहनसंस्काराचे पैसे भरल्याशिवाय त्याची अंतिम क्रिया करण्यासाठी माझे पती तयार नाहीत.''

राजालाही दुःखावेगामुळे काहीही सुचत नव्हतं. त्यामुळे काहीही विचार न करता तो म्हणाला, ''जा, या स्त्रीचा वध करा. तिला मणिकर्णिका घाटावर घेऊन जा आणि तिथेच तिचा शिरच्छेद करा.''

मग राजाचे शिपाई तारामतीचे हातपाय बांधून तिला मणिकर्णिका घाटावर घेऊन आले. ''या अपराधी स्त्रीचा वध करण्याचा महाराजांनी तुम्हाला हुकूम दिला आहे.'' राजाचे शिपाई हरिश्चंद्राला म्हणाले. तारामतीच्या चेहऱ्याकडे लक्ष जाताच हरिश्चंद्राला फार मोठा धक्का बसला. हे असं काही अघटित घडेल, याची तर त्यानं स्वप्नातही कल्पना केली नव्हती. तारामतीनं राजपुत्राला मारलेलं नाही, हे त्याला माहिती होतं, पण तिचा शिरच्छेद करण्याची राजानं आज्ञा केली होती. त्या आज्ञेचं पालन करणं, हे त्याचं कर्तव्य होतं.

त्यानं आपले डोळे घट्ट मिटून घेऊन हातातली तलवार वर उचलून धरली. तारामतीचं शिर धडावेगळं करण्याच्या उद्देशानं त्यानं ती जोरात

खाली आणली.

त्या क्षणी नवल घडलं. आकाशातून हरिश्चंद्राच्या अंगावर पुष्पवृष्टी होऊ लागली. त्याने डोळे उघडले. त्याच्या समोर वसिष्ठ मुनी उभे होते. ते म्हणाले, ''हरिश्चंद्रा, आज तुझा खरा कस लागला होता. तू एका फार मोठ्या सत्त्वपरीक्षेला उतरलास. मला तुझा खूप अभिमान वाटतो.''

हरिश्चंद्र घाबरून गेला. हे सगळं काय चाललंय, हे त्याला समजेना. तारामतीसुद्धा घाबरून गेली.

तेवढ्यात डोळ्यांच्या कोपऱ्यातून हरिश्चंद्राचं रोहिताश्वाकडे लक्ष गेलं. त्याला थोडीशी हालचाल जाणवली. जरा वेळातच रोहिताश्वानं डोळे उघडून इकडेतिकडे पाहिलं. तो आळोखेपिळोखे देत उठून बसला. जणू काही गाढझोपेतून जागा व्हावा, तसा.

एव्हाना विश्वामित्रांनी पसरलेल्या मायाजालाचा प्रभावही नष्ट झालेला होता. काशीचा राजासुद्धा तिथे आला. त्याच्या पाठोपाठ धावतच त्याचा मुलगाही तिकडे येऊन पोहोचला. तो अगदी आनंदी आणि आरोग्यपूर्ण दिसत होता.

विश्वामित्र आपला शिष्य नक्षत्रकासोबत तिथे आले. ते हरिश्चंद्राला म्हणाले, ''तुझं वागणं खरोखरच अत्यंत अभिमानास्पद आहे. तुला अत्यंत कठोर अशा कसोट्यांमधून जावं लागलं. मीच तुझी परीक्षा घेत होतो; परंतु त्या सर्व दिव्यांमधून तू अतिशय खंबीरपणे पार झालास. तू तुझा निश्चय कुठेही डळमळीत होऊ दिला नाहीस. मनाचा समतोल एकदासुद्धा ढळू दिला नाहीस. तू या पृथ्वीतलावरचा सर्वाधिक न्यायानं वागणारा आणि धर्माला अनुसरून चालणारा राजा आहेस. जोपर्यंत हे जग अस्तित्वात आहे, तोपर्यंत काशीविश्वेश्वराच्या साक्षीने सर्व जण तुला सत्य हरिश्चंद्र म्हणूनच ओळखतील. हा मणिकर्णिका घाट देशातल्या अत्यंत पवित्र स्थळांपैकी एक मानला जाईल. मी तुझं राज्य तुला परत करत आहे. शिवाय माझ्या वाट्याचं जे काही पुण्य आहे, त्यातील अर्धा भाग मी तुला देत आहे.''

हरिश्चंद्रानं त्या दोन्ही ऋषींना वंदन करून त्यांचे आशीर्वाद घेतले. मग तो आपल्या कुटुंबीयांसोबत आपल्या अयोध्या नगरीला परत गेला. त्यानं अत्यंत समर्थपणे राज्यकारभार सांभाळला.

आजही जर एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीचा सावलीसारखा पाठलाग

करत तिला सतत त्रास देत असेल, तर अशा व्यक्तीला नक्षत्रक असं म्हणतात. 'नक्षत्रकाप्रमाणे माझा पाठलाग करू नको!' अशा प्रकारचे वाक्प्रचार रूढझाले आहेत.

आजही तुम्ही जर काशी (वाराणसी) ला गेलात, तर मणिकर्णिका घाटावर दहनाच्या प्रतीक्षेत थांबलेल्या मृतदेहांच्या राशी बघायला मिळतात. दहनानंतर त्यांची रक्षा गंगा नदीत विसर्जित करण्यात येते. अजूनही मणिकर्णिका घाटाची मालकी वीराबाबूच्या वारसांकडेच आहे आणि काशीविश्वेश्वर अजूनही सर्व घडामोडींचा साक्षीदार आहे.

◆

**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**


# टी बुक क्लब

**या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!**

चालू बुक क्लबचे सभासदत्व ₹ ५० भरून घेता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किमतीत मिळतात. पुस्तके प्रकाशित होताच आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते.

**ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील.**

या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील. या क्लबच्या सभासदांना आमच्या प्रकाशनाची इतर पुस्तके सवलतीत मिळतील.

**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹१०० भरून उपलब्ध असलेली कोणतीही आठ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किमतीत मिळवा.

पोस्टेज खर्च अतिरिक्त


# पुस्तक परिचय



# आयडिया मॅन



पॉल ॲलन यांनी बिल गेटस्च्या जोडीनं 'मायक्रोसॉफ्ट'ची स्थापना केली. पॉल ॲलन हे तंत्रज्ञ अब्जाधीश तर होतेच; परंतु परोपकारी कार्यातही त्यांनी प्रचंड मोठं योगदान दिलं आहे. ते व्हल्कन इनकॉर्पोरेशन या कंपनीचे अध्यक्ष होते आणि ॲलन इन्स्टिटट्यूट फॉर ब्रेन सायन्स या संस्थेचे संस्थापक होते. ते सिॲटल सी-हॉक्स आणि पोर्टलंड ट्रेल ब्लेझर्स या क्रीडासंघांचे मालक होते, तसेच 'सिॲटल साँडर्स' या व्यावसायिक 'पोलो सॉकर' संघांचे सहमालक होते.




**पॉल ॲलन**

अनुवाद

**स्वाती देशपांडे**

*एका व्यवहारकुशल आणि वास्तववादी भागीदाराशिवाय काम करण्यात केवढं मोठं आव्हान आहे, याची मला 'मायक्रोसॉफ्ट' पश्चातच्या काळात जाणीव झाली; परंतु तरीही स्वतःचा वेगळा मार्ग निवडल्याबद्दल मला जराही खेद किंवा हुरहुर वाटत नाही. माझ्या त्या निर्णयामुळे आयुष्यात मला विविध क्षेत्रांत अनेक उत्तम अनुभव घेता आले, त्यामुळे माझं आयुष्य जास्त परिपूर्ण होऊ शकलं. ज्या प्रकारच्या आयुष्याची मी अगदी सुरुवातीच्या दिवसांपासून स्वप्नं बघितली होती, ते आयुष्य मी उपभोगू शकलो. ज्या दिवसांत एखाद्या 'कॉम्प्युटर टर्मिनल'समोर चिकटून बसून मी 'कोड' लिहीत असे, त्यातली प्रत्येक ओळ निर्दोष करण्याच्या मागे लागलेला असे, तेव्हापासूनची माझी स्वप्नं प्रत्यक्षात उतरू शकली, ती माझ्या 'एकला चलो' या निर्णयामुळेच!!*

(‘आयडिया मॅन’ पुस्तकातून)

१९८२सालच्या डिसेंबर महिन्याच्या अखेरची गोष्ट. बिलच्या कार्यालयातून त्याच्या आणि स्टीव्हच्या तावातावानं बोलण्याचा आवाज माझ्या कानावर पडला, म्हणून मी थांबून कानोसा घ्यायला प्रयत्न केला. त्यांच्या संभाषणाचं सार समजणं फारसं अवघड नव्हतं. अलीकडच्या काळात मी कामाचा फारसा वाटा उचलत नसल्याबद्दल त्यांची कुरकुर चालली होती आणि कंपनीतले माझ्या वाट्याचे समभाग त्या दोघांकरता व इतर समभागधारकांकरता ‘ऑप्शन्स’ पद्धतीनं उपलब्ध करण्याचे त्यांचे बेत चालू होते. या मुद्द्यांवर ते काही काळापासून विचार करत आले होते, हे त्यांच्या संभाषणातून उघड होत होतं.

जे कानावर पडत होतं, ते ऐकणं अखेर मला असह्य झालं अन् मी बिलच्या कार्यालयात शिरलो अन् जोरात म्हणालो. ‘‘माझा माझ्या कानांवर विश्वासच बसत नाहीये! शेवटी एकदाचं तुम्ही तुमचं खरं रूप दाखवून दिलंत तर!!’’ मी त्या दोघांना उद्देशून बोलत होतो; पण माझी नजर मात्र बिलवरच रोखलेली होती. ‘मुद्देमालासकट’ पकडले गेल्यामुळे दोघंही अवाक् झाले होते. त्यांनी काही प्रतिक्रिया देण्याच्या आतच मी मागे वळलो आणि आल्या पावली तसाच परतलो.

परतीच्या रस्त्यावर गाडी चालवता चालवता माझ्या मनात त्या दोघांचे संवाद घोळत राहिले. जसजसे मी ते आठवायला लागलो, तसे ते मला जास्तच घृणास्पद वाटायला लागले. सुरुवातीला कंपनी स्थापन करण्याच्या कामात माझा पूर्ण सहभाग होता आणि नंतरही मी व्यवस्थापनाचा एक सक्रिय सदस्य या नात्यानं काम पाहत होतोच... काही काळापासून माझ्या आजारपणामुळे माझ्या कामातल्या सहभागावर थोडी मर्यादा पडली होती हे खरं होतं; पण माझा भागीदार आणि एक सहकारी, हे दोघं मिळून त्या संधीचा गैरफायदा घेऊ पाहत होते. केवळ पैशाकरता वाटेल ते करायला तयार असणारे ते दोघं माझ्या हक्काचा वाटाही गिळंकृत करू पाहत होते, यात मला शंकाच उरली नाही. हा सरळ सरळ संधिसाधूपणा होता... त्याच दिवशी संध्याकाळी काहीशा खजील झालेल्या स्टीव्ह बालमरनं माझ्या घरी फोन करून ज्योडीजवळ घरी मला भेटायला येण्याची इच्छा व्यक्त केली.

आम्ही दोघं बोलायला बसलो, तेव्हा त्यानं सुरुवात केली, ''हे बघ पॉल, आजच्या प्रसंगाबद्दल मला माफ कर– पण आम्ही फक्त मनातला उद्वेग बाहेर टाकत होतो. सध्या इतकं जास्त काम आहे, त्यामुळे आम्हाला एवढंच वाटत होतं, की कामात तुझा अजून जास्त सहभाग असता, तर जास्त बरं झालं असतं... आणि हो, ते समभागांबद्दलचं आमचं बोलणं अजिबात योग्य नव्हतं. किंबहुना; तुझ्यावर तो अन्यायच होईल. मी त्यात मुळीच पडणार नाही अन् मला वाटतं, बिलचादेखील खरं तसं काही करण्याचा इरादा नाहीये.''

मी स्टीव्हला सांगितलं, की काहीही असलं, तरी त्या प्रसंगामुळे माझं मन खट्टू झालं होतं. त्यानंतर काही दिवसांनीच बिलनी मला लिहिलेलं एक हस्तलिखित पत्र माझ्याकडे आलं. त्या पत्रावर तारीख होती ३१ डिसेंबर १९८२. आम्ही मायक्रोसॉफ्टमध्ये एकत्रितपणे काम केलेलं ते शेवटचं वर्ष अन् तो त्या वर्षाचा शेवटचा दिवस होता. त्या पत्रात बिलनं माझ्या कानावर चुकून पडलेल्या त्या दिवशीच्या संभाषणाबद्दल माफी मागितली होती. त्या पत्रातून बिलचा आमच्या भागीदारीबद्दल काय दृष्टिकोन होता, हेही पूर्णपणे स्पष्ट झालं.

*''गेल्या चौदा वर्षांत आपल्यामध्ये असंख्य मुद्द्यांवर मतभेद झाले आहेत, पण तरीही काही विशिष्ट निर्णयांबाबत आणि परिस्थितीबद्दलच्या एकूण दृष्टिकोनाच्या संदर्भात आपली जेवढ्या मुद्द्यांवर सहमती झाली होती, तेवढी इतर कुणा भागीदारांमध्ये झाली असेल, असं मला वाटत नाही.*

(हे वाचल्यावर माझ्या मनात आलं, की हे खरं होतं, की आम्ही असाधारण भागीदार होतो. आमच्यातलं समीकरण काही वेगळंच होतं. अनेक मतभेद असूनही आम्ही दोघांनी मिळून कंपनीच्या विकासाची जशी स्वप्नं बघितली, तशी हेवलेट आणि पॅकार्ड किंवा 'गुगल'चे सर्जी ब्रायन आणि लॅरी पेजसारखे काही मोजके अपवाद सोडले, तर इतर कुणा संस्थापकांनी पाहिली नव्हती.)

*''कित्येकदा मला वाटतं, की तुझ्या क्षमतेवर माझा तुझ्याहीपेक्षा जास्त*

*विश्वास आहे. 'सॉफ्ट कार्ड' बरोबरचं तुझं साहचर्य पाहून मी नेहमीच आश्चर्यात पडतो... स्पष्टच बोलायचं, तर 'सॉफ्ट कार्ड' सारख्या साक्षात्कारी कल्पना चांगल्या असतात पण आवश्यक नसतात.*

(मी विचारात पडलो. सॉफ्ट कार्ड ही माझी दुखरी नस होती, हे बिलला चांगलं माहीत होतं. एकीकडे त्यानं माझ्या योगदानाची दखल घेतली अन् त्याच वेळी ते काम फारसं महत्त्वाचं नव्हतं, हे ही दाखवून दिलं)

*''काही आघाड्यांवर कंपनी (मायक्रोसॉफ्ट) खूपच मजबूत बनली आहे; परंतु एका आघाडीवर मात्र कंपनीची अवस्था खूपच दुर्बल झाल्यागत आहे. आपण कंपनीत निर्मिती करतो ती पूर्वीइतकी एकमेव, अद्वितीय, अशी होत नाही. विविध उत्पादनांचे विनिर्देश आणि त्याबद्दलचा आपला एकूण दृष्टिकोन, हेदेखील पूर्वी जेवढे अनन्य असत, तसे आता आहेत असं आढळत नाही.*

(माझ्या मनात आलं, मायक्रोसॉफ्टच्या स्थापनेनंतर सुरुवातीच्या काळात आमच्याकडे मायक्रोकॉम्प्युटर्सकरता अतिशय सक्षम पण आटोपशीर असं BASIC होतं, तसंच आजमावून बघितलेले 'डेव्हलपमेंट टूल्स' ही होते. MS DOS मुळे जेव्हा आमचं बाजारावर आधिपत्य स्थापन झालं, तेव्हा त्या तोडीचं एकही उत्पादन बाजारात उपलब्ध नव्हतं; परंतु जसजसा कॉम्प्युटर उद्योग परिपक्व होऊ लागला, तसा मायक्रोसॉफ्टचा नवसंशोधनाचा दरही मंदावत गेला होता. जेवढ्या शक्य होतील, तेवढ्या नव्या, अभिनव कल्पना मिळवणं मायक्रोसॉफ्टला गरजेचं होतं आणि माझ्याकडच्या कल्पना त्याच्या हातून निसटून जाऊ नयेत, म्हणून बिलचा हा प्रयत्न होता.)

*''पॉल, कधी कधी मला वाटतं की तू मला सांगू पाहतो आहेस, की मी एक वाईट माणूस आहे किंवा कंपनी वाईट आहे. कधी कधी तर मला वाटतं, की या कंपनीच्या उभारणीत किती मेहनत खर्ची पडली आहे, याची तुला कल्पनाच नाहीये.*

(मला गंमत वाटली, कारण खरंतर बिल आणि त्याच्या सहकाऱ्यांनी मायक्रोसॉफ्टला एक महान कंपनी बनवण्याकरता जे कष्ट घेतले होते, त्याची मला पूर्ण जाणीव होती, कारण मीदेखील त्या प्रक्रियेचा एक भाग होतोच की!)

*''माझी खातरी आहे, की तू या मुद्द्यावर माझ्यापेक्षा जास्त विचार केला असशील; पण मला सांग, खरोखरच तुला एकट्याचा स्वतंत्र व्यवसाय सुरू करण्याची इच्छा आहे की काय? तुला काही काळ रजा घेण्याची आवश्यकता वाटत असेल, तर ते मी समजू शकतो; पण जर खरंच तुला स्वतंत्र व्यवसाय सुरू करायचा होता, तर तू बोस्टनला परत आलासच का? आणि हार्वर्डमधून बाहेर पडण्याकरता माझं मन तरी का वळवलंस? तुझं सर्वोत्तम काम असतं योजना तयार करणं आणि तिचा आराखडा बनवणं... ती योजना कार्यान्वित करणं, हे नाही.''*

(मला हे पटलं, कारण बिलचं म्हणणं अगदी रास्त होतं. आमच्या यशोमालिकेत माझी दूरदृष्टी आणि बिलचं अतुलनीय व्यवसायकौशल्य, हे अतिशय सुंदर रीत्या एकत्र गुंफलं गेलं होतं; परंतु मुद्दा तो नव्हताच. मला हॉजकिन्सनं घेरल्यामुळे निर्णय घेणं माझ्याकरता खूपच सोपं झालं होतं. जर माझा रोग पुन्हा बळावणार असेल, तर मायक्रोसॉफ्टमधील तणावपूर्ण कामाकडे पुन्हा वळण्यात काहीच हशील नव्हतं आणि आजारामुळे मला आयुष्याची किंमत कळून चुकली होती. त्यामुळे मी जर रोगमुक्त झालो असतो, तर आयुष्य नाखुशीत घालवण्याची मला बिलकूल इच्छा नव्हती.)

बिलचं पत्र, हा मला माझ्या निर्णयापासून परावृत्त करण्याचा अखेरचा प्रयत्न होता. आणि मला माहीत होतं, की त्यानं जे विचार मांडले होते, ते अतिशय तर्कसंगत होते, असा त्याचा विश्वास होता; पण त्यामुळे काहीच बदलू शकलं नाही. माझा निर्णय पक्का झाला होता.

नवीन वर्ष सुरू झालं, तेव्हा मायक्रोसॉफ्टमध्ये काम करण्यासारखं बरंच होतं. 'मल्टी-टूल' उत्पादनांच्या मालिकेतून एक नवीन 'हत्यार' घडवलं जात होतं... पुढे हेच 'मायक्रोसॉफ्ट ऑफिस' म्हणून ओळखलं जाऊ लागलं

'मॅक'करता काढलेल्या आवृत्त्यांवरचं काम अगोदरच चालू झालेलं होतं. 'विंडोज' - हे त्या काळाम 'इंटरफेस मॅनेजर' नावानं ओळखलं जात असे; परंतु विपणन विभागातल्या एका अधिकाऱ्यानं 'विंडोज' हे नाव जास्त आकर्षक वाटतं असं सुचवून बिलचं मन वळवल्यावर नवीन नाव वापरात आलं. त्या बाबतीतही बरीच उत्सुकता निर्माण झालेली होती. कंपनीकडची बरीच अभिनव उत्पादनं लवकरच बाजारात उतरण्याच्या मार्गावर होती. मी कंपनी सोडत असलो, तरी चांगलं बाळसं धरलेल्या अवस्थेत सोडतो आहे, याची मला खातरी पटली.

शेवटी शेवटी तर बिल आणि माझ्यातले मतभेद वादविवाद आणि आरडाओरडींच्या सत्रापल्याड पोहोचले होते. त्याच्या पराकोटीच्या स्पर्धात्मक वृत्तीमुळे तो एक ऐतिहासिक मुख्य कार्यकारी अधिकारी बनला होता; परंतु त्याच्या याच स्वभावामुळे आमचे नातेसंबंधही अस्थिर झाले होते. याचंच एक उदाहरण मी कंपनी सोडण्याच्या काही दिवस आधी समोर आलं. तो काळ असा होता, की माझी जबाबदारी असलेलं कोणतंही काम जर मी करू शकलो नाही, तर त्या प्रत्येक वेळी बिल मला त्याबद्दल जाब विचारत असे. अशाच एका प्रसंगी माझी बाजू मांडताना मी म्हटलं, ''TRS - 80 Model 100 मॅथ पॅकेज हे प्रचंड मोठं काम होतं आणि ते खूप चांगलं बनलं होतं.'' एक वर्षभरापूर्वी 'टँडी'नं त्यांच्या 'नोटबुक कॉम्प्युटर' करता (हा प्रकार त्या काळात फारसा प्रचलित नव्हता) आमच्याकडून डेसीमल फ्लोटिंग पॉइंट मॅथ' प्रोग्रॅम करवून मागितला होता... अचूक गणन करण्याकरता हा प्रोग्रॅम अत्यावश्यक असे. त्या प्रकारचं काम मी त्यापूर्वी कधीही केलं नव्हतं आणि ते परिपूर्ण होण्याकरता अनेक महिने घामही गाळला होता.

पण बिल म्हणाला, ''त्या प्रोग्रॅमचा सगळा 'कोड' मीच तर लिहिला होता.''

''खरं की काय?'' मी विचारलं. अशा प्रकारची विधानं करताना तो इतका ठासून, दृढविश्वासानं बोलायचा, की क्षणभर मीही कोड्यात पडायचो. त्या वेळीही तसंच झालं. मी विचार करू लागलो, 'खरंच मी तो कोड लिहिला होता का?' पण तरीही लगेच जाऊन त्या प्रोग्रॅमचा सोर्स कोड मी

शोधून काढला. तो छापून घेतला अन् माझ्या लक्षात आलं, की सगळा कोड खरंच मी लिहिला होता. बिलनं त्यातली एक ओळही लिहिली नव्हती. दुसऱ्या दिवशी मी ते कोडचे छापील कागद-लिस्टिंग घेऊन बिलच्या कार्यालयात गेलो अन् ते लिस्टिंग त्याच्यासमोर टाकलं. ''हे घे बिल... हेच ते मॅथ पॅकेज... यातला कोणता भाग तू लिहिला आहेस बरं?''

तो एक विचित्र क्षण होता. माझं बोलणं ऐकून खुर्चीत झुलता झुलता बिल एकदम थांबला. त्या कोडवर त्यानं एक नजर टाकली, मग जमिनीकडे नजर लावून म्हणाला, ''होय, तूच लिहिला होतास हा कोड.''

कधी कधी असं वाटायचं, की बिल 'मायक्रोसॉफ्ट'शी इतका एकरूप झाला होता, की कंपनी कुठे संपते अन् बिल कुठे सुरू होतो, त्याबद्दल त्याच्या मनात प्रचंड गोंधळ होता. मला मात्र स्वत:च्या बाबतीत तसं कधीच वाटत नसे. व्यवसाय माझ्याकरता खूप महत्त्वाचा होता, पण व्यवसाय हीच माझ्या व्यक्तिमत्त्वाची ओळख नव्हती. भविष्यात काय वाढून ठेवलं आहे, त्यातलं किती माझ्या वाट्याला येणार आहे, त्याचीही मला काहीच कल्पना नव्हती; पण तरीही मी आयुष्याच्या एका नव्या टप्प्याकडे आशेनं, अपेक्षेनं बघत होतो. माझ्या वडिलांचा सल्ला मी कधीच विसरलो नाही. ते म्हणायचे, ''आपण जे कोणते काम करू, ते अगदी आवडीनं केलं पाहिजे.'' नवनव्या कल्पनांची पोतडी घेऊन, उत्साहित अवस्थेत चार वर्षांपूर्वी मी सिअ‍ॅटलला परतलो होतो, तेव्हा मला आयुष्याच्या त्या टप्प्यावर पाहून बाबा संतुष्ट झाले होते. त्यांना वाटलं होतं, मला माझी आजीविका, माझं आव्हान सापडलं आहे... खरंतर मलाही तसंच वाटलं होतं; पण ती तेव्हाची गोष्ट होती... आता निघायची वेळ येऊन ठेपली होती.

जानेवारीत मी 'मायक्रोसॉफ्ट'चा एक अधिकारी या नात्यानं बिलला अखेरचा भेटलो. आम्ही त्याच्या कार्यालयातील सोफ्यावर बसलो होतो. माझी खातरी होती, की कंपनी सोडून जात असल्याबद्दल माझ्या मनात अपराधीपणाची भावना घालून तो मला कंपनीत राहण्यास भाग पाडेल. (व्हर्न राबर्न 'मायक्रोसॉफ्ट' सोडून 'लोटस'मध्ये नोकरीला गेल्यानंतर बऱ्याच महिन्यांनी बिलनं मला पत्र लिहून कळवलं होतं, की इतके महिने होऊन गेल्यावरही त्याला व्हर्नच्या त्या निर्णयामुळे, कुठे काय चुकलं, या

विचारामुळे 'गोंधळल्यागत आणि विद्ध झाल्यागत' वाटत होतं.) पण एकदा त्याच्या लक्षात आलं, की मी निर्णय बदलणार नाही, त्यानंतर त्यानं आपला कमीत कमी तोटा कसा होईल, हे बघण्याची शक्कल लढवली. १९८१मध्ये जेव्हा मायक्रोसॉफ्ट कंपनी ही 'मायक्रोसॉफ्ट इनकॉर्पोरेटेड' बनली होती, तेव्हाच आमची जुनी भागीदारी रद्दबातल झाली होती आणि त्याचबरोबर आमच्यात ''तीव्र मतभेद'' झाल्यास बिलनं मला कंपनी सोडायला लावण्याचे कलमही रद्द झाले होते, त्यामुळे त्यानं नवीन पवित्रा घेतला, त्याच्या पत्रातूनही त्यानं या मुद्द्याबद्दल आडून आडून सुचवलं होतंच. ''आता तू कंपनीतला तुझा वाटा ठेवणं औचित्यपूर्ण ठरणार नाही.'' तो म्हणाला. एवढंच नव्हे; तर त्यानं माझ्याकडचे समभाग विकत घेण्याचा दरही माझ्यापुढे ठेवला– 'प्रति समभाग पाच डॉलर्स.'

जेव्हा व्हर्ननं कंपनी सोडली होती, तेव्हा व्यवस्थापक मंडळानं एकमतानं त्याच्या वाट्याचे समभाग तीन डॉलर्सच्या दरानं विकत घेण्याचं ठरवलं होतं, त्यामुळे व्हर्नचं कोट्यवधी डॉलर्सचं नुकसान झालं होतं, हेदेखील मला माहीत होतं. मीदेखील अशाच कमी दरात माझे समभाग विकावेत, म्हणून बिल माझ्यावर दबाव आणेल, हे मी जाणून होतो; पण माझी गोष्ट व्हर्नपेक्षा वेगळी होती. व्हर्ननं 'मायक्रोसॉफ्ट' सोडून एका स्पर्धक कंपनीत नोकरी पत्करून त्याच्या नियुक्ती कराराचं उल्लंघन केलं होतं; परंतु मी 'मायक्रोसॉफ्ट'चा केवळ एक पगारी नोकर नव्हतो. मी कंपनीचा सहसंस्थापक होतो आणि कुठल्याही स्पर्धक कंपनीत नोकरी पतकरण्यासाठी 'मायक्रोसॉफ्ट' सोडत नव्हतो. ''मला माझा वाटा विकायचा आहे की नाही, ते मी अजून ठरवलं नाहीये,'' मी त्याच्या प्रस्तावाला प्रत्युत्तर दिलं. ''पण मी दहा डॉलर्सच्या दरापेक्षा कमी दराबद्दल चर्चा करायलादेखील तयार नाही.''

''छे! हे जमणार नाही.'' माझ्या अपेक्षेप्रमाणेच बिलनं माझा प्रस्ताव फेटाळून लावला. आमची 'बोलणी' तिथेच संपली पुढे 'मायक्रोसॉफ्ट'च्या समभागांची किंमत जेवढी वाढली, त्यावरून बिलचा कंजूषपणा माझ्या पथ्यावरच पडला होता, हे उघड झालं. जर मी सुचवलेल्या किमतीच्या आसपासचा दरही त्यानं मान्य केला असता, तर मी कदाचित ते विकलेही असते आणि ती विक्री योग्य वेळेपेक्षा खूपच आधी झाली असती.

१८ फेब्रुवारी १९८३ला माझ्या राजीनाम्याची खबर अधिकृतरीत्या बाहेर पडली. संचालक मंडळावरची माझी जागा कायम होती आणि नंतर कंपनीतल्या माझ्या योगदानाला आदरांजली म्हणून सर्वानुमते मला 'उपाध्यक्ष' म्हणून निवडलं गेलं. ज्या कंपनीच्या निर्मितीत मी हातभार लावला होता, त्या कंपनीकरता मी पुढेही मोलाचं योगदान देईन, अशा आशेतून हे पाऊल उचललं गेलं होतं.

माझ्या हॉजकिन्स डिसीज्नं गाशा गुंडाळल्यावर आता पुढे काय करायचं ते मला उमजत नव्हतं. मला एवढंच माहीत होतं, की मला माझं आयुष्य उपभोगायचं होतं. आयुष्यातली सौंदर्यस्थळं मला नव्यानं नजरेस येऊ लागली. कधी कधी मी चालता चालता अचानकपणे थांबून एखाद्या सुंदरशा फुलाकडे बघायचो किंवा आकाशातले रंग न्याहाळायचो किंवा जाणीवपूर्वक कुटुंबीयांसमवेत किंवा मित्रमंडळींसोबत वेळ घालवून त्या अमूल्य क्षणांची लज्जत लुटायचो. माझे 'मायक्रोसॉफ्ट'चे समभाग मी तोवर विकले नव्हते; पण तरीही माझी आर्थिक परिस्थिती बऱ्यापैकी मजबूत होती. माझं स्वत:चं एक छानसं घर होतं. बँकेत रोजच्या खर्चाकरता आणि हवं तेव्हा प्रवासाला जाण्यास काही काळ तरी पुरेल, एवढी 'माया' शिल्लक होती.

त्या वर्षीच्या वसंत ऋतूत मी मार्क मॅकडोनाल्ड आणि रिक वीलंडसोबत 'हवाई' बेटांवर गेलो. लहानपणी 'थंडरबॉल'सारख्या जेम्स बाँड चित्रपटातून सीन कॉनेरीची 'स्कूबा डायव्हिंग'संबंधित साहसी दृश्यं बघताना मला खूपच मजा वाटत असे. आम्ही ज्या हॉटेलमध्ये उतरलो होतो, तिथल्या पोहण्याच्या तलावात 'स्कूबा'करताचं उपकरण घालून श्वासोच्छ्वास करून पाहण्याची सुविधा होती. मी ती संधी सोडली नाही. दुसऱ्या दिवशी मी किनाऱ्यापासून जवळ असलेल्या भागात सूर मारला... पाण्याखाली प्रवाळाभोवती अनेक रंगीबेरंबी मासे विहार करत होते. त्या अनुभवामुळे मी 'डायव्हिंग'कडे पुरता आकृष्ट झालो. 'डायव्हिंग'मुळे मला एका वेगळ्याच अनुभवविश्वात जायला मिळालं... अवकाशात झेप घेणाऱ्या अंतराळवीराला त्या असामान्य अनुभवामुळे वाटतं, तसं मलाही वाटत होतं.

(त्यानंतर दोन वर्षांतच मी 'डायव्हिंग'चं प्रशिक्षण घेऊन एक प्रमाणित 'डायव्हर' बनलो. आजवर जगभरात अनेक ठिकाणी मी 'डायव्हिंग' केलं आहे..... अगदी गॅलापागोस द्वीपापासून ते तांबड्या समुद्रापर्यंत!! नित्याच्या जीवनक्रमातून मला 'डायव्हिंग' हा एक हवाहवासा बदल वाटतो.)

मी 'हवाई'च्या वारीहून घरी परतलो अन् काही दिवसांतच पुन्हा बाहेर पडलो. या खेपेला मी गाडीनं आमच्या जुन्या गावी, अनाडार्कोला, जायला निघालो होतो. शेवटच्या टप्प्यावर बाबादेखील माझ्यासोबत होते. आम्ही अनाडार्कोत माझ्या लुईकाकांना भेटायला गेलो. ते आम्हाला एका उत्तम बार्बेक्यु रेस्टॉरंटमध्ये जेवायला घेऊन गेले. त्यानंतर आम्ही त्यांच्या 'वेस्टर्न वेअर' या दुकानात गेलो. त्यांनी मला निवड करायला सांगितली, तेव्हा सापाच्या किंवा सुसरीच्या कातड्याचे बूट न घेता मी साध्या चामड्याचे बूट निवडल्यामुळे त्यांचा काहीसा अपेक्षाभंग झालेला दिसला. बाबाही माझ्यासोबत सिॲटलला परत निघाले... आमची मार्गक्रमणा चालू असताना त्यांनी तोवर कधीही स्पर्श न केलेला विषय काढला : 'दुसऱ्या महायुद्धातले त्यांचे अनुभव.' नॉर्मंडीत उतरलेल्या तुकडीचा ते एक घटक होते ''कधी कधी परिस्थिती प्रचंड धोकादायक होत असे,'' ते म्हणाले. त्यानंतर बाबांनी जर्मनीच्या 'बझ बॉब' वर्षावासंबंधीचा प्रसंग कथन केला. 'बझ बॉंब म्हणजे आजच्या क्रूज क्षेपणास्त्रांची सुरुवातीची आवृत्ती. बाबांनी सांगितलं की मित्रराष्ट्रांचं सैन्य इंग्लंडमध्ये खाडी पार करण्याकरता योग्य संधीच्या प्रतीक्षेत असताना बॉंबवर्षाव केला जात होता. बॉंबमधली पिन् अगोदरच काढून घेतल्यामुळे विशिष्ट उंचीवर पोहोचला की, त्यातली झडप बंद होऊन बॉंब खालच्या दिशेनं कूच करू लागे. वरून येणारा बॉंबचा आवाज ऐकू येईनासा झाला की सैनिक मिळेल त्या आडोशाला जाऊन लपत असायचे.

आमचा प्रवास चालू असताना बाबांनी शेवटी एक मोलाचं वचन सांगितलं, ''तुम्ही जर तुमच्या हाताखालच्या लोकांची काळजी घेतली, तर तेही वेळ पडल्यावर तुमची काळजी घेतील.'' इतकं बोलून ते त्यांच्या नेहमीच्या मौनावस्थेकडे गेले.

◆

२री आवृत्ती

# गांधर्वी

**बाणी बसू**

अनुवाद

**मृणालिनी गडकरी**




कंठात वैखरी, हृदयात मध्यमा, स्वाधिष्ठानात पश्यंती.

त्यापुढे गभीरात गेल्यावर ती वाणी माणसाला ऐकू येत नाही. ती मग होते परा. सुरलोकांच्या मार्गावरून चालता चालता एखादा अन्यमनस्क देवगंधर्व मर्त्यलोकात येऊन पडला तर त्याच्या दु:खाला पारावार राहत नाही. त्याला जेवढं देता येईल तेवढं तो देऊन जातो.

**किंमत : २००/-रु.। पोस्टेज : ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

३री आवृत्ती

# नियती

**माधवी देसाई**




नीती - अनीतीच्या आंदोलनात सापडलेल्या स्त्रीच्या जीवनाचा वेदनामय तरीही कणखर प्रवास

**किंमत : १२०/-रु.। पोस्टेज : ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# पुस्तक परिचय









ग्रेचेन रुबिन या आनंद या विषयावर लेखन करणाऱ्या लेखकांपैकी एक अंतर्मुख करायला लावणाऱ्या प्रभावी लेखिका आहेत. त्यांचे 'द हॅपिनेस प्रोजेक्ट' हे पुस्तक सलग दोन वर्षे बेस्टसेलर म्हणून गाजले आहे आणि त्यातले एक वर्ष तर ते न्यूयॉर्क टाइम्सच्या बेस्ट सेलर नंबर एकला होते. छापील आणि ई-बुक्स माध्यमातून त्यांच्या पुस्तकांच्या २० लाखांहून अधिक प्रती खपल्या असून, तीस भाषांमध्ये त्यांच्या पुस्तकांचे अनुवाद झाले आहेत. त्यांची 'बेटर दॅन बिफोर', 'हॅपिअर ॲट होम' आणि बरीच इतर पुस्तके न्यूयॉर्क टाइम्सच्या 'बेस्ट सेलर' यादीत बराच काळ होती.

येल लॉ स्कूलमधून कायद्याची पदवी घेतल्यावर त्यांनी कायद्याच्या क्षेत्रात काम करायला सुरवात केली. त्या जेव्हा सुप्रीम कोर्टामध्ये सॅन्ड्रा डे ओकनूर या जजकरता क्लार्क म्हणून काम करत होत्या, तेव्हा त्यांना जाणवले की त्यांना खरे तर लेखिका व्हायचे आहे.




**ग्रेचेन रुबिन**

अनुवाद

**अश्विनी तापीकर-कंठी**

*पावसाळ्यातल्या एका दुपारी ग्रेचेन रुबिनला अचानक साक्षात्कार झाला, आणि तो देखील एका अनपेक्षित ठिकाणी-बसमध्ये. तिला जाणवले की, 'दिवस मोठे असतात, पण वर्षे छोटी असतात'. 'वेळ निघून जात आहे, आणि महत्त्वाच्या गोष्टींवर मी पुरेसे लक्ष देत नाही आहे.' त्या क्षणी तिने पुढचे एक वर्ष तिच्या 'हॅपीनेस प्रोजेक्ट'ला वाहून घेतले.*

*आनंदी कसे व्हावे याविषयी युगानुयुगे अनुभवातून आलेले शहाणपण, हल्लीचे शास्त्रशुद्ध संशोधन आणि वेगवेगळ्या संस्कृतींमधून मिळवलेली माहिती, हे सगळे वापरून रुबिन तिच्या आनंदी होण्याच्या प्रयत्नांचा बारा महिन्यांचा प्रवास रोचक आणि खिळवून टाकणाऱ्या शैलीत वर्णन करते. या प्रवासात तिला बऱ्याच गोष्टी जाणवल्या - नावीन्य आणि आव्हाने यातून आनंद निर्माण होतो, योग्य प्रकारे वापरला तर पैसादेखील आनंद देऊ शकतो. तुमच्या आजूबाजूचे नेटकेपण तुम्हाला मनःशांती देऊ शकते आणि छोट्यातले छोटे बदल खूप मोठा फरक घडवून आणतात.*

('आनंदतरंग' पुस्तकातून)

## ध्येय उच्च ठेवा

- ब्लॉग सुरू करा
- धडपडण्यातही मजा असते
- मदत मागा
- चातुर्याने काम करा
- क्षणस्थ राहा

### काम

काम करण्याकरता आनंदी असणे खूप गरजेचे आहे आणि आनंदी राहण्याकरता काम करणे खूप गरजेचे आहे. 'आयुष्य खडतर असते' या प्रकारच्या अनुभवांपैकी एक अनुभव असे सांगतो की, आनंदी भावना सगळ्या गोष्टींवर मात करते. आनंदी लोक जास्त वेळ काम करतात आणि ते त्यांच्या फावल्या वेळातदेखील काम करतात. आनंदी लोक जास्त सहकार्य करणारे, कमी आत्मकेंद्रित असलेले आणि इतरांना जास्तीतजास्त मदत करणारे असतात. उदा. एकमेकांना माहिती देणारे, सहकाऱ्यांना मदतीचा हात देणारे असतात. ते इतरांना मदत करणारे असल्याने इतर लोकदेखील त्यांना मदत करतात. सगळ्यांनाच आनंदी व्यक्तींबरोबर काम करायला आवडत असल्याने आनंदी लोक इतरांबरोबर चांगल्या प्रकारे काम करू शकतात. आनंदी लोक कामावर दांड्या मारणे, कामाबद्दल तक्रारी करणे, सूडबुद्धीने वागणे, निरुत्साही राहणे अशा कार्यक्षमतेला बाधा आणणाऱ्या गोष्टी करत नाहीत.

आनंदी लोक अधिक चांगले नेते असतात. असे लोक नेतृत्व करणे आणि माहितीचा सुयोग्य वापर करणे यांसारखी व्यवस्थापकीय कामे उत्तमरीत्या पार पाडतात. इतरांपेक्षा आनंदी लोक अधिक आत्मविश्वासपूर्ण आणि ठाम असतात. त्यांच्या आनंदी असण्याने लोकांना ते मनमोकळे, प्रेमळ आणि आकर्षक वाटतात. एका पाहणीत असे आढळून आले आहे की, जी मुले कॉलेजच्या पहिल्या वर्षी जास्त आनंदी होती, ती मुले कोणतेही आर्थिक पाठबळ नसतानासुद्धा त्यांच्या तिशीत जास्त पैसे मिळवत होती. आनंदी असण्याने तुमच्या कामाच्या दर्जातदेखील खूप फरक पडतो.

प्रत्येकाचा दिवसातला बराच वेळ काम करण्यात जात असल्याने काम करताना आनंदी असणे अर्थातच खूप महत्त्वाचे आहे. सर्वसाधारणपणे अमेरिकन लोक दिवसाचे सात किंवा अधिक तास काम करतात. हल्ली सुट्ट्यादेखील हळूहळू कमी होत आहेत. आनंदी आयुष्य जगण्याकरता

लागणाऱ्या बऱ्याच गोष्टी कामामुळे साध्य होतात - उदा. आत्मविकासाचे वातावरण, सामाजिक ओळखी-पाळखी, मौजमजा, आत्मसन्मान, समाजात प्रतिष्ठा आणि जगण्याचा अर्थ!

जेव्हा माझा मूड जातो, तेव्हा काम करून मला उत्साह येतो; त्यामुळे माझा मूड गेल्यावर कधीकधी जेमी म्हणतो, ''तू थोडा वेळ ऑफिसला का जात नाहीस?'' मला काम करायचा मूड नसला, तरी मी कामाला सुरुवात केली की, काहीतरी साध्य होते आहे या कल्पनेने मला उभारी येते आणि दुसरीकडे लक्ष वेधल्याने माझा गेलेला मूड परत येतो.

आनंदी राहण्याकरता काम हे महत्त्वाचे साधन असल्याने 'योग्य काम शोधणे' हे एखाद्याच्या हॅपिनेस प्रोजेक्टचे लक्ष्य असू शकते. मी आनंदाचा शोध घेण्याच्या दृष्टीने माझ्या आयुष्यात आधीच करिअरमध्ये बदल केला होता. मी माझ्या करिअरला वकिलीने सुरुवात केली होती. माझ्याकडे वकिलीचा भरपूर अनुभवदेखील जमा झाला होता; पण जेव्हा माझी क्लार्कशिप संपत आली, तेव्हा पुढे काय करावे हे मला ठरवता येईना.

दरम्यान, मी शिक्षणक्षेत्रात पदवी घेणाऱ्या माझ्या एका मैत्रिणीला भेटले होते. तिच्या खोलीत खूप मोठमोठी पुस्तके इकडेतिकडे पडली होती.

''हे इतकं सगळं तुला वाचावं लागतं?'' एका भल्या मोठ्या रुक्ष पुस्तकाची पाने चाळताचाळता मी तिला विचारलं.

''हो, पण हे सगळं मी माझ्या फावल्या वेळात वाचते.'' ती उत्तरली.

कसे कोण जाणे, पण सहजपणे दिलेल्या या तिच्या उत्तराने माझे लक्ष वेधले गेले. 'मी माझ्या फावल्या वेळात काय करते?' मी स्वत:लाच प्रश्न केला. मला क्लार्कशिपचे काम आवडत असले, तरी मी त्याकरता आवश्यक तेवढीच कायद्याची पुस्तके वाचत असे.

सहज म्हणून मी एक पुस्तक लिहायला घेतले होते; (जे पुढे 'पॉवर, मनी, फेम, सेक्स' या नावाने प्रकाशित झाले.) आणि मला अचानक जाणवले की, कदाचित पुस्तके लिहिणे हा माझा व्यवसाय होऊ शकतो. पुढच्या काही महिन्यांतच माझी खात्री पटली की, मला आयुष्यात हेच करायचे होते.

मी खूप महत्त्वाकांक्षी आणि स्पर्धात्मक प्रवृत्तीची आहे. मला माझ्या कायद्याच्या क्षेत्रातले सगळे कष्ट, अनुभव सोडून देऊन पुन्हा नव्याने करिअर

सुरू करायला लागणार होते. मी 'येल लॉ जर्नल'ची मुख्य संपादक होते, कायद्याच्या लिखाणा-संदर्भातले एक ॲवॉर्ड मला मिळाले होते. या सगळ्याला कायद्याच्या विश्वात खूप महत्त्व होते; पण कायद्याबाहेरील वर्तुळात त्याला काडीचीही किंमत नव्हती. कायद्याचे क्षेत्र सोडण्याकरता माझी महत्त्वाकांक्षाही कारणीभूत होती. व्यावसायिक यशामध्ये तुमची इच्छा महत्त्वाची भूमिका बजावते, या गोष्टीवर माझा आता पूर्ण विश्वास बसला होता. एखाद्या कामाची आस असली की, ज्या उत्साहाने आणि झोकून देऊन कामे केली जातात, त्याची तुलना नुसती ढोर-मेहनत करून केलेल्या कामाशी करता येणार नाही. माझे सुप्रीम कोर्टातले इतर क्लार्क सहकारी सहज म्हणून वकिलीची पुस्तके वाचतात, त्यांच्या जेवणाच्या सुट्टीत कोर्टातल्या केसेसबद्दल चर्चा करतात आणि त्यांना हे सगळे करून उत्साही वाटते; मला नाही.

एखाद्या गोष्टीत प्रावीण्य मिळवण्याकरता तुमच्या क्षमतेपेक्षा तुमचा उत्साह जास्त महत्त्वाचा ठरतो, कारण त्या क्षेत्रातले तज्ज्ञ होण्याकरता सगळ्यात महत्त्वाची गोष्ट कोणती असेल तर कष्ट करण्याची तयारी. म्हणून करिअरविषयक सल्ला देणाऱ्यांच्या मते तुम्हाला ज्या गोष्टीची आवड आहे, जी गोष्ट तुम्हाला सहज जमते, त्या क्षेत्रातच तुम्ही काम करणे हे उत्तम! असे करण्यामुळे तुमची तिथे कष्ट करण्याची तयारी असते, तिथल्या स्पर्धेत तुम्ही सहज टिकून राहता.

मला लिहिणे, वाचणे, नोट्स काढणे, संशोधन करणे, विश्लेषण करणे, समीक्षण करणे हे सगळे खूप आवडते (खरे तर मला लिहायला आवडत नाही. तसे पाहायला गेले तर कोणत्याच लेखकाला लेखनातली कारागिरी मंजूर नसते.) आता मागे वळून पाहता असे कितीतरी दाखले सापडतात, ज्यावरून मला लेखिका व्हायचे होते हे सिद्ध होईल. मी दोन कादंबऱ्या लिहिल्या होत्या. (ज्या सध्या ड्रॉवरमध्ये पडून आहेत.) मी माझा रिकामा वेळ नेहमीच वाचनात घालवला आहे. कोणतेही कारण नसताना मी भरपूर नोट्स काढल्या आहेत. मी कॉलेजमध्ये इंग्रजी भाषेचा अभ्यास केला आहे आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे मी माझ्या रिकाम्या वेळात एक पुस्तक लिहीत होते.

लिहिणे हेच मी अर्थार्जनाचे साधन करावे हे माझ्या आधी कसे काय

लक्षात आले नाही? अनेक कारणे असतील; पण सगळ्यात महत्त्वाची बाब ही होती की, मला बरेचदा माझ्या वृत्तीप्रमाणे वागता यायचे नाही. इरॅइमसच्या मते, माणसाला तो जसा आहे तसे वागण्यात आनंद मिळत असतो. वरवर हे सोपे वाटत असले, तरी तसे वागणे मला नेहमीच कठीण गेले आहे आणि म्हणूनच 'स्वत:च्या वृत्तीप्रमाणे वागा' हे माझे माझ्या बारा तत्त्वांपैकी पहिले तत्त्व ठरले.

मी कोण असायला हवी होते याची मला पूर्ण कल्पना होती; परंतु त्यामुळे 'मी खरी कशी आहे' हेच मला समजत नव्हते. बरेचदा, ज्या गोष्टी करायला मला आवडत नाहीत, त्या मला आवडतात अशी मी स्वत:चीच समजूत घालते (खरेदी), किंवा ज्यात फारसा रस नाही त्यात रस असल्यासारखा दाखवते (परराष्ट्र धोरण). आणि सगळ्यात वाईट गोष्ट म्हणजे मी माझ्या खऱ्या इच्छा-आकांक्षांकडे दुर्लक्ष करते.

माझा मूड क्षणार्धात बदलण्याकरता बरेचदा मी तसा आव आणत असे. मी माझ्या 'जशी भावना हवी तशी कृती करा' या तिसऱ्या तत्त्वाप्रमाणे वागत होते. मात्र, आयुष्यातले मोठे निर्णय घेताना असे वागून चालणार नव्हते. मी नावडत्या गोष्टींमध्ये स्वत:ला गुंतवल्याचा आव आणला असता, तर माझा उत्साह निश्चितच कमी झाला असता.

स्वत:ला पूर्णपणे ओळखता येण्याचा माझ्या बहिणीचा स्वभाव मला कौतुकास्पद वाटतो. ती स्वत:ला स्वत:च्या वृत्तीबद्दल प्रश्न विचारत नाही. शाळेत असताना मी हॉकी खेळत असे (जरी मी उत्तम खेळाडू नव्हते,) भौतिकशास्त्र शिकत असे (ज्याचा मी तिरस्कार करत असे) आणि मला आशा होती की, मला संगीताची गोडी लागेल (जी कधी नव्हती.) एलिझाबेथचे तसे नव्हते. ती स्वत:शी ठाम होती. तिच्या गल्लाभरू कथा-कादंबऱ्यांच्या किंवा टीव्हीच्या आवडीबद्दल तिला अपराधी वाटले नाही. या वृत्तीमुळेच तिने तिचे करिअर तरुण वर्गाकरता व्यावसायिक कादंबऱ्या लिहून सुरू केले आणि नंतर ती टीव्हीकरता लेखन करू लागली. मला कधीकधी वाटायचे की, एलिझाबेथ आधी लेखिका झाली नसती तर मी लेखिका झाले असते का? माझ्या करिअरसंबंधीच्या मानसिक संघर्षाच्या काळात मी तिच्याशी चर्चा केली.

"माझा निर्णय योग्य आहे की नाही याची मला काळजी वाटते." मी

कबुली दिली. ''लॉ किंवा फायनान्स किंवा पॉलिटिक्ससारख्या क्षेत्रांत काम करणं मला योग्य वाटतं.''

''लेखनदेखील योग्य आहे.'' किंवा ''तुला आहे ते आवडत नसेल तर तू तुला हवं ते निवडू शकतेस.'' असे काहीसे तिने म्हणावे अशी माझी अपेक्षा होती; पण ती खूपच विचारी होती.

''तुला नेहमीच योग्य-अयोग्यतेचे निकष लावायला आवडतात आणि ते तू यापुढेही करशील. म्हणूनच बहुधा तू लॉ शिकलीस. तसे निकष तू तुझ्या पुढच्या करिअरलादेखील लावून पाहतेस का?''

''अं ...''

''तू सुप्रीम कोर्टात क्लार्क म्हणून एक चांगल्या प्रकारची नोकरी आत्तासुद्धा करत आहेस, तुला तो निर्णय योग्य वाटतो का?''

''खरं तर, नाही.''

''म्हणजे तुला भविष्यातही तो योग्य निर्णय वाटणार नाही. असो; पण फक्त त्या एकाच गोष्टीवर निर्णय घेऊ नकोस.''

मग मी 'फेडरल कम्युनिकेशन्स कमिशन'मध्ये कायद्याशी संबंधित अजून एक नोकरी करून पाहिली आणि मग मात्र एक दिवस लेखिका म्हणून करिअर सुरू करण्याचा निर्णय घेतला. अनोळखी आणि अननुभवी क्षेत्रात पाऊल टाकणे हे माझ्यापुढे मोठे आव्हान होते; पण आम्ही जेव्हा वॉशिंग्टन डी.सी.हून न्यू यॉर्कला राहायला आलो, तेव्हा जेमीनेदेखील करिअर बदलण्याचा निर्णय घेतल्याने माझा करिअर बदल मला सोपा वाटला. पुस्तकाबद्दलचा प्रस्ताव कसा लिहायचा या विषयाचा मी अभ्यास करत असताना जेमी अकाउंटिंगच्या क्लासला जात होता. मला आजही तो दिवस आठवतो, जेव्हा आम्ही दोघांनी आमच्या वकिलीच्या लायसन्सचे नूतनीकरण न करण्याचा निर्णय घेतला.

लॉ सोडून लेखिका व्हायचे ही 'स्वत:च्या वृत्तीप्रमाणे वागा' या तत्त्वाशी सुसंगत अशी माझ्या आयुष्यातली महत्त्वाची पायरी होती. मला जे करावेसे वाटत आहे, तेच करण्याचा निर्णय मी घेतला होता आणि इतरांना कितीही आकर्षक वाटले असतील; पण मला जे आकर्षक वाटले नाहीत ते सर्व पर्याय सोडून दिले.

माझ्या या महिन्याच्या उद्दिष्टांमध्ये 'झालेल्या कामाचा आढावा घेणे' या

गोष्टीव्यतिरिक्त अजून कोणत्या गोष्टी असू शकतात? मला माझ्या कामात अधिक उत्साह, अधिक कल्पकता आणि अधिक कार्यक्षमता आणायची होती. मला जितके चाकोरीबद्ध आयुष्य जगायला आवडते, तितके दुसऱ्या कोणालाही आवडत नसेल. पण मी नव्या करिअरमधली नवी आव्हाने शिकण्याकरता स्वत:ला अनोळखी कामांमध्ये झोकून द्यायचे ठरवले. माझ्या रूटीनमध्ये मी लेखनाला आणि वाचनाला जास्तीतजास्त वेळ कसा देता येईल याकरता नवनवीन उपाय शोधू लागले. त्या जोडीला इतरांबरोबर जास्त वेळ घालवण्याकरता मार्ग शोधू लागले आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे मी जशी शुक्रवार दुपारची वाट पाहते, तशीच मी सोमवार सकाळची वाट पाहायला हवी असे मनाला बजावू लागले.

ब्लॉग सुरू करा

आव्हान आणि नावीन्य हे आनंदाचे महत्त्वाचे घटक आहेत हे मला माझ्या संशोधनातून समजले होते. एखादी आश्चर्यकारक गोष्ट समजल्यावर तुमचा मेंदू उत्तेजित होतो आणि अनपेक्षित परिस्थितीशी नीट जुळवून घेता आले की, तुमच्या मनाला समाधान लाभते. तुम्ही जर पहिल्यांदा एखादे म्युझियम पाहत असाल, एखादा नवीन खेळ शिकत असाल, नव्या ठिकाणी प्रवास करत असाल, नव्या ओळखी करून घेत असाल तर अशा नव्या गोष्टी करण्याने तुम्हाला रूटीन गोष्टी करण्यापेक्षा जास्त आनंद मिळतो.

आनंदाच्या बाबतीत असलेल्या अनेक विरोधाभासांपैकी एक म्हणजे आनंद मिळवण्याकरता आपण आपले आयुष्य नियंत्रित करू पाहतो; पण बरेचदा अनोळखी प्रकारे आणि अनपेक्षितरीत्या आपल्याला आनंद मिळत असतो. नवीन गोष्टी अनुभवताना मेंदूला जास्त काम करावे लागते आणि मेंदू तीव्र भावनिक प्रतिसाद देतो. परिणामी, असे नावीन्यपूर्ण अनुभव घेताना काळ थबकल्यासारखा वाटतो आणि मिळणारा आनंद द्विगुणित होतो. माझा एक मित्र त्याला पहिले मूल झाल्यावर म्हणाला, ''मूल होण्यातला एक मोठा आनंद म्हणजे काळ संथपणे पुढे सरकत आहे असं वाटतं. आधी आम्हा दोघांना आयुष्य खूप वेगाने पळते आहे असं वाटत होतं; पण क्लाराचा जन्म होताच असं वाटू लागलं आहे की, काळ एकदम थबकला आहे. आजूबाजूला इतक्या काही गोष्टी घडत आहेत की, एकेक आठवडा एकेक युगासारखा वाटू लागला आहे.''

मी माझ्या हॅपिनेस प्रोजेक्टमध्ये नावीन्य आणि आव्हाने कशी काय घालणार होते? मला माझ्या इतर आवडी-निवडींशी संबंधित उद्दिष्टेदेखील निवडायची होती. तज्ज्ञमंडळी काहीही म्हणोत, व्हायोलिन अथवा सालसा डान्स क्लास ही काही माझी आवड नव्हती. हे सगळे डोक्यात चालू असतानाच माझ्या लिटररी एजंटने मला ब्लॉग सुरू करायला सुचवले.

''पण मला त्यातलं काहीच माहीत नाही.'' मी उत्तरले. ''त्या फारच तांत्रिक गोष्टी झाल्या. मला तर साधा केबल बॉक्सदेखील कसा वापरायचा ते कळत नाही.''

''हल्ली ब्लॉग लिहिणं खूपच सोपं झालं आहे.'' ती म्हणाली. ''विचार कर. मला खात्री आहे, तुला ते आवडेल.''

तिने माझ्या मनात कल्पना भरवून दिली आणि मी एक प्रयत्न करून बघायचे ठरवले. आनंद मिळवण्यामध्ये आव्हानाचा महत्त्वाचा वाटा असतो हे माझ्या वाचनातून मला पटल्यामुळे मी हे मोठे आणि अवघड काम करून पाहायचे ठरवले होते. शिवाय मी ब्लॉग लिहायला सुरुवात केली असती, तर माझी त्या क्षेत्रातल्या लोकांशी ओळख झाली असती, मला अभिव्यक्तीचे एक साधन मिळाले असते आणि इतरांना त्यांचा हॅपिनेस प्रोजेक्ट सुरू करा असे सांगायला अजून एक मार्ग मला उपलब्ध झाला असता.

परंतु आनंदाचा खूप मोठा ठेवा मिळवण्याची खात्री असूनही मला चिंता वाटू लागली. मला आधीच वेळ कमी पडत होता, उत्साह कमी होता. ब्लॉगमध्ये माझा किती वेळ जाणार? मला किती कष्ट करावे लागणार? जे निर्णय घेण्याची माझी पुरेशी तयारी नसेल असे कितीतरी निर्णय मला घ्यावे लागणार होते. मला रोज लोकांच्या टीकेला, प्रश्नांना सामोरे जावे लागले असते. मी वेडीच झाले असते.

याच दरम्यान, माझी ओळखीच्या दोन लोकांशी गाठ पडली. त्यांचे स्वत:चे ब्लॉगस् होते. त्यांनी मला ब्लॉग सुरू करण्याबद्दलच्या काही महत्त्वाच्या टिप्स दिल्या. एखादे वेळी ही सुदैवी भेट म्हणजे एक दैवी संकेतच असावा. म्हणतात ना, जेव्हा शिष्य तयार असतो, तेव्हा गुरू आपोआप प्रकट होतो. कदाचित माझे जे प्रयत्न चालू होते, त्याला मिळालेले हे यश होते किंवा मी फक्त सुदैवी होते, इतकेच!

''टाइप-पॅड हे सॉफ्टवेअर वापर.'' माझी पहिली सल्लागार म्हणाली.

''मी तेच वापरते.'' ती वेगवेगळी हॉटेल्स् आणि पाककृती या विषयावर ब्लॉग लिहीत असे. ''सुरुवातीला साधाच राहू दे ब्लॉग. तू जसजशी पुढे जाशील, तसतशी जरुरीप्रमाणे त्यात एकेक वैशिष्ट्यं घालता येतील.''

''रोज पोस्ट टाकत जा. ते खूप महत्त्वाचं असतं.'' माझ्या दुसऱ्या सल्लागाराने बजावले. तो कायदेविषयक ब्लॉग लिहीत असे. अरे बापरे! मला तो सल्ला फारसा आवडला नव्हता तरी मी आठवड्यातून तीन वेळा पोस्ट टाकायचे ठरवले. ''आणि तू जेव्हा एखाद्याला तुझ्या नव्या पोस्टबद्दल कळवणार असशील, तेव्हा ई-मेलमध्ये संपूर्ण पोस्ट टाक, फक्त लिंक देऊ नकोस.''

''ओके.'' मी चाचरत म्हणाले. ''म्हणजे, तुला असं म्हणायचं आहे का की, इतर ब्लॉग लिहिणाऱ्यांना मी माझ्या पोस्टबद्दल ई-मेल पाठवायची?'' मला ही गोष्ट कधीच सुचली नसती.

''अं... हो.'' तो म्हणाला.

नंतरचे तीन आठवडे मनाच्या संभ्रमावस्थेत घालवून, इंटरनेटवर शोधाशोध करून शेवटी मी टाइप-पॅडमध्ये थोड्या साशंकपणे एक अकाउंट उघडला. अजून ब्लॉगबद्दल काही ठरले नसूनही नुसत्या अकाउंट उघडण्याच्या या कृतीनेच मला खूप उत्साही वाटले, तसेच थोडे घाबरल्यासारखेदेखील वाटले. मी माझ्याच अनुभवाच्या बोलाची स्वत:ला आठवण करून दिली. 'तुम्हाला वाटतात तितक्या तुमच्या चुका समोरच्या व्यक्तीच्या लक्षात येत नाहीत.' समजा, ब्लॉग लिहिण्यात माझी काही चूक झाली असती, तरी काही जग बुडणार नव्हते.

रोज मी साधारणपणे एक तास ब्लॉग डिझाइन करण्यात घालवत असे आणि हळूहळू त्याला आकार येऊ लागला. माझा स्वत:बद्दल माहिती देणारा विभाग लिहून झाला. ब्लॉगविषयीची ओळख मी ब्लॉगच्या 'शीर्षक' विभागात लिहून टाकली. माझ्या पुस्तकांच्या लिंक्स देऊन झाल्या. ब्लॉगवर माझी बारा तत्त्वे लिहिली. ब्लॉगमध्ये आर.एस.एस. काय असते ते मी समजून घेतले आणि त्याची एक लिंक ब्लॉगमध्ये घालून टाकली. शेवटी सत्तावीस मार्चला एक दीर्घ श्वास घेऊन मी माझी पहिली पोस्ट टाकली.

आज माझा हॅपिनेस प्रोजेक्टविषयक ब्लॉगचा पहिला दिवस.

आता हॅपिनेस प्रोजेक्ट म्हणजे काय? काही दिवसांपूर्वी एका दुपारी

मला अचानक प्रश्न पडला की, मी माझे आयुष्य 'मी आनंदी आहे का?' या महत्त्वाच्या प्रश्नाचे उत्तर न शोधताच जगते आहे की काय? त्या क्षणापासून मी सतत 'आनंद' या विषयाचा विचार करत राहिले. आनंद हा माझ्या वृत्तीचाच एक भाग बनू शकतो का? अधिक आनंदी होण्याकरता मी काही पावले उचलणे गरजेचे आहे का? मुळात आनंदी असणे म्हणजे काय?

मी ठरवले, हॅपिनेस प्रोजेक्ट ब्लॉग हा माझा एक वर्षाचा प्रवास असेल ज्यात मी माझी तत्त्वे, मूल्ये, सूचना, सिद्धान्त, संशोधनातून आलेली उत्तरे, तत्त्ववेत्त्यांपासून, साहित्यिकांपासून, सामाजिक नामवंतांपर्यंत सगळ्यांची मते... हे सगळे पडताळून पाहणार आहे. आनंदी होण्याकरता कोणता सल्ला अधिक उपयोगी पडतो हे शोधणार आहे.

मी नुकत्याच सुरू केलेल्या माझ्या ब्लॉगने मला आनंद दिला कारण मी माझे या महिन्यातले महत्त्वाचे उद्दिष्ट या ब्लॉगद्वारे गाठलेले आहे (आणि तेदेखील वेळेत.) मी माझ्यासमोर एक उद्दिष्ट ठेवले होते, ते उद्दिष्ट गाठण्याच्या दृष्टीने पावले उचलली होती आणि शेवटी ते उद्दिष्ट गाठून दाखवले.

ब्लॉग सुरू करताना मला माझे दोन अनुभवाचे बोल आठवले.

१. 'मदत मागण्यात काहीही गैर नाही.'
ब्लॉग सुरू करताना मित्र-मंडळींकडून सल्ला घेणे, मदत मागणे यात काही गैर नाही हा विचार सुचेपर्यंत मीदेखील काही काळ एकटीच धडपडत होते.

२. 'रोज थोडेथोडे काम करत राहिल्याने तुम्ही बरेच काही साध्य करू शकता.'

आपण एका तासात किंवा एका आठवड्यात काय साध्य करू शकतो याबद्दल मोठा अंदाज वर्तवण्याची आपल्याला सवय असते आणि रोज थोडेथोडे काम करण्याने आपण एका महिन्यात किंवा एका वर्षात काय साध्य करू शकू याबद्दलचा आपला अंदाज मात्र कमी निघत असतो. 'रोज एक छोटे काम; मात्र अगदी रोज करणे, हे अधूनमधून केलेल्या मोठ्या कामापेक्षा जास्त असते.' – अँथनी ट्रोलोप

◆

**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

नवे कोरे

# घरपरतीच्या वाटेवरती...

**सरू ब्रायर्ली**

अनुवाद

**लता रेळे**




**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

*पाच वर्षांचा सरू व त्याचा मोठा भाऊ, जगण्यासाठी धडपड करत असलेल्या आपल्या आईला मदत म्हणून स्थानिक ट्रेनमध्ये साफसफाईचे काम करतात. एक दिवस, थकून गेलेला लहान मुलगा ट्रेनमध्येच झोपून जातो व जेव्हा उठतो तेव्हा कोलकात्याला पोहोचलेला असतो. गरीब व अशिक्षित सरूला ना स्वतःचं आडनाव माहीत होतं ना स्वतःच्या गावाचं नाव. एका रात्रीत तो त्याच्या सबंध कुटुंबापासून दुरावतो व गजबजलेल्या महानगरातल्या असंख्य बेघर मुलांत येऊन पडतो. शेवटी सरूला एक ऑस्ट्रेलियन दांपत्य दत्तक घेते व तो टास्मेनियात वाढतो; पण आपल्या आईला कधीच विसरत नाही. पंचवीस वर्षांनंतर 'गुगल अर्थ'च्या मदतीने तो तिला परत शोधून काढतो.*

*ही बातमी आली तेव्हा प्रसारमाध्यमांत बरीच खळबळ उडाली. या पुस्तकात सरू पहिल्यांदाच लिहितो आहे, आपल्या आयुष्याविषयी, आपल्या मध्य प्रदेशातील खांडव्यात घालवलेल्या बालपणाविषयी, कोलकात्याच्या रस्त्यावर काढलेले दिवस आणि आईशी पुनर्भेट या सर्वांबद्दल. मन हेलावून टाकणारी व प्रेरणा देणारी अशी ही अविस्मरणीय कहाणी आहे.*

या कथानकावर आधारित चित्रपट प्रदर्शित

# अभिप्राय






| | | |
|---|---|---|
| **सी.ई.ओ.च्या केबिनमधून...** | : | **डॉ. गिरीश वालावलकर** |
| **पृष्ठसंख्या** | : | १७६ |
| **किंमत** | : | १९५/- रु. |

**भौतिक जगताचा लेखाजोखा...**

आपल्या आसपासचं जग झपाट्याने बदलत आहे. बदलणाऱ्या जगाचा परिणाम माणसांच्या दैनंदिन आयुष्यावरसुद्धा होत आहे. या स्पर्धात्मक जगात अनेक उदयोन्मुख कंपन्या स्वत:चं अस्तित्व टिकवण्यासाठी धडपड करत आहेत. कुठलीही परिस्थिती असो, या कंपन्यांची वार्षिक उलाढाल काही कोटींच्या घरात असते. आपल्या भोवतालच्या या जगावर डॉक्टर गिरीश वालावलकर यांनी 'सी.ई.ओ.च्या केबिनमधून' या पुस्तकाद्वारे क्ष-किरण टाकला आहे.

डॉक्टर गिरीश वालावलकर यांनी मोठमोठ्या कंपन्यांमध्ये उच्च पदावर काम केले आहे. त्यांनी आसपासच्या जगाचं सूचक पद्धतीने निरीक्षण करून त्यासंदर्भात अनेक वर्तमानपत्रांमध्ये लेख लिहिले. ते लेख एकत्रितरीत्या या पुस्तकात समाविष्ट आहेत. या पुस्तकातल्या बऱ्याच गोष्टींचा समावेश आपल्या दैनंदिन जीवनात असतो; परंतु त्यावर सखोल आणि संशोधनात्मक लेखन वाचून आपल्याला या गोष्टींची नव्याने माहिती मिळते.

सध्या ऑनलाइन विश्वात धुमाकूळ घालणाऱ्या वेबसीरिजचं विश्व त्यांनी आपल्या लेखातून मांडलं आहे. त्याचबरोबर आजही लोकप्रियतेच्या शिखरावर असलेल्या 'अमूल' कंपनीची वाटचाल त्यांनी आपल्या लेखातून स्पष्ट केली आहे. तसेच व्हिडिओ गेम्सची वेगळी दुनिया आणि या क्षेत्रातील व्यावसायिकता त्यांनी उलगडली आहे.

त्याचबरोबर ओला, उबरसारख्या टॅक्सी क्षेत्रातल्या कंपनीची व्यवसाय उलाढाल स्पष्ट केली आहे. तसेच हिंदुस्थानी चित्रपटसृष्टीचं त्यांनी डोळसपणे निरीक्षण केलं आहे. राजकारणामध्ये असलेला उद्योगसमूहांचा प्रभाव यांनी स्पष्ट केला आहे आणि हिंदुस्थानी ग्राहकांच्या बदलत्या मानसिकतेवर त्यांनी भाष्य केलं आहे.

या पुस्तकातील लेख वाचून लेखकाची आसपासच्या जगाकडे पाहण्याची अभ्यासू मनोवृत्ती दिसून येते. लेखकांनी प्रत्येक गोष्टीमधील सूक्ष्म घटकांचा अभ्यास करून त्यावर आपलं मत मांडलं आहे. ही मतं मांडतांना त्यांनी विशिष्ट कंपनीच्या इतिहासाचा संदर्भ घेऊन त्या कंपनीच्या सध्याच्या नफा-तोट्यावर सोप्या भाषेत आकडेवारीच्या आधाराने लेखन केलेले आहे. त्यामुळे हे लेखन वरवरचं न वाटता या लेखांना एक विश्वासार्हता प्राप्त होते.

लेखक स्वत: सी.ई.ओ. म्हणून अनेक वर्षे काम करत असल्याने कामानिमित्त त्यांनी अनेक देशांना भेटी दिल्या. त्यामुळे या अनुभवांचा आणि कामाचा पुरेपूर वापर त्यांनी आपल्या लेखांमधून केलेला आहे. त्यांनी अनेक बाबतीत मांडलेली मते विचार करण्यास भाग पाडतात. एका गोष्टीचा अनेक अंगांनी आणि विविध बाजूंनी त्यांनी विचार केला आहे.

सारस्वत बँकेचे चेअरमन गौतम ठाकूर यांची प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे. तसेच प्रसिद्धा उद्योजक डॉक्टर विठ्ठल कामत यांचे शुभाशीर्वाद या पुस्तकाला मिळाले आहेत. आपण रोज जगत असलेल्या जगातील अनेक अज्ञात गोष्टी या पुस्तकामुळे कळून येतात. त्यामुळे ज्यांना या व्यावसायिक क्षेत्रात स्वत:चं अस्तित्व निर्माण करायचं आहे त्यांनी हे पुस्तक आवर्जून संग्रही बाळगण्यासारखं आहे.

**– देवेंद्र जाधव**

दैनिक सामना, ३-२-२०१९

◆


द्विखंडित

**तसलिमा नासरिन । अनुवाद : विलास गीते**




**बांगलादेशातील वादग्रस्त लेखिका तसलिमा नासरिन यांच्या आत्मचरित्राचा तिसरा भाग**

**किंमत : ५५०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**